# श्रीदत्त- दुर्गा संवाद

◆ संकलक ◆

ॐ वनिता ॐ

ॐ वनिता बुक्स
मुंबई - ४०० ०१२.

☯ **ॐ वनिता बुक्स**

☯ **पुष्प चौदावे**

© सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन

प्रथम आवृत्ती : २०१०
द्वितीय आवृत्ती : २०१५

☯ **प्रकाशक**
**ॐ वनिता बुक्स**
बी, २१३, सात आसरा सहकारी गृहनिर्माण संस्था,
डॉ. एस. एस. राव मार्ग, लालबाग,
मुंबई ४०० ०१२.
दूरध्वनी : (०२२) २४१८७३३९.

☯ **मूल्य : रु. २००/-**

# प्रस्तावना

सौ. वनिता दीक्षित यांनी श्रीस्वामी दत्तावधूतांबरोबर अनेकदा हिमालयामध्ये प्रवास केला; तसेच भारतातील इतरही अनेक अरण्यांमधून प्रवास केला. त्यांच्याबरोबर राहिल्या, त्यांनी सांगितल्याप्रमाणे साधनाही केल्या. त्यांच्या या सत्संगामध्ये त्यांनी वेळोवेळी श्रीस्वामीजींबरोबर ज्ञानचर्चा केली. जिज्ञासेने अनेक प्रश्न विचारले, त्यांच्याकडून ज्ञान मिळविले. ते सर्व ज्ञान प्रकाशित करण्याचे ठरविल्यानंतर श्रीस्वामी दत्तावधूतांनी त्याला '**श्रीदत्त-दुर्गा संवाद**' असे नाव दिले. हे सर्व ज्ञान श्रीस्वामीजींचेच असल्याकारणाने त्यांच्याच नावाने प्रकाशित करत आहोत.

सुमारे वीस वर्षांपूर्वी सौ. वनिता दीक्षित - ज्यांना प्रेमाने ताई असे म्हणतात, त्यांना श्रीस्वामी दत्तावधूतांनी अनेक आध्यात्मिक अधिकार दिले, तेव्हा श्रीस्वामी दत्तावधूत म्हणाले, ''सध्या पुस्तके मी लिहित आहे व तुम्ही प्रकाशित करीत आहात, भावी काळात जेव्हा तुम्ही स्वत: पुस्तके लिहाल तेव्हा लेखक म्हणून सौ. वनिता दीक्षित असे नाव न टाकता '**ॐ वनिता ॐ**' असे लिहा!'' त्यामुळे श्रीस्वामी दत्तावधूतांच्या या पुस्तकावर आतल्या बाजूला '**ॐ वनिता ॐ**' असे संकलक म्हणून नाव लिहिले आहे.

**- प्रकाशक**

# ● अनुक्रमणिका ●


१. हरिद्वार ........................................ ५
२. डेहराडून ........................................ ८
३. ऋषीकेश ........................................ १७
४. नैनिताल ........................................ २७
५. मुक्तेश्वर ........................................ ३४
६. कांकरिया घाट ........................................ ३६
७. अल्मोडा ........................................ ४३
८. राणीखेत ........................................ ५९
९. द्वाराहाट ........................................ ६५
१०. जोशीमठ ........................................ ७६
११. कर्णप्रयाग ........................................ ८४
१२. उखीमठ ........................................ ९२
१३. श्रीनगर (गढवाल) ........................................ १०३
१४. उत्तरकाशी ........................................ ११२
१५. ग्वालदम ........................................ १२१
१६. कौसानी ........................................ १२४
१७. पिठोरागड ........................................ १३२
१८. देवीधुरा ........................................ १३६

# १. हरिद्वार

**ह**रिद्वार येथील गंगेचे सौंदर्य अनुपम आहे, अवर्णनीय आहे. कित्येक साधू गंगेकडे पहात ध्यान करत राहतात. त्यांचे अनेक तास केव्हा निघून गेले त्यांचे त्यांनाच कळत नाही. संध्याकाळच्या वेळेला गंगेची आरती होते. हा आरतीचा सोहळा पाहण्यासारखा असतो. हजारो लोक गंगेमध्ये ज्योति प्रवाहित करतात. गंगा नदीच्या ओढीने शेकडो साधक गंगेच्या किनाऱ्यावर राहतात.

हरिद्वारपासून जवळच टेकडीवर मनसादेवी हे स्थान असून, या स्थानावर जाण्यासाठी 'रोप-वे'ची सोय आहे. गंगेच्या पलीकडील काठावर चंडी पर्वत असून, तेथे चंडिका देवीचे स्थान आहे. तेथेही 'रोप-वे'ची सोय आहे.

हरिद्वारपासून २० किलोमीटर दूर नीलकंठ महादेव हे स्थान असून, या स्थानामध्ये अनेक मणिधारी नाग राहतात, अशी वदंता आहे. हरिद्वारजवळ कनखल नावाचे एक स्थान असून, हे शक्तिपीठ आहे. येथे दशमहाविद्या मंदिर व माँ आनंदमयी यांचा आश्रम आहे. असे म्हणतात की, लाखो वर्षांपूर्वी याच कनखलमध्ये एक अतिशय भयंकर घटना घडली. ती अशी...

दक्ष प्रजापतीची कन्या उमा हिला शंकराशी विवाह करायचा होता. दक्षाची तशी इच्छा नव्हती. त्याच्या मते शंकर हा तामसी व अघोरी तपस्वी होता. शेवटी उमेच्या म्हणजेच पार्वतीच्या इच्छेला मान देऊन दक्षाने उमेचे म्हणजे पार्वतीचे लग्न शंकराबरोबर लावून दिले. मानव जातीच्या इतिहासातील हा पहिला प्रेमविवाह असावा. शंकराप्रमाणेच उमा म्हणजे पार्वतीही खूप तपस्या करीत असे, म्हणून तिला सती म्हटले जात असे.

एकदा दक्षाने एक खूप मोठा यज्ञ करण्याचे ठरविले. हा यज्ञ सुमारे वर्षभर चालणार होता. दक्षाने आपल्या जावयांना व नातेवाईकांना; तसेच तत्कालीन राजांना आमंत्रण दिले परंतु शंकराला आमंत्रण दिले नाही.

आपले वडील आपल्याला बोलवायला विसरले असतील किंवा पित्याच्या घरी जाण्यासाठी आमंत्रणाची आवश्यकता काय, असा विचार करून पार्वतीने शंकराला

यज्ञासाठी जाण्याचा आग्रह केला. तेव्हा शंकराने तुझ्या वडिलांच्या घरी जाण्यास तुला काहीच हरकत नाही परंतु मी त्यांना आवडत नसल्यामुळे मी जाणे योग्य नाही, असे सांगून पार्वतीला पाठवून दिले.

कनखल येथे यज्ञ केव्हाच सुरू झाला होता. यज्ञाच्या ज्वाला आकाशाला भिडत होत्या. शंकराच्या सेवक गणांसह पार्वती तेथे पोहोचली. यज्ञकुंडामध्ये आहुती देणाऱ्या आपल्या आई-वडिलांना नमस्कार करण्यासाठी ती यज्ञकुंडाजवळ गेली. तेव्हा तिच्या वडिलांनी अपशब्द बोलून तिचा खूप अपमान केला. चिडून सती पार्वतीने त्याच अग्निकुंडामध्ये स्वत:चे शरीर झोकून दिले व प्राणत्याग केला.

ही बातमी शंकराला कळताच भगवान शंकराने तेथे प्रचंड उत्पात केले. त्यानंतर सतीचे मृत शरीर खांद्यावर टाकून शंकर वेड्यासारखा फिरत राहिला. हळूहळू सतीचे एक-एक अवयव गळू लागले. भारतामध्ये जेथे जेथे सतीचे अवयव गळून पडले तेथे तेथे एक-एक शक्तिपीठ तयार झाले. यापैकी नैनिताल येथे सतीचे नयन पडले म्हणून त्या जागेला नैनिताल असे म्हणतात. कोलकाता येथे सतीचा हात पडला म्हणून त्या जागेला प्रथम कालिहात असे नाव होते. कालिहाताचे नंतर कोलकाता झाले. अशा प्रकारे संपूर्ण भारतात ५१ शक्तिपीठे निर्माण झाली.

# २. डेहराडून

डेहराडून येथे एक खूप विशाल आकाराची गुंफा असून, या गुंफेमध्ये टपकेश्वर नावाचे शंकराचे स्थान आहे. या गुंफेमध्ये सर्वत्र पाणी टपकत असते. म्हणून येथील शंकराला टपकेश्वर म्हणतात. ही एक अतिशय सुंदर गुंफा असून, देवस्थान कमिटीने या गुंफेला अप्रतिम सजवले आहे.

सहस्रधारा नावाचे आणखी एक स्थान खूप सुंदर आहे. ते डेहराडून-मसुरी रस्त्यावर आहे.

डेहराडूनहून आम्ही चिला नॅशनल पार्कमध्ये गेलो. हे अरण्य हत्तींसाठी खूप प्रसिद्ध आहे. हिमालयामध्ये हजारो जंगली हत्ती आहेत. जंगली हत्ती पाहण्याची आमची खूप इच्छा होती.

चिला नॅशनल पार्कमध्ये आम्ही खूप हरणे पाहिली. इतरही काही प्राणी पाहिले. एका नदीच्या किनाऱ्यावर विशाल आकाराचे हत्ती आपल्या बछड्यांसमवेत एकमेकांच्या अंगावर पाणी उडवत होते. आम्ही त्यांच्यापासून २०० फुटांवर गाडी थांबविली व हत्ती दर्शनाचा आनंद मनमुराद लुटला.

श्रीस्वामीजींच्या बरोबर मधुमलईच्या जंगलामध्ये अनेक वेळा हत्तींचे कळप पाहण्याचा योग आला होता. हत्ती दर्शनामध्ये एक वेगळाच आनंद असतो. कान्हा किसलीच्या अरण्यामध्ये तर वाघ आमच्यापासून फक्त १५ फुटांवर आरामात बसला होता.

ज्याप्रमाणे डेहराडूनला गुंफेमध्ये शंकराचे स्थान आहे; तसेच स्थान मध्य प्रदेशमध्ये पंचमढीला आहे; परंतु डेहराडूनचे स्थान जास्त सुंदर आहे. डेहराडूनच्या या शंकराच्या स्थानाजवळ बसून मी श्रीस्वामीजींना प्रश्न विचारले.

**१. दुर्गा : मन निर्विचार कसे करावे ?**

**श्री दत्त :** अनेक वर्षे जाणीवपूर्वक मन निर्विचार करण्याकरिता प्रयत्न करावे लागतात. जसजसे मन निर्विचार होऊ लागते तसतसे ते प्रसन्न व आनंदी होते व शेवटी परमानंदस्वरूप परमात्म्याशी ते तादात्म्य पावते.

मन निर्विचार करण्याच्या अनेक प्रक्रिया आहेत. त्यातील काही पुढे देत आहे.

**एक**

एखादे स्तोत्र पाठ करून ठेवावे व ते सतत मनात म्हणत राहावे. या प्रक्रियेने मन एकाग्र होते व शुद्ध होते.

मन शुद्ध न करता जर जबरदस्तीने एकाग्र केले (त्राटक साधनेने किंवा संमोहनाने मन एकाग्र करता येते), तर वातावरणातील दुष्ट शक्ती आपल्या मनाचा ताबा घेतात. असे घडू नये म्हणून सर्व साधू-संतांनी नामस्मरण करा, असे सांगितले आहे. नामस्मरणाने मन शुद्ध होते व परमेश्वराशी तादात्म्य पावते. नामस्मरण करत असताना एकीकडे नामस्मरण चालू आहे व मन मात्र जगभर फिरत आहे, असा अनुभव येतो व मनाची एकाग्रता साध्य होत नाही. यावर उपाय म्हणून आपल्या आवडत्या देवतेचे स्तोत्र सतत मनात म्हणत राहावे. याने मन अतिशय वेगाने शुद्ध होते. ज्या देवतेचे स्तोत्र आपण म्हणतो त्या देवतेचे नामस्मरण करण्यास सुरुवात करावी. देवतेचे स्तोत्र सतत मनात म्हणत राहण्याचा आणखी एक फायदा असा होतो की, ज्या देवतेचे आपण स्तोत्र म्हणतो त्या देवतेचे संरक्षण कवच साधकाला प्राप्त होते व वाईट शक्तींपासून त्याचा बचाव होतो. मन निर्विचार करण्याची ही पहिली प्रक्रिया आहे. या पहिल्या प्रक्रियेमध्ये मन चांगले एकाग्र होऊ लागले की, मग दुसऱ्या

प्रक्रियेचा अभ्यास करावा. ही पहिली प्रक्रिया किती दिवस अथवा किती वर्षे करावी, याचे काही गणित नाही परंतु स्तोत्राचे किमान सव्वा लाख पाठ तरी व्हावेत, म्हणजे मन शुद्ध होऊन देवतेचे संरक्षण प्राप्त होईल. सव्वा लाख पाठ पूर्ण झाल्यानंतर त्या देवतेचे नामस्मरण सतत करीत राहावे व स्तोत्र फक्त दिवसातून पाच वेळा म्हणावे. अखंड नामस्मरण जमू लागले, की पहिल्या प्रक्रियेची साधना संपली असे समजावे व नंतर दुसऱ्या प्रक्रियेच्या साधनेस सुरुवात करावी.

**दोन**

श्वास आत घेताना सो व सोडताना हम् असे मनात म्हणावे. याला सोहम् साधना असे म्हणतात.

ताठ बसून दररोज दोन तास सकाळी व दोन तास संध्याकाळी सोहम् ध्यान केले असता मन निर्विचार होण्यास बरीच मदत होते.

अशा प्रकारे सुमारे एक वर्षभर साधना केल्यानंतर तिसऱ्या टप्प्यातील साधना करण्यास सुरुवात करावी.

**तीन**

आत येणाऱ्या व बाहेर जाणाऱ्या श्वासावर लक्ष केंद्रित करावे, मनात कुठलाही विचार येऊ देऊ नये, सर्व लक्ष आत येणाऱ्या व बाहेर जाणाऱ्या श्वासावरच केंद्रित करावे, सोहम् असे सुद्धा म्हणू नये. या साधनेने मन निर्विचार तर होतेच; पण चिदाकाशाचे दर्शनही होते. मन निर्विचार करण्याची

साधना येथे संपते.

**२. दुर्गा : गणपती या देवाला हत्तीचे तोंड का ?**

**श्री दत्त :** गणपतीला हत्तीचे तोंड का लावले गेले या विषयी पुराणात अनेक कथा असून, या सर्व भाकडकथा आहेत. या कथांना काही अर्थ नाही.

ॐ जेव्हा ॐ उलटा काढला जातो तेव्हा तो हत्तीच्या तोंडासारखा दिसतो. यावरून ॐ या निर्गुण निराकार परब्रह्माचा साकार गणपती तयार झाला. याशिवाय मूलाधार चक्र जेव्हा जागृत होते तेव्हा साधकाला ध्यानामध्ये अनेक वेळा ऐरावताचे (पांढऱ्या हत्तीचे) दर्शन होते. अशा प्रकारे हत्तीचे चिंतन जर सतत घडत राहिले तर मूलाधारचक्र जागृत होऊन साधकाची आध्यात्म मार्गात प्रगती होईल, म्हणून हत्तीरूपी गणेशाचे पूजन करण्याची प्रथा पाडली गेली. हेच गणेश पूजनाचे रहस्य होय! मूलाधारचक्र जागृत झाल्यानंतर बुद्धी तेजस्वी होते, विविध प्रकारचे ज्ञान आपोआप होऊ लागते व हत्तीच्या चिंतनाने मूलाधारचक्र जागृत होते. म्हणून गणेश चिंतनाला महत्त्व दिले गेले. अदृश्य सृष्टीमध्ये विविध अधिपती असून, या सर्व अधिपतींची रूपे प्राण्यांचे मुख व मनुष्याचे धड अशी आहेत. ही सर्व अदृश्य सृष्टी प्रचंड अंध:कारमय असून, पृथ्वीतलावरील जवळजवळ सर्वच्या सर्व मानव जात या अंध:कारमय अदृश्य सृष्टीतील प्राण्यांची

मुखे व मनुष्याचे धड असलेल्या अधिपतींची गुलाम असते. अगदी मोठमोठे नावाजलेले लोकसुद्धा या अधिपतींच्या आधीनच असतात. कोणाचे डुकराचे तोंड असते, तर कोणाचे कुत्र्याचे तोंड असते, कोणाचे वाघाचे तोंड असते, तर कोणाचे रेड्याचे तोंड असते. अशा हजारो शक्तींचे अधिपती आपआपली सत्ता गाजवत असतात. यांच्या कोट्यावधी उपशक्ती असतात.

अंध:कारमय लोकांचे हे अधिपती सर्व विश्वावर आपली सत्ता गाजवत असतात. मनुष्य या शक्तीचा गुलाम असतो. या शक्ती मानवाला सद्‌बुद्धी होऊ देत नाहीत. स्वार्थ, अहंकार, दुष्टपणा, लोभ, गुंडगिरी, ईर्षा, द्वेष, मत्सर, आतंकवाद, खून, मारामाऱ्या, दारू पिणे, ड्रग्ज घेणे इत्यादी वाईटातील वाईट गोष्टींचा प्रभाव सर्व पृथ्वीतलावर सतत राहावा, अशी व्यवस्था अदृश्य सृष्टीतील या अंध:कारमय लोकांतील वाईट शक्ती सतत करत असतात. माणसाला चांगली बुद्धी होऊ नये, माणसाला ज्ञान होऊ नये म्हणून या वाईट शक्ती सतत प्रयत्नशील असतात.

या अंध:कारमय अदृश्यसृष्टीचा प्रांत जेथे संपतो व प्रकाशमय देव लोकांचा प्रांत जेथे सुरू होतो, तेथे ॐकार स्वरूप, परमानंदमय, ज्ञानमय, ध्यानमय, सद्‌गुणमय अशा आनंदी आनंदाचा प्रांत सुरू होतो. म्हणून भारतीय पूर्वजांनी गणपतीला प्रथम पूजेचा मान दिला आहे.

गणपतीच्या पायाजवळ उंदीर दाखवितात. याचा अर्थ असा आहे, की काळ्या शक्तीचा प्रांत आता संपला असून, चांगल्या शक्तीच्या प्रांतात म्हणजे गणपतीच्या प्रांतात साधकाने प्रवेश केला आहे. हळूहळू ही प्रथा विलुप्त होत जाईल व भावी काळात गणपतीच्या पायाशी कोणीही उंदीर दाखविणार नाही. आपल्या भाकडकथांमध्ये गणपतीचे वाहन उंदीर म्हटले आहे; परंतु ते शंभर टक्के चूक आहे. गणपती हे चांगल्या शक्तीचे प्रतीक आहे, तर उंदीर हे वाईट शक्तीचे प्रतीक आहे. गणपती हे शुभ्र धवल ज्ञानमय, परमानंदमय प्रांताचे प्रतीक आहे, तर उंदीर हे दु:खमय, दुर्गुणमय, अंध:कारमय अशा काळ्याकुट्ट प्रांताचे प्रतीक आहे.

पृथ्वीतलावरील लाखातील एखाद्या माणसाचाच गणपतीच्या प्रांतात प्रवेश होतो. गणपती म्हणजे ॐकार! याचे वाहन पांढराशुभ्र हत्ती ! येथे वाहन याचा अर्थ बैलगाडी, घोडागाडी असा नसून, गणपती ॐकार या निर्गुण निराकार देवतेच्या लहरी ज्या प्राण्यामध्ये भरपूर आहेत त्या प्राण्याला त्या देवतेचे वाहन मानले जाते. वाहन म्हणजे **प्रवाहित** होणे. पांढऱ्या हत्तीमध्ये गणपतीच्या लहरी **प्रवाहित** होत असतात.

गणपतीच्या प्रांतात प्रवेश करणे अतिशय कठीण आहे. त्याच्या रूपाचे ध्यान व्हावे म्हणून गजमुख गणपतीची पूजा नेहमी करावी, अशी प्रथा सुरू करण्यात आली. ही प्रथा अतिशय चांगली आहे. नित्य गणपतीचे स्मरण केल्याने

अंध:कारमय प्रांतातून आपली सुटका होते व प्रकाशमय प्रांतात आपला प्रवेश होतो.

गणपतीच्या बाबतीत जर आणखी विचार केला, तर गणपतीचे एक विज्ञान रूप दिसून येते. गणपती अथर्वशीर्षा मध्ये गणक ऋषी हा गणपती अथर्वशीर्षाचा कर्ता आहे, असे म्हटले जाते.

कॉम्प्युटरला संगणक असे म्हणतात. जो गणक करतो तो संगणक, म्हणजे अप्रत्यक्षरित्या कॉम्प्युटर म्हणजेच गणपती. सुरुवातीला तयार करण्यात आलेल्या कॉम्प्युटरच्या मागच्या भागाचा आकार पाहिला, तर तो गणपतीच्या सोंडेसारखा दिसतो. यावरून असे वाटते, की प्राचीन विज्ञानामध्ये गणपतीचे ईश्वरमय, ज्ञानमय, रूप होतेच; पण त्याचबरोबर कॉम्प्युटरसारखे विज्ञानमय रूप होते. या विज्ञानमय रूपाला प्राचीन भाषेत तंत्रविज्ञान म्हटले जाते. कॉम्प्युटर, इंटरनेट या दोन विषयांकडे लक्ष टाकले असता गणपती हे प्राचीनकालीन कॉम्प्युटर, इंटरनेटप्रमाणे विज्ञानरूप असले पाहिजे व गणपती या विज्ञानाचा विकास आपल्या मेंदूमध्ये गणपती मंत्राने होत असला पाहिजे.

यावरून असे वाटते, की गणपती मंत्राचा म्हणजे ॐ गं ॐ किंवा ॐ गं गणपतये नम: या मंत्राचा जप केला असता माणसाची बुद्धिमत्ता कॉम्प्युटरप्रमाणे तीव्र होण्यास हरकत नाही; तसेच या मंत्राचा आणखी जप केला असता

ज्याप्रमाणे इंटरनेटवर टाईप केलेले पत्र एका सेकंदात अमेरिकेला जाऊन पोचते, त्याप्रमाणे तीव्र प्रज्ञा प्राप्त होऊन साधकाला एका सेकंदात आपले विचार अमेरिकेला पाठविणे शक्य होईल, असे वाटते; परंतु अशा प्रकारच्या साधनेत सिद्ध होण्यासाठी अंध:कारमय प्रांतातून प्रकाशमय प्रांतात प्रवेश होणे आवश्यक आहे व तीच गोष्ट सर्वांत कठीण आहे.

**३. दुर्गा : हजारो वर्षांपासून ऋषी पर्वतांमध्ये तपस्या करीत बसले आहेत, ते खरे आहे का ?**

**श्रीदत्त :** आपण या देवात्मा हिमालयामध्ये बसून हा ग्रंथ लिहीत आहोत. या हिमालयामध्ये अनेक युगांपासून ऋषी गुप्तपणे तप करीत आहेत. भाग्यवंतांना त्यांचे दर्शनही होते. अधून-मधून यातील काही ऋषी पृथ्वीतलावर अवतार धारण करतात व आध्यात्मिक मार्गाचे पुनरुज्जीवन करतात. हिमालयाप्रमाणेच नर्मदा नदीच्या परिसरामध्ये गुप्तपणे तपस्या करणारे ऋषी आहेत. सह्याद्री पर्वत, निलगिरी पर्वत, श्रीशैल पर्वत, माऊंट अबू, आल्प्स पर्वत व उत्तर ध्रुवावरही ऋषी तपस्या करीत आहेत.

# ३. ऋषीकेश

**ह**रिद्वारहून आम्ही ऋषीकेशला आलो. ऋषीकेशला अवधूत लक्ष्मणदासजी रहात होते. ते श्रीस्वामीजींना अक्षरश: देवासारखे मानतात. श्रीस्वामीजींचा महिमा लोकांना सांगतात. त्यांचे श्रीस्वामीजींवरील प्रेम बघून हृदय हेलावून जाते. त्यांचे वय १०० च्या आसपास असावे. श्रीस्वामीजी त्यांच्यापेक्षा निम्या वयाचे असूनही, ते श्रीस्वामीजींचा उल्लेख ईश्वरकोटीचे सिद्धपुरुष म्हणून करतात. येथे मी श्रीस्वामीजींना प्रश्न विचारला.

**४. दुर्गा : गुरु व सद्‌गुरु यातील फरक काय ?**

**श्रीदत्त :** आध्यात्मामध्ये गुरु व सद्‌गुरु या दोन शब्दांना अतिशय महत्त्व आहे. अनेक प्रकारच्या विद्या शिकवणाऱ्या

व्यक्तीला गुरु म्हटले जाते, तर आत्मज्ञान देणाऱ्या व्यक्तीला सद्‌गुरु म्हटले जाते.

श्री रामदासांनी दासबोधामध्ये गुरु कोणाला म्हणावे व सद्‌गुरु कोणाला म्हणावे याचे सुंदर विवेचन केलेले आहे. त्यातील एकच ओवी सांगून मी हा विषय येथेच संपवितो.

**शिष्यासी न लाविती साधन । न करविती इंद्रिय दमन ।**
**ऐसे गुरु अडक्याचे तीन । मिळाले तरी टाकावे ।।**

श्री रामदासांनी या एकाच ओवीवरून गुरु करताना किंवा एखाद्या साधूकडे जाताना किती सावधगिरी बाळगावी हे अप्रत्यक्षरित्या सांगितले आहे.

खऱ्या सद्‌गुरुंकडे कधीही माणसांचा बाजार दिसून येत नाही कारण आध्यात्मिक प्रगती हा विषय अतिशय गुंतागुंतीचा असून, त्याचा संबंध अनेक जन्मांच्या प्रारब्धाशी असतो. म्हणून खरे सद्‌गुरु आतून प्रेमळ व बाहेरून थोडे कडक असतात. ते कधीही आपल्या भक्ताची अथवा शिष्याची पर्वा करत नाहीत.

खऱ्या सद्‌गुरुची भेट झाली व शिष्याची पात्रता असली, तर ईश्वरदर्शन दूर नाही, अखंड शांती, समाधान दूर नाही; परंतु अशी पात्रता असणारे शिष्य शोधूनही सापडत नाहीत. झटपट स्वत:चा स्वार्थ साधू अशा वृत्तीने लोक वागतात. म्हणून त्यांनाही फसविणारे गुरु भेटतात.

**५. दुर्गा : माणसाची उंची, शक्ती, बळ या गोष्टी कमी कमी होत आहेत का ?**

**श्रीदत्त :** ही गोष्ट अगदी खरी आहे. माणसाची उंची, शक्ती या गोष्टी कमी कमी होत आहेत. असे म्हणतात, की कृतयुगामध्ये माणसाची उंची २८ फूट होती. त्रेतायुगामध्ये माणसाची उंची २१ फूट होती. द्वापारयुगात माणसाची उंची १४ फूट होती व सध्याच्या कलियुगामध्ये माणसाची उंची सुरुवातीला ७ फूट होती, हळूहळू ती कमी होत ६ फुटांहून कमी झाली आहे. कलियुगाची सुरुवात होऊन ५ हजार एकशे १० वर्षे पूर्ण झाली आहेत. म्हणजे गेल्या पाच हजार वर्षांत माणसाची उंची अनेक फुटांनी कमी झाली हे सिद्ध होते. तीन-चारशे वर्षांपूर्वीचा इतिहास जर आपण पाहिला तर माणसाची उंची, शक्ती, बळ सर्व अतिशय वेगाने कमी होत आहे, हे लक्षात येईल.

सुमारे चारशे वर्षांपूर्वी होऊन गेलेला एक पराक्रमी योद्धा बाप्पा रावळ हा आपल्या तलवारीच्या एका घावामध्ये एकाच वेळी दोन रेड्यांची मुंडकी धडावेगळी करीत असे, बसल्या बैठकीला दोन बकऱ्यांचे मांस खात असे, त्याच्या तलवारीचे वजन दीडशे किलो होते व ती १२ फूट लांब होती. त्याची उंची ७ फुटांपेक्षा जास्त होती.

तीनशे वर्षांपूर्वी म्हणजे शिवाजीच्या काळातील पराक्रमी योद्धे सुमारे ७ फूट उंचीचे होते. त्यांच्या तलवारीचे वजन

शंभर किलोंच्या आसपास असे.

अडीचशे वर्षांपूर्वी होऊन गेलेल्या जयपूरच्या राजाचे कपडे म्युझियममध्ये ठेवलेले आहेत. त्याच्या शर्टाची रुंदी ४ फुटांहून अधिक आहे. त्याच्या तलवारीचे वजन साठ किलो होते.

शंभर वर्षांपूर्वी होऊन गेलेल्या शाहू महाराजांच्या तलवारीचे वजन चाळीस किलो होते.

पन्नास-साठ वर्षांपूर्वी माणसे चालत प्रवास करत, त्यामुळे त्यांचे आरोग्य उत्तम राहत असे. असा सर्व इतिहास पाहता माणसाची उंची, शक्ती, बळ या सर्व गोष्टी वेगाने कमी होत आहेत, हे तर सिद्ध होतेच; पण असे म्हणतात, की कलियुगाच्या शेवटी माणूस वांग्याच्या झाडावर शिडी लावून चढेल. (बहुदा इ. स. ६६६६ या वर्षी)

**६. दुर्गा : आत्म्यावर एकूण किती आवरणे असतात व ती कशी असतात ?**

**श्रीदत्त :** ईश्वरनिर्मित चार आवरणे आत्म्यावर असतात. भांड्यात भांडे ठेवावे, पाकीटात पाकीट ठेवावे खोक्यात खोका ठेवावा, अशी ही आवरणे असतात.

स्थूल, सूक्ष्म, कारण व महाकारण अशी या आवरणांची नावे आहेत.

स्थूल म्हणजे स्थूल देह! या स्थूलदेहाविषयी तुम्हा

आम्हा सर्वांनाच सर्व काही माहीत आहे. हे स्थूल शरीर अन्नावर जगते.

सूक्ष्म म्हणजे सूक्ष्म देह! हा सूक्ष्म देह विचारावर जगतो. मुख्य आवरणे चार असे जरी मी सांगितले असले, तरी माणसाच्या चांगल्या अथवा वाईट कर्मानुसार या सूक्ष्म देहावर अनेक आवरणे पडतात. वाईट कर्मामुळे सूक्ष्म देहाला विविध आकार प्राप्त होतात, जडत्व प्राप्त होते.

सूक्ष्म देहाचा मूळ आकार जरी माणसाच्या स्थूल देहाएवढा असला, तरी चांगल्या वाईट कर्मानुसार त्याचे प्रमाण बदलत राहते. चांगली कर्मे करणाऱ्याचा सूक्ष्म देह तेजस्वी होतो, हलका होतो व मृत्यूनंतर दिव्य लोकात प्रवेश करतो.

वाईट कर्मे करणाऱ्याचा सूक्ष्म देह अतिशय जड होतो. असे जड झालेले सूक्ष्म देह हजारो वर्षे पृथ्वीवर एकाच जागी चिकटून राहतात. वाईट कर्मे करणाऱ्यांच्या सूक्ष्म देहाला असंख्य प्रकारचे आकार प्राप्त होतात. त्याविषयी काही न बोललेले बरे! ईश्वरभक्ती, दान, जप, हवन, परोपकार या सत्कर्मांनी सूक्ष्म देह शुद्ध होतो.

कारण म्हणजे कारणदेह ! हे तिसरे आवरण आत्म्यावर असते. कारणदेहाचा आकार माणसाच्या अंगठ्याएवढा असतो. आत्म्याच्या अनेक प्रकारच्या जन्मांना कारणदेह हा मूळ कारण ठरत असतो. म्हणून याला कारणदेह असे

म्हणतात.. हा कारणदेह विविध प्रकारच्या कल्पना करत असतो. कल्पनेवरच तो जगत असतो. जोपर्यंत कारणदेह कल्पना करीत असतो, तोपर्यंत आत्म्याला मुक्ती मिळत नाही. म्हणून योगी मन कल्पनारहित करण्याचा प्रयत्न करतात. लाखो जन्मांमध्ये आपण जी काही चांगली-वाईट कर्मे केलेली असतात, चांगले-वाईट विचार केलेले असतात, चांगल्या वाईट कल्पना केलेल्या असतात, या सर्व गोष्टींचे रेकॉर्ड कारणदेहामध्ये साठलेले असते. या जन्मामध्ये प्रतिक्षण आपण जे काही करत आहोत, ते सर्व कारणदेहामध्ये रेकॉर्ड होत असते. या सर्व रेकॉर्डला आध्यात्मिक भाषेत संचित असे म्हणतात. कारणदेहाच्या ज्या केंद्रामध्ये हे सर्व संचित गोळा झालेले असते, त्या केंद्राला चित्त असे म्हणतात. चित्त शुद्ध होणे म्हणजे मन निर्विकल्प होणे. विचाररहित व कल्पनारहित होणे, जन्मोजन्मीच्या चांगल्या-वाईट कर्मांचा पूर्णपणे निचरा होणे, यालाच चित्तशुद्धी असे म्हणतात.

आत्म्यावरील चौथे व महत्त्वाचे आवरण म्हणजे महाकारणदेह! या महाकारणदेहात साक्षात ईश्वर रहात असतो, त्यामुळे महाकारणदेह हा अत्यंत शुद्ध व पवित्र असतो, ईश्वरस्वरूप असतो.

आपली जाणीव देहापुरतीच मर्यादित असते. त्यामुळे मी म्हणजे देहच आहे, असे वाटते. वृद्धापकाळामध्ये जेव्हा आपलेच शरीर आपल्याला साथ देईनासे होते तेव्हा कोठे

एखाद्या पुण्यवान माणसाच्या लक्षात येते, की मी देह नव्हे; परंतु तोपर्यंत आयुष्य संपलेले असते.

**'मी कोण आहे !'** हे जाणण्यासाठीच ईश्वरभक्ती, साधना, तपस्या करायच्या असतात; परंतु दुर्दैवाने शेकडो साधू शक्ती सामर्थ्य प्राप्त करण्यासाठी साधना तपस्या करतात, वातावरणातील आत्मे आपल्या आधीन करून विविध प्रकारचे चमत्कार दाखवितात. अशा साधकांच्या हातून दोन महापातके घडतात.

१) आत्म्यांना वश केल्याकारणाने त्यांच्या स्वत:च्या आत्म्यावर असंख्य प्रकारची आवरणे पडतात. त्यामुळे मुक्तीचा-जीवनमुक्तीचा व आत्मज्ञानाचा मार्ग लाखो वर्षां-करिता बंद होतो.

२) समाजाला फसविल्याचे, चुकीच्या मार्गाला लावल्याचे पातक लागते.

या प्रश्नाचे उत्तर सविस्तर रितीने अशाकरिता दिले आहे; कारण ईश्वरभक्ती, साधना करणाऱ्या लोकांनी आपण काय करत आहोत, हे नीट समजून करावे.

**७. दुर्गा : मी कोण आहे हे कसे ओळखावे ?**

**श्रीदत्त :** मी कोण आहे हे ओळखण्याचे अनेक मार्ग आहेत. प्रत्येकाने आपआपल्या पात्रतेनुसार मार्ग निवडावा व त्या मार्गाची साधना करावी व टप्प्याटप्प्याने पुढे जावे.

## सर्वोत्कृष्ट मार्ग

विचार व कल्पना यांचा पूर्णपणे त्याग करावा. मनात एकही विचार अथवा कल्पना येऊ देऊ नये. सलग चाळीस दिवस हे जमल्यास एखादा स्फोट व्हावा त्याप्रमाणे सहस्रार चक्रामध्ये लख्ख प्रकाश पडतो व त्या प्रकाशात स्वत:चे अस्तित्व नष्ट होते व मी ईश्वर आहे, असा साक्षात्कार होतो.

## सर्वोत्तम मार्ग

श्वासाला आज्ञाचक्राकडून सहस्रारचक्राकडे नेण्याचा प्रयत्न करावा व त्याच वेळी अंतर्दृष्टीने आकाशातील ढगांचे निरीक्षण करावे. या साधनेने चिदाकाशाचे दर्शन होऊ लागते.

## अतिउत्तम मार्ग

श्वास घेताना व सोडताना त्यावर लक्ष केंद्रित करावे, मनाला अन्य कोठेही जाऊ देऊ नये. श्वासाबरोबर एकरूप होण्याचा प्रयत्न करावा. या साधनेने लययोग साध्य होतो. लययोगात जसजसी प्रगती होईल तसतसे ज्ञान व सिद्धी प्राप्त होऊ लागतात. तिकडे दुर्लक्ष करावे. दुर्लक्ष न केल्यास साधकाची फसगत होते. या लययोगामध्ये प्रावीण्य मिळाल्यास वरील सर्व साधना आपोआप येऊ लागतात व ईश्वराशी एकरूपता साध्य होते, जीवनमुक्त सिद्धावस्था प्राप्त होते.

## उत्तम मार्ग

श्वास घेताना सो व सोडताना हम् असे सारखे म्हणत राहावे, याला अजपागायत्री असे म्हणतात; तसेच सोऽहम् ध्यान असेही म्हणतात. या साधनेने मनाची एकाग्रता वाढत जाते. वातावरणातील अनेक आत्म्यांशी परिचय होतो. त्यांच्याकडून ज्ञान मिळविता येते, जीव पवित्र व पुण्यात्मा बनतो व परमहंस अवस्था प्राप्त होते.

ज्यांच्याजवळ खूप पुण्याई आहे, अशा साधकांनाच या साधना करणे शक्य होते. प्रारब्धाची शुद्धी झाली नसेल तर वर वर्णन केलेल्या साधना करणे शक्य होत नाही. अदृश्य सृष्टीतून अडथळे येतात. अशा साधकांनी खाली दिलेल्या साधना कराव्यात.

१) सात्त्विक देवतेच्या स्तोत्राचे लाखो पाठ करावेत. श्री दत्त स्तोत्र, श्री दुर्गा स्तोत्र, श्री विष्णू सहस्रनाम, श्री गणपती स्तोत्र, श्री ललिता सहस्रनाम, श्री देवीसूक्त, श्री नारायणी स्तुती, श्री देवीकवच यापैकी एखाद-दुसऱ्या स्तोत्राचे हजारो पाठ करावेत, म्हणजे त्या देवतेची कृपा होते व ती पुढील मार्ग दाखविते.

२) एखाद्या देवतेच्या मंत्राचा अखंड जप करत राहावे. या मार्गानेही देवतेची कृपा प्राप्त होते व ती पुढील मार्ग दाखविते; मात्र देवता सात्त्विक असावी.

वरील दोन्ही साधना करताना थोडाफार दानधर्म करत राहावे. याने प्रारब्धाची शुद्धी होऊन पुढील मार्ग मिळण्यास मदत होते व उद्धाराचा मार्ग सापडतो.

# ४. नैनिताल

**नै**निताल येथे पार्वती देवीचे नयन पडले, म्हणून येथील देवीचे नाव नयनादेवी! येथे देवीच्या मंदिरासमोरच एक तलाव आहे म्हणून या गावाचे नाव नैनिताल! ताल म्हणजे तलाव! (पार्वती देवीचे नयन पडले म्हणजे काय हे आपण हरिद्वार येथील वृत्तान्त वाचावा म्हणजे कळेल.)

नैनिताल हे हिमालयातील अतिशय निसर्गरम्य ठिकाण असून, येथील काही भागात बर्फ पडतो. येथील सनसेट पॉइंटवरून बर्फाने झाकलेली हिमालयाची अनेक शिखरे दिसतात. या पॉइंटचे नाव जरी सनसेट पॉइंट असले, तरी सकाळी दहा वाजल्यापासूनच बर्फाची शिखरे पाहण्यासाठी लोकांची गर्दी होते.

येथून पाच किलोमीटरवर खुरपा-ताल आहे. या

तलावाचा आकार गाईच्या खुरासारखा आहे. म्हणून त्याला खुरपा-ताल असे म्हणतात.

येथून हल्दवानी रोडवर हनुमान गढी नावाचे हनुमंताचे स्थान आहे. नैनितालजवळच नौकुचिया ताल नावाचा एक मोठा तलाव असून, या नौकुचिया ताल येथे जाण्याच्या तीन किलोमीटर अगोदर मारुतीची एक प्रचंड मूर्ती असून, जवळच दुर्गादेवीचे मंदिर आहे.

नैनितालहून चोवीस किलोमीटर दूर भीमताल आहे. नैनितालच्या आसपास असणाऱ्या सर्व तलावांमध्ये लोक नौकाविहाराचा आनंद घेतात.

नैनितालहून साठ किलोमीटर दूर मुक्तेश्वर आहे. नैनितालहून पासष्ट किलोमीटर दूर अल्मोडा आहे. नैनिताल अल्मोडा रस्त्यावर वाटेत भवाली नावाचे एक जंक्शन आहे. येथून एक रस्ता मुक्तेश्वरला जातो, एक अल्मोड्याला जातो व एक भीमताललला जातो.

नैनिताल-अल्मोडा रस्त्यावर कैची धाम नावाचे एक स्थान असून, हे नीम करौलीबाबांचे स्थान आहे. येथून आणखी थोडे पुढे गेल्यावर खैरना येथे नीम करौलीबाबांचे एक स्थान आहे. खैरनाहून एक रस्ता अल्मोड्याला जातो व एक रस्ता राणीखेतला जातो. नैनिताल अल्मोडा या रस्त्यावरच खैरनाच्या पुढे कांकरिया घाट हे स्थान असून, येथे स्वामी विवेकानंदांना दिव्य अनुभूतीचा अनुभव आला.

या स्थानाहून अगदी जवळच नीम करौलीबाबांचे एक सुंदर स्थान आहे. या प्रत्येक देवस्थानामध्ये बसून 'श्री स्वामींजी' कडून प्रश्नांची उत्तरे मिळवत स्थानदेवतांचे आशीर्वादही मिळविण्याची माझी इच्छा आहे. सध्या मात्र नयना देवीच्या चरणापाशी बसून, हे लिखाणाचे काम करत आहे.

**८. दुर्गा : काही माणसे खूप नामस्मरण स्तोत्रवाचन करतात, पोथ्या वाचतात, तरीपण त्यांना म्हणावे तसे अनुभव येत नाहीत. अशी माणसे ईश्वर आमच्याविषयी असा निष्ठूर का ? असे म्हणतात.**

**श्रीदत्त :** खरे म्हणजे या प्रश्नाचे उत्तर सविस्तर द्यायला हवे; परंतु स्थलकालाच्या अभावामुळे सोप्या भाषेत व थोडक्यात उत्तर देण्याचा प्रयत्न करतो.

पहिली गोष्ट म्हणजे प्रत्येक माणसाला दु:ख हे त्याच्या कर्मानुसार भोगावे लागते. काही कर्मे अज्ञानामुळे घडतात व त्यातून दु:ख निर्माण होते. अशा वेळी ईश्वरभक्ती व प्रार्थना केली असता या दु:खाचे निवारण होते; परंतु माणसाची काही कर्मे जाणूनबुजून परिणामाची पर्वा न करता केलेली असतात. अशा कर्मांमुळे पिढ्यान्‌पिढ्या दु:ख भोगण्याची वेळ येते. अशा वेळी ईश्वरी उपासना, नामस्मरण, भक्ती वगैरेचा परिणाम दिसून येण्यास खूप कालावधी लागतो.

**९. दुर्गा : २४ सप्टेंबर १९९५ रोजी गणपतीच्या; तसेच इतर देवतांच्या मूर्ती दूध प्यायल्या याचे रहस्य काय?**

**श्रीदत्त :** त्या वेळी पितृपक्ष सुरू होता. हिंदू धर्मातील मान्यतेप्रमाणे पितृपक्षामध्ये पितृलोकातील पितर खाली येतात व आपल्या वंशजांनी दिलेला भोग ग्रहण करतात.

पृथ्वीतलावरील एक वर्ष म्हणजे पितृलोकातील एक दिवस (२४ तास). यातील दुपार म्हणजे पृथ्वीतलावरील पितृपक्षाचे पंधरा दिवस. या काळामध्ये आपल्या पूर्वजांच्या नावाने आपण जे काही भोगपदार्थ त्यांना अर्पण करतो, ते त्यांना पोहचतात अशी श्रद्धा आहे. (मृतात्म्यांनी तसे सांगितले आहे.) त्यामुळे त्यांना तृप्ती मिळते व त्यांचे आशीर्वाद घराण्याला प्राप्त होतात.

सध्याच्या काळामध्ये अशा गोष्टींकडे भाकडकथा किंवा अंधश्रद्धा म्हणून दुर्लक्ष केले जाते. हे बरोबर नाही; कारण प्रत्येकाला एक दिवस शरीर सोडून प्रेत, पिशाच्च, भूत, पितर अशा कुठल्यातरी लोकात जायचेच असते. लाखातील एखादाच देवलोकांत जातो.

पृथ्वीतलावरील अश्रद्ध वातावरणामुळे भूत, प्रेत, पिशाच्च, पितर या लोकांतील असंख्य आत्मे अतृप्त आहेत. या अतृप्त आत्म्यांना मूर्तीच्या द्वारे एक-दोन दिवस दूध ग्रहण करण्याची परवानगी दिली. त्यामुळे कोट्यावधी आत्म्यांनी या संधीचा फायदा घेऊन मूर्तीद्वारे दूध ग्रहण

केले व जगभर हा चमत्कार दिसून आला. या चमत्काराचा अर्थ हाच !

**१०. दुर्गा : पितरांच्या नावाने जे काही भोगपदार्थ (अन्न, खीर, दूध, वडे, वरण, भात, दही इत्यादी) बाजूला काढले जातात ते घरातच ठेवावेत का बाहेर ?**

**श्रीदत्त :** पितरांच्या नावाने काढलेले पदार्थ घराच्या बाहेर ठेवावेत. हे पदार्थ कावळ्याने खाल्ले असता चांगले असते. पितर यातना भोगत असतील, तर पितरांच्या नावाने काढलेला पदार्थ कावळा खात नाही. ही क्रिया केव्हाही करायला हरकत नाही; परंतु भाद्रपद महिन्यात करणे जास्त चांगले.

**११. दुर्गा : मृतात्मे श्वासोच्छ्वास करतात का ?**

**श्रीदत्त :** चांगल्या-वाईट कर्मांमुळे मनुष्याच्या आत्म्यावर चांगली-वाईट आवरणे पडतात. ही आवरणे लाखो प्रकारची असू शकतात. त्यावर एक स्वतंत्र ग्रंथ लिहिला तरी सुद्धा माहिती पूर्ण होणार नाही, म्हणून येथे काही प्रकार थोडक्यात सांगतो.

जो मनुष्य वाईट कर्मे करतो त्याचा आत्मा जड होतो, पिशाच्च बनतो, डांबरासारखा काळा बनतो. अशी पिशाच्चे जमिनीला चिकटून राहतात. त्यांना (earth bound spirits) भू-पिशाच्चे असे म्हणतात. ही पिशाच्चे श्वासोच्छ्वास करतात.

एकाच जागी जमिनीला चिकटून ही पिशाच्चे हजारो वर्षे राहतात. आमच्या पापी पूर्वजांनी ज्या स्त्रीयांना नवऱ्याच्या चितेबरोबर जाळले किंवा त्यांना जळून जाण्यास भाग पाडले, ज्या स्त्रीयांनी जोहार केला ते सर्व आत्मे अजूनही पिशाच्च लोकात अडकलेले आहेत व त्यांना प्रेरित करणारेही पिशाच्च लोकात अडकले आहेत व या कर्माची शिक्षा म्हणून हिंदुस्थानला १३०० वर्षे मुस्लिमांची गुलामी करावी लागली.

भू-पिशाच्चे श्वासोच्छ्वास करतात. एकाच जागी जखडल्याच्या यातना त्यांना होत असतात. जेथे जोहार केला गेला अशा राजवाड्यांमध्ये आजही स्त्रीयांच्या किंकाळ्या ऐकू येतात. ज्या राजवाड्यांमध्ये हत्याकांडे घडली, खून झाले, अशा राजवाड्यांमध्ये हजारो वर्षे होऊन गेली तरी किंकाळ्यांचे आवाज येत असतात. 'वाचवा, वाचवा' असे आवाज येत असतात. अशा प्रकारच्या सर्व मृतात्म्यांना भू-पिशाच्चे असे म्हणतात व ही सर्व भू-पिशाच्चे श्वासोच्छ्वास करतात मात्र त्यांच्या श्वासाचा आवाज एखाद्या विहिरीतून हवा बाहेर यावी असा खोल असतो.

गळफास लावून घेऊन ज्यांनी आत्महत्या केली आहे, अशा पिशाच्च्यांची अवस्था प्रचंड केविलवाणी असते. श्वास घ्यायला मिळावा म्हणून ते तडफडत असतात व ही त्यांची तडफड शेकडो वर्षे होत असते. कुठल्या आत्म्याची तडफड केव्हा थांबणार हे फक्त ईश्वरच सांगू शकतो.

काही पिशाच्चे अशी असतात, की जी घरात रहात असतात व घरातल्या घरात फिरत असतात. अशी पिशाच्चेही श्वासोच्छ्वास करतात.

या स्टेजच्या पलीकडे जे मृतात्मे असतात, त्यांना श्वासोच्छ्वास करण्याची गरज पडत नाही. त्यांचे अस्तित्व श्वास विरहित असते. या पलीकडचा प्रांत अर्धदेवतांचा असतो. अर्धदेवताही श्वासोच्छ्वास करत नाहीत. त्यांनाही श्वासोच्छ्वासाची गरज नसते. अर्धदेवतांच्या पलीकडे दिव्यलोकांचा प्रांत असतो. पृथ्वीतलावरून जे पुण्यवान आत्मे दिव्यलोकात जातात त्यांनाही श्वासोच्छ्वास करण्याची गरज नसते कारण त्यांचे देह आकाशतत्त्वाचे असतात, अतिशय दिव्य असतात.

# ५. मुक्तेश्वर

**श्री**स्वामी दत्तावधूत यांच्या बरोबर मी हिमालयात प्रवास करत असून, मृतात्मे श्वासोच्छ्वास करतात का, या प्रश्नाचे उत्तर श्रीस्वामीजींनी मला हिमालयातील मुक्तेश्वर या ठिकाणी सांगितले. हे ठिकाण सुमारे नऊ हजार फूट उंच असून, हिवाळ्यात येथे बर्फ पडतो. या ठिकाणाहून हिमालयाचे विलोभनीय दर्शन घडते. हिमालयाची पांढरीशुभ्र शिखरे येथून खूप सुंदर दिसतात.

| | |
|---|---|
| **नंदागुंटी पर्वत उंची** | **२०७७० फूट** |
| **त्रिशूल पर्वत उंची** | **२३३६० फूट** |
| **ईस्ट त्रिशूल उंची** | **२२३२० फूट** |
| **नंदादेवी उंची** | **२५६४५ फूट** |

| | |
|---|---|
| **नंदादेवी ईस्ट उंची** | **२४३९१ फूट** |
| **नंदा कोट उंची** | **२२५१० फूट** |
| **पंचचुली उंची** | **२२६५० फूट** |

अशा अनेक पर्वतांचे विलोभनीय दृश्य येथून दिसत आहे. यापैकी नंदादेवी पर्वतामध्येच बद्रिनाथाचे स्थान आहे. तेथून पुढे सुमारे ५०-६० किलोमीटर अंतरावर गोमुख आहे. अशा पवित्र वातावरणामध्ये या ग्रंथाचे लिखाण सुरू आहे.

हिमालयातील पवित्र वातावरणामध्ये श्रीस्वामीजींकडून जास्तीत जास्त प्रश्नांची उत्तरे मिळविण्याचे मी ठरविले आहे.

# ६. कांकरिया घाट

**१२. दुर्गा : मनुष्य देव बनू शकतो काय ?**

**श्रीदत्त :** हा प्रश्न तुम्ही अशा जागी विचारत आहात, जेथे स्वामी विवेकानंदांना देवत्व प्राप्त झाले. हिमालयातील या जागेला कांकरिया घाट म्हणतात. या जागेमध्ये असणाऱ्या विशाल पिंपळाखाली स्वामी विवेकानंदांना देवत्व प्राप्त झाले. येथून जवळच एक विशाल वटवृक्ष आहे. त्या जागी नीम-करौलीबाबा, सोमवारीबाबा, गोधडीबाबा या हिमालयातील तीनही संतांना देवत्व प्राप्त झाले. अशा जागी तुम्ही हा प्रश्न मला विचारलात त्याबद्दल धन्यवाद देतो. दुर्गादेवीच तुमच्या मुखाने प्रश्न विचारून लोकजागृतीचे कार्य करत आहे, तुम्ही हिमालयात आलात तेव्हाच हे मला लक्षात आले. ऋषीकेशला तुमच्याविषयी लक्ष्मणदासजी पण असेच म्हणाले.

आपण हरिद्वारला होतो तेव्हा मला भेटायला हरिदास आले होते. हरिदास खूप मोठे साधक आहेत. हिमालयामध्ये तेरा हजार फूट उंचीवर ते कायम राहतात व गायत्री मंत्राचा दररोज नऊ हजार जप करतात. याशिवाय वर्षातून तीन महिने गोमुखाच्या वरती तपोवनामध्ये सुमारे बावीस हजार फूट उंचीवर साधना करतात. ते सुद्धा मला म्हणाले की, या साक्षात् दुर्गादेवी आहेत, खूप मोठे ईश्वरी कार्य करत आहेत व त्यांच्या हातून अजूनही मोठे ईश्वरी कार्य होणार आहे. या सर्व गोष्टी मनुष्य देव बनू शकतो, याचा पुरावा नाहीत काय? अल्मोड्याला स्वामी विवेकानंद ज्या घरात रहात होते ते घर आपण पाहिले. ज्या देवदार वृक्षाखाली स्वामी विवेकानंदांनी भगिनी निवेदिताला अनुग्रह दिला, तो वृक्षही आपण पाहिला. म्हणजे भगिनी निवेदिता यांनी देवत्वाच्या दिशेने पहिले पाऊल जेथे टाकले ती जागाही आपण पाहिली. याचाच अर्थ माणसाला देवत्व प्राप्त होऊ शकते. माणसाचा जन्मच मुळी देव बनण्यासाठी झाला आहे. पृथ्वीतलावर जन्माला आल्यानंतर दानधर्म, परोपकार, ईश्वरभक्ती, साधना, ध्यान इत्यादी सत्कर्मांचे आचरण करून मनुष्य देव बनू शकतो. देव बनणे म्हणजे स्वत:च्या आत्म्याला तेजस्वी करणे, प्रकाशमान करणे, प्रकाशमय करणे. असा प्रकाशमान आत्मा मृत्यूनंतर प्रकाशमय लोकांमध्ये म्हणजे देवलोकांमध्ये प्रवेश करतो.

मनुष्य ही मधली स्थिती आहे. स्वत:च्या कर्माने मनुष्य देव अथवा दानव बनू शकतो किंबहुना देव बनण्यासाठीच आत्म्याला मनुष्याचा जन्म देव देत असतो. परोपकार करणारी माणसे, ईश्वरचिंतन करणारी माणसे देव बनतात. प्रेमाने वागणारी माणसे, प्रेमाने इतरांची सेवा करणारी माणसे, नि:स्वार्थ माणसे देव बनतात.

स्वार्थी माणसे, अहंकारी माणसे, लांड्या-लबाडी करणारी माणसे, इतरांना फसवणारी माणसे, फक्त स्वत:चाच विचार करणारी माणसे, जनतेला लुबाडणारे पुढारी- राजकारणी, दानव, राक्षस, सैतान बनतात व ईश्वरी शिक्षेला प्राप्त होतात.

काय बनायचे हे ज्याचे त्याने ठरवायचे असते. मार्ग दाखविण्यासाठी ईश्वर साधू-संतांना पृथ्वीवर पाठवीत असतो; परंतु सध्याच्या कलियुगामध्ये खरे साधू-संत भेटणे अतिशय दुर्मिळ झाले आहे. यासाठी ईश्वरचिंतन करून स्वत:चा मार्ग स्वत:च शोधणे जास्त बरोबर !

**१३. दुर्गा : गंगा नदीत स्नान केल्याने पाप नष्ट होते, असे म्हणतात, ते खरे का ?**

**श्रीदत्त :** होय, गंगा नदीत स्नान केल्याने पाप नष्ट होते, ही गोष्ट शंभर टक्के खरी आहे. माझे हे उत्तर ऐकून अनेक भक्त मला अंधश्रद्धाळू म्हणतील; पण मी तुम्हाला माझा एक अनुभव

सांगतो.

एका माणसाच्या अंगावर पांढरे डाग होते. मी त्याला उपाय सांगितला. ऋषीकेशपासून दहा मैलावर गंगा नदीत स्नान कर !

त्या माणसाने सहा महिने श्रद्धेने गंगा नदीत स्नान केले आणि त्याच्या शरीरावरील पांढरे डाग नष्ट झाले. माझ्या या अनुभवावरून गंगा नदीत स्नान केल्याने पाप नष्ट होते ही गोष्ट सिद्ध होते.

### १४. दुर्गा : पृथ्वीला आत्मा असतो का ?

**श्रीदत्त** : आपण प्रथम माणसाच्या शरीराचा विचार करू! माणसाला आत्मा असतो हे सर्वांनाच माहीत आहे; पण माणसाच्या शरीरात असंख्य जीव-जंतू रहात असतात. शिरांमध्ये शुद्ध व अशुद्ध रक्त वाहत असते. हे रक्त वाहण्यासाठी वायूच्या प्रेशरची गरज असते म्हणून शरीरात प्राणवायूही वाहत असतो. हे जसे आपल्या शरीराचे दिसून येते; तसेच पृथ्वीच्या शरीरातही पाणी, पेट्रोल, डिझेल वाहत असते व असंख्य प्रकारचे वायू वाहत असतात. माणसाच्या शरीरात उष्णता असते. पृथ्वीच्या शरीरात आग असते. कधी कधी ती ज्वालामुखीच्या रूपाने बाहेरही पडते.

माणसाच्या देहात व पृथ्वीच्या देहात जर साम्य दिसून येते, तर पृथ्वीलाही आत्मा असलाच पाहिजे.

पृथ्वीला आत्मा आहेच इतकेच नव्हे तर संपूर्ण ब्रह्मांडात जितके ग्रह, नक्षत्र व तारे आहेत, त्या प्रत्येकाला आत्मा आहेच. इतकेच नव्हे तर त्या प्रत्येक आत्म्याचा स्वभाव वेगवेगळा आहे.

आमच्या प्राचीन ऋषी-मुनींनी अंतर्ज्ञानाने या ग्रह-ताऱ्यांचे स्वभाव ओळखून, त्यांच्या गती ओळखून त्यांना नावे दिली आहेत. उदाहरणार्थ -

शनी म्हणजे जो हळूहळू चालतो तो! शनी ग्रहाचा वेग खूप मंद आहे म्हणून त्याला शनी हे नाव देण्यात आले. हा शनी न्यायप्रिय आहे. तो आध्यात्मात प्रगती करून देतो. आध्यात्मात प्रगती करताना खूप कष्ट देतो, ज्ञानही देतो, चुकीचे वागल्यास शिक्षाही करतो. ज्योतिषशास्त्रामध्ये शनी ग्रहाच्या स्वभावाचे व कार्याचे विस्तृत वर्णन आहे. इतरही सर्व ग्रहांच्या, नक्षत्रांच्या स्वभावाचे वर्णन ज्योतिषशास्त्रात केलेले आहे. मानवी जीवनावर ग्रह-नक्षत्रे कसा प्रभाव पाडतात याचे सविस्तर वर्णन ज्योतिषशास्त्रात केलेले आहे. यावरून ग्रह-नक्षत्र ताऱ्यांना, आत्मा असतो हे सिद्ध होते.

एका माणसाने एकदा मला सांगितले, की खुनाच्या खोट्या आरोपाखाली त्याला अटक करण्यात आली व जेलमध्ये पाठविण्यात आले. जेलमध्ये त्याने शनिमहात्म्य वाचल्यानंतर एक दिवस त्याला स्वप्न पडले.

‘स्वप्नात एक मनुष्य आला व तो त्याला म्हणाला की,

मी शनिदेव आहे, उद्या तुझी निर्दोष सुटका होईल !'

सकाळी उठल्यानंतर त्या गृहस्थाला स्वप्न आठवून खूप आश्चर्य वाटत होते व आपली सुटका होणार याचा त्याला आनंदही होत होता.

आश्चर्य अशासाठी वाटत होते, की आज आपली सुटका कशी होणार; कारण आज तर आपली कोर्टाची तारीखच लागली नाही; कारण जर तारीख लागली असती, तर ते आदल्या दिवशी कळले असते पण आता एक-दोन दिवसांत आपली तारीख लागेल व आपली सुटका होईल हा आनंदही त्याला होत होता. अशा प्रकारे तो आपल्याच विचारात मशगूल असताना पोलीस आला व त्याला म्हणाला, की आज तुला कोर्टात जायचे आहे.

तो पोलिसांबरोबर कोर्टात गेला व कोर्टाने त्याला निर्दोष सोडून दिले. अशा प्रकारे शनिदेवाने त्याच्यावर झालेला अन्याय दूर केला; कारण त्याच्यावर खोटा आरोप ठेवलेला होता.

यावरून शनी हा आकाशात फिरणारा नुसता ग्रह नसून, त्या शनी ग्रहाला आत्मा आहे व तो अन्याय दूर करतो व प्रार्थनेने प्रसन्न होतो हे सिद्ध होते.

अशा प्रकारे आपल्याला आकाशात जेवढे ग्रह, नक्षत्र, तारे दिसतात त्या सर्वांना आत्मा आहे, स्वभाव आहे व ईश्वराने त्यांना जे जे अधिकार दिले आहेत, त्या अधिकारा-

नुसार ते कार्य करत असतात हे सिद्ध होते. पृथ्वीलाही आत्मा आहे. पृथ्वीवरील लोक जेव्हा वाईट वागतात तेव्हा पृथ्वीची प्रकृती बिघडते, तिला आजारपण येते हेही तितकेच खरे आहे.

# ७. अल्मोडा

**आ**म्ही अल्मोड्याला पोचलो. अल्मोडा येथे स्वामी विवेकानंदांचा आश्रम आहे. अल्मोडा येथे ज्या जागेमध्ये स्वामी विवेकानंद राहत असत, ती जागा आम्ही पाहिली. बद्रिप्रसाद शहा यांची ती जागा असून, सध्या त्यांचे नातू गिरीश शहा ती सांभाळत आहेत. त्यांनी स्वामी विवेकानंदांच्या वापरातील सर्व वस्तू आम्हाला दाखविल्या. ज्या वृक्षाखाली भगिनी निवेदिताला त्यांनी दीक्षा दिली तो वृक्षही दाखविला. त्यांच्या सहवासात थोडा वेळ राहून आम्ही तेथून पुढे निघालो व जवळच असणाऱ्या कासारदेवीला जाऊन थांबलो. कासारदेवी हे स्थान अल्मोड्यापासून सुमारे दहा किलोमीटर वर असून, आठ हजार फूट उंचीवर आहे. येथून तिबेट खूप जवळ आहे.

**१५. दुर्गा : मूर्तीत देव असतो का ?**

**श्रीदत्त :** चैतन्य लहान बाळाला मोठे बनविते, पुरुष अथवा स्त्री करते, पिता अथवा माता बनविते आणि शरीराला वृद्धापकाळ आल्यानंतर सोडून जाते. बीजाला अंकूर बनविते, अंकुराला रोपटे बनविते, रोपट्याला वृक्ष बनविते व वृक्ष वृद्ध झाल्यानंतर वृक्षालाही सोडून जाते. हे चैतन्य सर्वव्यापी आहे; तसेच ते दगडातही असते. या दगडातून मूर्ती बनविली असता त्या मूर्तीतही ते चैतन्य असते. आपण त्या चैतन्याला राम, कृष्ण, देवी अशी नावे देतो व जशी आपण नावे देतो, त्या नावाप्रमाणे चैतन्य प्रतिसाद देते. चैतन्य हे सर्वत्र असते, त्याप्रमाणे दगडातही असते व मूर्तीतही असते. हे चैतन्य म्हणजेच ईश्वर !

पुष्कळ वेळा अदृश्यसृष्टीतील आत्म्यांना पाषाणात किंवा मूर्तीत निवास करून परोपकार करण्याची संधी मिळते. अशी स्थाने जागृत देवस्थान म्हणून प्रसिद्ध होतात.

शिला, पाषाण, खडक, मूर्ती, झाडे यामध्ये निवास करून राहणाऱ्या अनेक आत्म्यांना मी पाहिलेले आहे व त्यांच्याशी बोललो आहे, त्यांचे सुख-दु:ख जाणून घेतले आहे. हिंदू धर्म सर्व वस्तूंचा सन्मान करण्यास, सर्वांवर प्रेम करण्यास शिकवितो.

पाषाण, वृक्ष इत्यादींमध्ये राहणाऱ्या आत्म्यांविषयी मला अनेक अनुभव आहेत. त्यातील एक-दोन अनुभव

तुम्हाला सांगतो.

महालक्ष्मीचे एक प्रसिद्ध मंदिर होते. या मंदिरामध्ये दररोज ४००-५०० लोक दर्शनाला येत असत. या मंदिरापासून १ किलोमीटर दूर अंतरावर एका घरामध्ये माझा ४-५ दिवस मुक्काम होता. मी तेथे ध्यान-साधना करत होतो. एक दिवस दुपारच्या वेळी ध्यान करत असताना गुढघ्यांवर व कोपरांवर चालत, एक स्त्री माझ्याकडे आली. ती अर्धनग्न अवस्थेत होती. तिच्या अंगावर कित्येक वर्षांत न धुतलेल्या साडीचा एक तुकडा होता. तिच्या केसांमध्ये व अंगावर माती होती. यावरून तिने कित्येक महिन्यांत स्नान केलेले नव्हते, हे सिद्ध होत होते.

तिची अवस्था बघून मला खूप वाईट वाटले. मी आस्थेने तिची चौकशी केली. तेव्हा ती म्हणाली, 'महालक्ष्मी मंदिर म्हणून जे मंदिर आहे, त्या मंदिरात जी शिला आहे, त्या शिलेत मी राहते. त्या शिलेलाच लोक महालक्ष्मी म्हणून नमस्कार करतात. मी शेकडो वर्षे या शिलेत राहिले. आता मला थोडी परोपकाराची संधी मिळाली आहे. माझ्या स्थानात येणाऱ्या लोकांना ईश्वराच्या कृपेने काही अनुभव येतात व त्याचे कणभर श्रेय मला मिळते. तुमचे दर्शन ही सुद्धा त्या ईश्वराचीच कृपा.' असे म्हणून नमस्कार करून ती निघून गेली. मी सुद्धा तेथून दुसरीकडे निघून गेलो. सुमारे वर्षभरानंतर मी त्या जागेमध्ये पुन्हा ३-४ दिवसांसाठी गेलो आणि ध्यानाला बसलो. ४०-४५ वर्षांची एक स्त्री सुंदर साडी नेसलेली, थोडे फार अलंकार घातलेली

अशी माझ्या समोर आली.

मी तिला विचारले, 'आपण कोण?' तेव्हा ती म्हणाली, 'गेल्या वर्षी गुढघ्यांवर व कोपरांवर तुमच्याकडे चालत आलेली अतिशय लाचार व गरीब स्त्री तुम्हाला आठवते का?'

मी म्हणालो 'होय ! चांगलीच आठवते.'

'ती स्त्री मीच होते.' तिचे उद्‌गार ऐकून मला जोरदार धक्का बसला. मला काय बोलावे सुचेना. एवढ्यात ती स्त्री म्हणाली, 'आज मी तुम्हाला हे सांगायला आले आहे, की खऱ्या सत्पुरुषाच्या दर्शनाने आत्म्याचा किती व कसा उद्धार होतो. माझ्या स्थानाजवळून यापूर्वी अनेकदा तुम्ही गेलात. तुमची स्पंदने मला मिळाली. त्यामुळे ईश्वराची कृपा झाली व उद्धाराचा मार्ग मिळाला. तुमच्याच शक्तीमुळे लोकांना अनुभव येऊ लागले. तुमच्या दर्शनाची परवानगी मला ईश्वराने दिली. कशा अवस्थेत मी तुमच्या दर्शनाला आले, हे तर तुम्ही पाहिलेच.'

'तुमच्या दर्शनाने मला कसे रूप प्राप्त झाले ते दाखविण्यासाठी व तुमच्या दर्शनासाठी मी आले आहे. खऱ्या सत्पुरुषाच्या दर्शनाने कुरूप, बेढब व लाचार आत्मासुद्धा सर्वांगसुंदर होतो, हेच मला तुम्हाला सांगायचे आहे. अशीच कृपादृष्टी ठेवा.' असे म्हणून ती स्त्री अदृश्य झाली.

नागार्जुन सागर येथील आश्रमामध्ये मी स्वत: काही वृक्ष

लावले होते. त्यात औदुंबर, वड, पिंपळ यांची झाडे होती. या वृक्षांना पाणी देण्याकडे मी जातीने लक्ष देत असे. याशिवाय आश्रमामध्ये एक नोकर ठेवला होता. झाडांची निगा राखणे, बगीचा स्वच्छ ठेवणे, झाडांना पाणी देणे अशी कामे त्याला नेमून दिली होती.

दहा-बारा दिवसांसाठी मला बाहेरगावी जावे लागले. प्रवासाहून जेव्हा परत आलो व ध्यान करत बसलो तेव्हा ईशान्य दिशेकडील पिंपळ वृक्षाने मला सांगितले, की 'रामय्याने मला आठ दिवसात पाणी दिले नाही!'

मी रामय्याला तसे विचारताच, 'मी नियमितपणे दोन वेळा पाणी दिले', अशा थाप त्याने मारली. तिकडे दुर्लक्ष करून मी त्याला पिंपळ वृक्षाला पाणी द्यायला लावले.

त्याच दिवशी संध्याकाळी हिल कॉलनीतून गुंडू नरसिंहा नावाचा भक्त आला. त्या भक्ताला रामय्या म्हणाला, 'मी पिंपळ वृक्षाला आठ दिवस पाणी दिले नाही हे खरे आहे; पण ही गोष्ट स्वामीजींना कशी कळली ते मला कळत नाही.' यावरून एक गोष्ट सिद्ध होते, की पिंपळ वृक्षात राहणारा आत्मा माझ्याशी बोलला. इतकेच नव्हे, तर त्याने रामय्याचा खोटेपणा पुराव्यासहित सिद्ध करून दाखविला.

माझ्या माहितीतील एका सत्पुरुषाला वटवृक्षामध्ये राहणारा एक आत्मा मदत करत असे. त्या आत्म्याच्या आधाराने ते साधू चमत्कारही करीत असत. अधून-मधून

त्या वटवृक्षाजवळ जाऊन ते साधू त्या वटवृक्षात राहणाऱ्या आत्म्याला फुले, फळे, हार अर्पण करीत. त्यावेळी पाहणाऱ्या लोकांना फुले, हार, फळे अदृश्य होत आहेत, हे बघून आश्चर्य वाटत असे.

माझ्या या अनुभवांवरून वृक्ष व पाषाणात आत्मे असतात, हे सिद्ध होते. मी एकदा नागार्जुन सागरहून १००० किलोमीटर दूर अंतरावर साधना करत असताना नागार्जुन सागर येथील औदुंबर वृक्षात राहणाऱ्या आत्म्याने मला सांगितले, की मला माती देण्याची व्यवस्था करा नाहीतर मी पडून जाईन. मी तात्काळ नागार्जुन सागरला पत्र पाठवून त्या वृक्षाच्या मुळाशी भरपूर माती घालण्याची व्यवस्था केली. वृक्ष, पाषाण यामध्ये आत्म्यांचा निवास कसा असतो, याची माहिती आपण थोडक्यात घेतली. हे जरी खरे असले, तरी येथे एक गोष्ट सांगितली पाहिजे, ती म्हणजे वृक्ष, पाषाणांमध्ये राहणारे सगळेच आत्मे सज्जन असतात, असे नव्हे. काही आत्मे दुष्ट, दुर्जन, खट्याळही असू शकतात. तुम्ही विषय काढलाच आहे, तर असेही एक-दोन अनुभव सांगणे आवश्यक आहे.

एका अरण्यामध्ये मी साधना करत होतो. माझ्या झोपडीपासून सुमारे दीड किलोमीटर अंतरावर एका धनगराचे घर होते.

एक दिवस तो धनगर माझ्याकडे आला व मला म्हणाला,

''तीन दिवस झाले आमची दहा वर्षांची मुलगी 'सखू' कोठेतरी गायब झाली आहे. आम्ही सगळीकडे शोध घेतला; परंतु तिचा कोठे शोध लागला नाही.''

मी त्याला थोडी विभूती दिली व म्हणालो, ''आंघोळ करून तुझ्या घराच्या दारात उभा राहा व पूर्व दिशेकडे तोंड करून ही विभूती हवेत फुंक व २-३ तासांनी काय होते ते मला सांग !''

सुमारे तासाभराने धनगर आपली मुलगी सखू हिला घेऊन माझ्याकडे आला व मला म्हणाला, 'आपण दिलेली विभूती फुंकताच पाच मिनिटांच्या आत सखू घरी आली. ती कोठे होती, काय करत होती हे तुम्हीच तिला विचारा. आम्ही तिला काही विचारले नाही. तिला घेऊन सरळ तुमच्याकडे आलो.'

मी सखूला विचारले, ''तू कोठे होतीस?'' यावर सखू म्हणाली, 'गेले तीन दिवस मी आमच्या घराच्या समोर दोन-तीनशे फूट अंतरावर एक झाड होते, त्या झाडावर होते. त्या झाडावर एक भूत रहात होते. त्या भुताने मला तेथे अडकवून ठेवले होते. मी सर्वांना पाहू शकत होते; पण मला कोणीच पाहू शकत नव्हते. बाबांनी जेव्हा विभूती फुंकली तेव्हा ते भूत एकदम अदृश्य झाले व मी झाडावरून खाली उतरले. आता त्या झाडावर भूत नाही.' खट्याळ भुते ही अशी असतात.

मी जी काही उदाहरणे दिली आहेत त्यावरून एक गोष्ट

सिद्ध होते, की वृक्ष, पाषाण किंवा कुठलीही वस्तू यामध्ये आत्मे (spirits) राहतात. या आत्म्यांना जेव्हा ईश्वर परोपकार करण्याची संधी देतो तेव्हा ती स्थाने जागृत देवस्थाने म्हणून प्रसिद्ध होतात. मारुती, शिव, गणपती, देवी किंवा दत्त यांचे एखादे स्थान जागृत म्हणून प्रसिद्ध असते व इतर स्थानात कोणी जात नाही, याचे कारण काय हे आता वाचकांच्या लक्षात आले असेलच.

**१६. दुर्गा : कल्पना व विचार यातील फरक काय ?**

**श्रीदत्त :** विचारचक्र सतत मनात फिरत असते. ते अनेक वर्षांच्या साधनेने व प्रयत्नाने थांबविणे लाखातील एखाद्या साधकालाच शक्य होते. मन हे सूक्ष्म शरीरामध्ये असते व हे सूक्ष्म शरीर मनातील विचारांवरच जिवंत राहते. मनातील विचार थांबले, की सूक्ष्म शरीर विरघळून जाते व साधक योगी बनतो.

कल्पनातरंग चित्तामध्ये उठत असतात व हे चित्त कारण देहामध्ये असते. बिल्डिंग कशी बांधायची याची कल्पना तयार होते. कल्पना चित्तात निर्माण होतात व कल्पनेने निर्माण केलेल्या आराखड्याप्रमाणे जगामध्ये वस्तू निर्माण होतात. सुईपासून रॉकेटपर्यंत व बैलगाडीपासून ट्रेनपर्यंत सर्व काही कल्पनेने निर्माण केले आहे; कारण देह कल्पनेवर जगतो. या कल्पनेवर जेव्हा योगी विजय मिळवितो म्हणजे चित्तामध्ये कल्पना निर्माण होणे बंद होते तेव्हा कारण देह वितळून जातो

व योगी महायोगी बनतो, ईश्वस्वरूप होतो, स्वयंभू होतो, मूळपुरुष होतो.

**१७. दुर्गा : दैवीकृपा मानवी देहात कुठून शिरते?**

**श्रीदत्त :** दैवीकृपा मानवी देहात मस्तकातून म्हणजे ब्रह्मरंध्रातून शिरते. यामुळे चेहरा तेजस्वी होतो.

**१८. दुर्गा : वाईट शक्ती मानवी देहात कुठून शिरतात?**

**श्रीदत्त :** वाईट शक्ती मानवी देहात टाचेतून (heel) शिरतात. त्याचे प्रथम लक्षण म्हणजे पोटऱ्या दुखू लागतात; तसेच टाचही दुखते.

**१९. दुर्गा : वृक्ष व पाषाणात आत्मे असतात असे आपण सांगितले; तसेच जल, अग्नी व वायू यात आत्मे असतात का?**

**श्रीदत्त :** जल, अग्नी व वायू यामध्ये आत्मे असतात, देवताही असतात. जल, अग्नी व वायू यामध्ये राहणाऱ्या देवतांना प्रसन्न करण्याच्या विशिष्ट साधना असतात. त्या साधनांद्वारे त्यांना प्रसन्न केले जाते. गंगा नदीच्या किनाऱ्यावर बसून, विशिष्ट प्रकारची साधना विशिष्ट पद्धतीने पूर्ण केली

असता, गंगा नदीतून देवी बाहेर येते, साधकाला आशीर्वाद देते, वरदान देते व पुन्हा जलात गुप्त होते. अग्नी प्रज्वलित करून त्या अग्नीकडे एकटक पहात विशिष्ट मंत्राचा जप केला असता धुनीतील धगधगत्या अग्निमधून अग्निदेवता किंवा यज्ञपुरुष प्रकट होतो आणि आशीर्वाद व वरदान देतो.

वायुदेवतेला प्रसन्न करण्यासाठी विशिष्ट मंत्र म्हणत आकाशाकडे पहात जप करावा लागतो, म्हणजे वायुदेवता प्रकट होते व भक्ताला आशीर्वाद देते. आकाश हे सर्व देवतांचे उगमस्थान आहे हे तर तुम्हाला माहीत आहेच.

**२०. दुर्गा : सिद्धपुरुष कसे कार्य करतात ?**

**श्रीदत्त :** सिद्धपुरुष ईश्वराच्या आधीन राहून कार्य करतात. कुठलाही सिद्धपुरुष कधीही स्वत:च्या इच्छेनुसार वागू शकत नाही. मला जर माझ्या इच्छेनुसार वागता आले असते तर तुम्हा सर्वांचा केव्हाच त्याग करून मी एकांतवासात जाऊन समाधी लावून बसलो असतो; परंतु कुठल्याही सिद्धपुरुषाला स्वतंत्र इच्छेने वागता येत नाही. त्याला ईश्वराने विशिष्ट कार्य नेमून दिलेले असते. ते नेमून दिलेले कार्य पूर्ण करावे लागते. कार्य पूर्ण केल्याशिवाय सुटका नसते. याशिवाय हे कार्य करत असताना विविध प्रकारची सुख-दु:खेही भोगावी लागतात. याचे कारण अनेक भक्तांचे प्रारब्ध स्वत:वर ओढवून घ्यावे लागते व

त्यानुसार सिद्धपुरुषाला सुख-दु:ख भोगावे लागते. कारण सिद्धपुरुषाला स्वत:चे प्रारब्ध नसते. एखादा सिद्धपुरुष जेव्हा भक्तांचे प्रारब्ध स्वत:वर ओढवून घेऊन सुख-दु:ख भोगत असतो, तेव्हा काही हलक्या दर्जाचे भक्त सिद्धपुरुषांची कुचेष्टाही करतात. पुष्कळ वेळा ज्यांचे प्रारब्ध सिद्धपुरुष भोगून काढत असतो, तेच भक्त कुचेष्टा करतात, ज्यांचे कोटकल्याण केले तेच भक्त कुचेष्टा करतात, कात्रीत पकडण्याचा प्रयत्न करतात व पुष्कळ वेळा आता कशी जिरली असेही म्हणतात. सर्वज्ञ सिद्धपुरुष हे सर्व शांतपणे सहन करत असतो व परमानंदात रहात असतो. जगातील लोकांकडून होणाऱ्या कुठल्याही आघाताचा त्याच्यावर काहीही परिणाम होत नाही. त्याला प्रत्येक माणसाचे अंतरंग अतिशय चांगल्या पद्धतीने माहीत असते. पुष्कळ तथाकथित भक्त तर आपण अतिशय गोड बोलून सिद्धपुरुषाला कसे फसवितो या भ्रमात राहतात. अशा सर्व प्रकारच्या आत्म्यांना बरोबर घेऊन सिद्धपुरुषाला पुढे जायचे असते. अलिप्तपणे तो हे सर्व कार्य करत असतो. याशिवाय वातावरणातील कोट्यावधी आत्म्यांचा, भूत, पिशाच्चांचा, वाईट-दुष्ट शक्तींचा तो उद्धार करतो. सिद्धपुरुषाचे कार्य दृश्य सृष्टीमध्ये दिसून येत नाही; परंतु अदृश्य सृष्टीमध्ये प्रचंड कार्य चालू असते. अशा सिद्धपुरुषाची किंमत त्याच्या मृत्यूनंतर लोकांना कळते. तो जिवंत असताना ईश्वराची मायाशक्ती लोकोपद्रवापासून त्याचे

संरक्षण करत राहते. सिद्धपुरुषांचे कार्य हे असे चालते. कार्य पूर्ण झाल्यानंतर सिद्धपुरुषाला शरीर सोडण्याची आज्ञा होते. त्यामुळे काही योगी २०-२२ व्या वर्षीच कार्य पूर्ण झाल्याकारणाने समाधी घेतात, तर काही योगी ८०-९० व्या वर्षांपर्यंत कार्य करत राहतात. यातील महत्त्वाची गोष्ट म्हणजे कुठलाही सिद्धपुरुष प्रसिद्धीच्या मागे लागत नाही, तो फक्त ईश्वराचे कार्य करतो.

**२१. दुर्गा : देवतुल्य माणसांचा सहवास मिळूनही काही लोकांमध्ये फरक पडत नाही. देवतुल्य माणसांना मात्र अशा लोकांमुळे खूप त्रास भोगावा लागतो असे का ?**

**श्रीदत्त** : मागे एका प्रश्नाचे उत्तर देताना वातावरणातील शक्तींविषयी मी तुम्हाला सांगितले आहेच. वातावरणातील शक्ती माणसाच्या मन व बुद्धीवर फार प्रभाव टाकत असतात. त्यामुळे देवतुल्य सिद्धपुरुष भेटूनही बऱ्याच माणसांच्या बुद्धीमध्ये फारसा फरक पडत नाही. अशा लोकांचा त्रास सिद्धपुरुषाला सहन करावा लागतो; परंतु अशा गोष्टींना काहीच उपाय नसतो. वातावरणातील वाईट शक्ती माणसांना खाली खेचत असतात. तर सिद्धपुरुष माणसांना वर खेचण्याचा प्रयत्न करत असतो.

**२२. दुर्गा : काही सिद्धपुरुषांची खूप कीर्ती होते, काही सिद्धपुरुषांची मुळीच कीर्ती होत नाही, काही सिद्धपुरुषांची प्रसिद्धी ते जिवंत असतांना होते, तर काही सिद्धपुरुषांची प्रसिद्धी त्यांच्या मृत्यूनंतर होते, असे विविधत्व का दिसून येते ?**

**श्रीदत्त :** या लांबलचक प्रश्नामध्ये तुम्ही प्रत्येक ठिकाणी सिद्धपुरुष हा शब्द वापरला आहे. यामुळे प्रश्नाचे उत्तर देणे सोपे झाले आहे. त्यामुळे एक गोष्ट प्रथम लक्षात घ्या की, सिद्धपुरुष हा कधीही प्रसिद्धी अथवा कीर्तीच्या मागे लागत नाही. सिद्धपुरुष कधीही पेपरमध्ये अथवा टी.व्ही. वर जाहिरात देत नाही. सिद्धपुरुष हा फक्त ईश्वराचे कार्य करतो व ईश्वराचे कार्य करण्यासाठीच त्याने अवतार धारण केलेला असतो.

सिद्धपुरुषांमध्येही अनेक प्रकार असतात. त्यामुळे सिद्धपुरुष व त्याच्या आसपासचे वातावरण यामध्ये विभिन्नता दिसून येते.

ईश्वर एखाद्या सिद्धपुरुषाला पृथ्वीतलावर अवतार घ्यायला सांगतो व त्याला दहा लाख लोकांचा उद्धार करायला सांगतो. अशा वेळी अशा सिद्धपुरुषाची प्रसिद्धी होणे साहजिकच असते.

ईश्वर दुसऱ्या सिद्धपुरुषाला सांगतो, 'एकाच जागी बसून, तपस्या कर व शक्तिपीठ निर्माण कर.' असा सिद्धपुरुष

एकाच जागी साठ-पासष्ट वर्षे बसून साधना-तपस्या करतो. आसपासच्या लोकांना या सिद्धपुरुषाविषयी काहीही माहिती नसते. सिद्धपुरुषाच्या समाधीचा काळ जवळ येतो, तेव्हा पाच-पन्नास भक्त गोळा होतात. नंतर सिद्धपुरुष समाधिस्थ होतो. सिद्धपुरुषाने समाधी घेतल्यानंतर त्याच्या समाधी स्थानामध्ये हजारोंच्या संख्येने लोक जाऊ लागतात.

ईश्वर तिसऱ्या सिद्धपुरुषाला सांगतो, 'तू पोथ्या व पुस्तके लिही. यामध्ये प्रचंड शक्ती ठेवली जाईल व लाखो लोकांना प्रकाशाचा मार्ग मिळेल.', अशा सिद्धपुरुषाचा देह प्रकाशात येत नाही. पण त्याने लिहिलेल्या पुस्तकांच्या व ग्रंथांद्वारे लाखो लोकांचा उद्धार होतो. तो जिवंत असतांनाही व अवतार समाप्तीनंतरही.

अशा प्रकारे पृथ्वीतलावर कुठल्या सिद्धपुरुषाने कशा प्रकारे कार्य करायचे हे ईश्वर ठरवत असतो व त्याप्रमाणे सर्व कार्य घडून येत असते व सिद्धपुरुषांना स्वत:ची इच्छा अथवा स्वतंत्र इच्छा नसते. ते देहाने जगात राहतात; पण अंत:करणाने ईश्वरात विलीन झालेले असतात.

आता शेवटचा एक प्रकार राहिला आहे. तो सांगतो व हा प्रश्न संपवितो. पूर्वजन्मात अपुरी राहिलेली साधना पूर्ण करण्यासाठी काही साधू पृथ्वीतलावर जन्माला येतात. ते गुप्तपणे साधना करतात. सिद्धावस्थेला जाऊन पोचतात. फार थोड्या लोकांना त्यांची माहिती होते. पुष्कळ वेळा अशा

सिद्धपुरुषांची प्रसिद्धी ते जिवंत असताना अथवा समाधी घेतल्यानंतरही होत नाही.

**२३. दुर्गा : या कलियुगामध्ये देव-देवता प्रसन्न होतात काय ?**

**श्रीदत्त :** होय! या कलियुगातसुद्धा देव-देवता प्रसन्न होतात. त्यासाठी तीव्र भक्ती, ध्यान, चिंतन करावे लागते. आजही असे लोक आहेत की, ज्यांना देवता प्रसन्न आहेत. काही भक्त तर असे आहेत की, त्यांच्याशी देवता बोलतात, त्यांना मार्गदर्शन करतात. वासुदेवानंद सरस्वती यांच्याबरोबर श्रीदत्त महाराज बोलत होते. संत नामदेव महाराज यांच्या बरोबर पांडुरंग बोलत होता. रामकृष्ण परमहंसांबरोबर कालिमाता बोलत होती.

**२४. दुर्गा : देवतांना प्रसन्न करण्याचा मार्ग कोणता ?**

**श्रीदत्त :** ज्या देवतेला प्रसन्न करायचे आहे त्या देवतेचा मंत्र अखंड मनात म्हणत रहायचा.

एकाच आसनावर बसून, सकाळी चार तास व संध्याकाळी चार तास देवतेच्या मंत्राचा जप करायचा. साडेसात महिन्यांत देवता प्रसन्न होते. प्रारब्ध शुद्ध नसेल, साधक स्वार्थी असेल, संकुचित मनाचा असेल, तर देवता प्रसन्न होत नाहीत. त्यासाठी वेगळे उपाय करावे लागतात. म्हणून दान व परोपकार करून

प्रथम प्रारब्ध शुद्ध करावे. श्रद्धा बळकट नसेल, मन शंका-कुशंका करत असेल, तरी सुद्धा देवता प्रसन्न होत नाहीत, म्हणून श्रद्धा बळकट असावी. नि:स्वार्थी माणसाला देव लवकर प्रसन्न होतो. स्वच्छ मनाच्या माणसाला देवता लवकर प्रसन्न होतात.

# ८. राणीखेत

**रा**णीखेत येथील चिलियानौला श्री हेडाखान बाबांचे मंदिर आहे. येथे आल्यानंतर माझ्या पूर्वस्मृती जागृत झाल्या. सुमारे पंधरा वर्षांपूर्वी मी श्रीस्वामीजींच्या बरोबर हिमालयात आले होते. श्री हेडाखान बाबांचे मूळस्थान हल्दवानीच्या जवळ आहे. आम्ही हल्दवानीहून गाडी घेऊन हेडाखानला जायला निघालो. चार-पाच किलोमीटर पुढे गेल्यानंतर खूप मोठी दरड कोसळून रस्ता बंद झालेला होता. तेव्हा आम्ही हिमालय पर्वतातील एका खूप उंच पर्वताच्या माथ्यावर होतो. पायवाटेने १२ किलोमीटर चालत गेल्यास तुम्ही हेडाखानला जाऊ शकाल, असे एका माणसाने सांगितल्याने श्रीस्वामीजींनी सरळ पायवाटेने चालण्यास सुरुवात केली. तेव्हा सकाळचे सुमारे नऊ वाजले होते. थोडे पुढे गेल्यानंतर आमच्या पायवाटेला आणखी शेकडो पायवाटा

फुटल्या; परंतु श्रीस्वामीजी चालतच राहिले. कुठेही न चुकता सुमारे दोन तास चालल्यानंतर आम्ही हेडाखान गावात पोहचलो व तेथून नदीकिनारी असणाऱ्या हेडाखान बाबांच्या आश्रमात पोहचलो. तेथे सुमारे अर्धा तास ध्यान करून तेथील कोणालाही आपण कोण याची काहीही जाणीव न देता श्रीस्वामीजींनी परत चालण्यास सुरुवात केली व हिमालय पर्वताच्या पायथ्यापासून शिखरापर्यंत पोहचण्यास आम्हाला चार तास लागले.

या सर्व आठवणी पुन्हा जागृत झाल्या. राणीखेत मंदिरातील दिव्यमूर्तीचे दर्शन घेऊन मी तेथील लोकांना विचारले, 'हेडाखान गावात गाडी जाते का?'

यावर मंदिरातील लोकांनी, 'अद्याप हेडाखान गावात, गाडी जात नाही' असे सांगितले. मंदिराच्या शेजारीच आमची राहण्याची सोय होती. तेथे मी श्रीस्वामीजींना प्रश्न विचारला,

**२५. दुर्गा : ईश्वर या अवस्थेपर्यंत मनुष्य पोहचू शकतो का ?**

**श्रीदत्त :** ईश्वर या अवस्थेपर्यंत मनुष्य पोहचू शकतो. श्री अक्कलकोट स्वामी, श्री महाअवतार बाबाजी, श्री हेडाखान बाबा, श्री अल्लम प्रभू, श्री चिदंबर दीक्षित, श्री ब्रह्मेंद्रस्वामी, श्री साईबाबा, श्री गजानन महाराज हे सर्व एकेकाळी तुमच्या आमच्या सारखेच होते. साधना व तपस्या करून ते ईश्वर पदापर्यंत पोचले. यासाठी अनेक वर्षे खडतर तपस्या करावी लागते.

तपस्येने साधक प्रथम सिद्ध-साधक बनतो. सिद्ध-साधक या पायरीनंतर त्याला सिद्धावस्था प्राप्त होते. सिद्धा-वस्थेनंतर महासिद्धावस्था प्राप्त होते. महासिद्धावस्थेनंतर परमसिद्धावस्था म्हणजेच ईश्वरावस्था प्राप्त होते.

प्रथम आसन स्थिर करावे, ताठ बसावे. नंतर मनानेच मनाला पाहावे. हळूहळू लय लागतो. हा लयाचा काळ वाढवत जावा. सात मिनिटे मनोलय झाला असता गाढ झोप लागते, सुषुप्ती अवस्था प्राप्त होते. तीस मिनिटे मनोलय झाला असता कुंडलिनी जागृत होते व हळूहळू वर चढू लागते. दररोज एक तास याप्रमाणे चाळीस दिवस मनोलय झाला असता, मूलाधारचक्र जागृत होते. दररोज एक तास याप्रमाणे अकरा महिने मनोलय झाला असता सर्व चक्रे जागृत होतात. दररोज तीन तास मनोलय झाला असता सविकल्प समाधी लागते. दररोज बारा तास मनोलय साध्य झाला असता तीन महिन्यांत निर्विकल्प समाधी लागते.

चोवीस तास मनोलय याप्रमाणे सलग शंभर दिवस मनोलय म्हणजे निर्विकल्प समाधी अवस्थेत राहिले असता सिद्ध-साधक अवस्था प्राप्त होते.

एक वर्षे निर्विकल्प समाधी अवस्थेत राहिले असता सिद्धावस्था प्राप्त होते.

तीन वर्षे निर्विकल्प समाधी अवस्थेत राहिले असता महासिद्धावस्था प्राप्त होते. बारा वर्षे निर्विकल्प समाधीत राहिले

असता परमेश्वर ही अवस्था प्राप्त होते.

काही लोक जड समाधी लावतात; परंतु अशा समाधीने ज्ञानप्राप्ती होत नाही हे लक्षात ठेवावे.

निर्विकल्प समाधी म्हणजे कल्पनाविरहित होऊन जगणे, ईश्वराशी एकरूप होऊन जगणे.

**२६. दुर्गा : आत्मसाक्षात्कार कसा होतो ?**

**श्रीदत्त :** आत्मसाक्षात्काराचा सोपा मार्ग म्हणजे श्वासावर लक्ष ठेवणे. फक्त श्वासावर लक्ष ठेवून जर मन एकाग्र होत नसेल, तर श्वास घेताना सो व सोडताना हम् असे म्हणत राहावे. अनेक वर्षे ही साधना अखंड केल्यावर आत्मसाक्षात्कार नक्की होतो; परंतु लाखातील एखादाच ही साधना करू शकतो. कारण माणसाचे प्रारब्ध शुद्ध नसते. प्रारब्ध शुद्ध नसताना ही साधना केल्यास अदृश्य सृष्टीतून अडथळे येतात.

पुष्कळ वेळा अदृश्य सृष्टीतील पिशाच्च साधकासमोर प्रकट होतात व मी मच्छिंद्रनाथ आहे, सप्तर्षी आहे, गोरखनाथ आहे, अत्री ऋषी आहे, याज्ञवल्क्य ऋषी आहे, दुर्गा आहे, दत्त आहे, अशी बतावणी करतात. पुष्कळ वेळा साधकाच्या मनावर पूर्ण ताबा मिळविण्यासाठी साधकाकडे येणाऱ्या भक्तांना चमत्कार दाखवून साधकाला पैसा व प्रसिद्धी मिळवून देतात. येथे साधकाची फसगत होते.

असे होऊ नये म्हणून अगदी सुरुवातीपासूनच सावध रहायला हवे. एखाद्या स्तोत्राचे म्हणजे श्रीदत्तस्तोत्र, विष्णू सहस्रनाम, देवीसूक्त, दुर्गाकवच, अशा स्तोत्रांचे चाळीस ते पन्नास हजार पाठ करून साधकाने स्वत:मध्ये सात्त्विकता निर्माण करणे आवश्यक असते. अंगी सात्त्विकता निर्माण झाल्यानंतर जर सोऽहम् साधना केली, तर आत्मसाक्षात्कार नक्की होतो, मोक्ष प्राप्त होतो, जीवन धन्य होते, नराचा नारायण होतो.

**२७. दुर्गा : जीवनात दान व परोपकाराचे महत्त्व काय?**

**श्रीदत्त :** दान व परोपकाराने अंगी सात्त्विकतेची वाढ होते, पूर्वजन्मातील दुष्कर्मे जळून जातात, संकटे व समस्यांचे निवारण होते. आध्यात्मात प्रगती होते, मृत्यूनंतर उत्तम गती प्राप्त होते, अंगी सद्‌गुण निर्माण होतात. संसारात कुठल्याही गोष्टीची कमतरता पडत नाही. देव-देवतांची कृपा होते. अदृश्यसृष्टीतून मदत मिळत राहते, आपल्या मुलाबाळांना कुठल्याही गोष्टीची कमतरता पडत नाही, मुलाबाळांचे संसार सुखी होतात.

दान व परोपकाराचे महत्त्व कितीही सांगितले तरी संपणार नाही इतके मोठे आहे. दान व परोपकाराबरोबर ईश्वरभक्ती केली असता घराण्यात सत्पुरुष जन्माला येतो व तो सत्पुरुष पूर्वजांचा उद्धार करतो.

सत्पुरुष घरात जन्माला येण्यासाठी, पूर्वजांचा उद्धार

होण्यासाठी किमान शंभर वर्षे दान, परोपकार व ईश्वरभक्ती होणे आवश्यक असते.

आपण कष्टाने पैसे मिळवितो व ते बँकेत ठेवतो. बँकेत ठेवलेले पैसे आपल्या अडीअडचणीला कामी येतात. तशीच भविष्यकाळाची तरतूदही होते. दान व परोपकार करण्यासाठी अवश्य कष्ट करावेत. त्याची पुण्याई वैकुंठ बँकेत साठून राहते व आपल्या जन्मोजन्मी उपयोगाला येते.

मी अशी माणसे पाहिली आहेत, की जी वेगवेगळ्या मार्केटमध्ये फिरून उत्तमोत्तम वस्तू खरेदी करून, अशा उत्तमोत्तम वस्तूंनी ट्रक भरून, ते ट्रक्स घेऊन गोरगरिबांच्या वस्तीत जातात व गरजूंना त्याचे दान करतात. अशी पुण्याई अनेक जन्म पुरते.

# ९. द्वाराहाट

**रा**णीखेतहून आम्ही द्वाराहाटला आलो व तेथून द्रोणागिरी पर्वतावर गेलो. द्वाराहाट व द्रोणागिरी या दोन्ही पर्वतांविषयी श्रीस्वामीजींना खूपच आदर आहे. याचे मुख्य कारण म्हणजे सुमारे दीडशे वर्षांपूर्वी या परिसरामध्ये श्री महाअवतार बाबांचे वास्तव्य होते. या परिसरातच श्री लाहिरी महाशयांना श्री महाअवतार बाबांनी क्रियायोगाची दीक्षा दिली.

द्रोणागिरी पर्वताविषयी तर प्रत्येक भारतीयाच्या मनात अतिशय आदर आहे; कारण या पर्वताचा उल्लेख रामायणामध्ये आहे. स्थानिक भाषेत या पर्वताला दुनागिरी असे म्हणतात.

काही वर्षांपूर्वी श्रीस्वामीजींच्या बरोबर कोलकात्याला जाण्याचा चार वेळा योग आला. प्रत्येक वेळी श्रीस्वामीजी

सेरामपूरला गंगेच्या किनाऱ्यावर असणाऱ्या एका विशाल वटवृक्षाखाली मला घेऊन गेले. सन १८९४ मध्ये या वटवृक्षाखाली आपल्या अनेक शिष्यांसह श्रीमहाअवतार बाबाजी प्रकट झाले होते, असे त्यांनी मला सांगितले. या वटवृक्षाखाली श्रीस्वामीजी तासन्तास ध्यान करत बसत व मलाही जमेल तितका वेळ ध्यान करत बसा, असे सांगत.

श्रीमहाअवतार बाबांचे असेच एक स्थान आसाममध्ये निलांचल पर्वतावर आहे, असे ते म्हणाले; परंतु अद्याप तेथे जाण्याचा योग आला नाही.

द्वाराहाट व दुनागिरी या दोन्ही पर्वतांवर आम्ही खूप ध्यान केले. तेथेच मी त्यांना पुढील प्रश्न विचारले व त्यांनी दिलेली उत्तरे लिहून घेतली. द्वाराहाट पर्वतावरील लिखाण संपवून आता मी द्रोणागिरी पर्वतावर लिखाण करीत आहे. समोर खूप दूर अंतरावर हिमालयाची बर्फाने आच्छादिलेली शिखरे दिसत आहेत. वातावरण अतिशय पवित्र आहे.

**२८. दुर्गा : ध्यानदृश्ये दिसणे हे आध्यात्मिक प्रगतीचे लक्षण आहे का ?**

**श्रीदत्त :** ध्यानामध्ये दृश्ये दिसतात ही गोष्ट जरी खरी असली, तरी पुष्कळ वेळा असे होते, की अपात्र व अयोग्य अशा पृथ्वीतत्त्वातील साधकाला व अपात्र व अयोग्य अशा जलतत्त्वातील साधकाला जी काही दृश्ये दिसतात ती पिशाच्च

सृष्टीतील दृश्ये असण्याची दाट शक्यता असते. त्यामुळे अशा दृश्यांकडे फारसे लक्ष न देता आपली आध्यात्मिक प्रगती किती होत आहे, इकडे लक्ष द्यावे. मन नि:स्वार्थ होऊन श्रद्धा, भक्ती वाढू लागली की, आध्यात्मात प्रगती होत आहे, असे समजावे. स्वभावात प्रेमळता व आनंद येऊ लागला, की आध्यात्मात प्रगती होत आहे, असे समजावे.

मी असे कितीतरी लोक पाहिले आहेत, की जे आम्हाला ध्यानात कृष्ण दिसला, राम दिसला, देवी दिसली असे नेहमी सांगत. परंतु त्यांच्या मनाचा संकुचितपणा व कोती बुद्धी गेलेली नव्हती. यावर जेव्हा मी चिंतन केले तेव्हा माझ्या लक्षात आले, की ही ध्यानदृश्ये फसवी आहेत, भ्रामक आहेत. साधकांनी असल्या भ्रामक ध्यानदृश्यांना भुलू नये. ध्यानदृश्यांपेक्षा सद्‌गुण वाढतात का इकडे लक्ष द्यावे. शांती, समाधान, आनंद वाढतो का इकडे लक्ष द्यावे.

पृथ्वीतत्त्व व जलतत्त्व यांचे आधिक्य असणाऱ्या साधकांची जरी फसगत होत असली, तरी तेजतत्त्वातील व वायुतत्त्वातील साधकांनाही ध्यानदृश्ये दिसतात, हे खरे आहे; परंतु ही ध्यानदृश्ये देवतांच्या कृपेने दिसत असतात. अशा ध्यानदृश्यांद्वारे आपण कोठपर्यंत प्रगती केली हे समजते.

**२९. दुर्गा : ईश्वरभक्ती केलीच पाहिजे, असे आपण म्हणता ते का?**

**श्रीदत्त :** पृथ्वीतलावरील प्रत्येक माणसाने ईश्वरभक्ती ही केलीच पाहिजे, असे मी म्हणतो. याचे मूळ कारण मनुष्य हा ईश्वरच आहे. फक्त स्वत:च्या ईश्वरत्वाचा विसर पडल्याकारणाने तो मायेच्या बाजारात भरकटत राहतो. या मायेच्या बाजारात म्हणजेच भ्रमाच्या बाजारात सामान्य माणूसच भरकटतो, असे नव्हे, तर मोठमोठे अतिप्रसिद्ध महात्मे, शक्ती व सिद्धींच्या मागे लागलेले साधकही भरकटतात.

सर्वसाधारणपणे मानवी जीवन व ईश्वर यांचा संबंध कसा आहे, हे कंदिलाच्या उदाहरणाने दाखविता येईल. कंदिलाचा सांगाडा म्हणजे हाडामांसाचा मनुष्यदेह! कंदिलाची काच म्हणजे सूक्ष्मदेह! कंदिलाची ज्योत म्हणजे कारण देह! व या ज्योतिचा प्रकाश म्हणजे परमेश्वरस्वरूप महाकारण देह!

दुष्कर्माने कंदिलाची काच काळी होते व त्यामुळे ईश्वरमय ज्योतिचा प्रकाश मानवी जीवनात पडत नाही. मनुष्याचे जीवन दु:खमय, संकटमय, कष्टमय व असमाधानकारक बनते. असा हा मनुष्य पुन:पुन्हा जन्माला येतो व पुन:पुन्हा मरतो. अखेरपर्यंत त्याला 'मी कोण आहे' हे कळत नाही. ईर्षा, द्वेष, मत्सर, अहंकार, स्वार्थ, लोभ,

संकुचितपणा, सत्तेची हाव, संपत्तीचा लोभ, सामर्थ्याची लालसा, चमत्कार करून लोकांना आकर्षित करण्याची बुद्धी, समाजावर प्रभाव टाकण्याची वृत्ती, लोकांना उपदेश करण्याचा हव्यास, लोकांना फसविण्याची वृत्ती, सत्तेसाठी व पैशासाठी वाटेल ते करण्याची प्रवृत्ती या सर्व गोष्टी मनुष्याला **'स्वत:चे स्वरूप'** कळण्यापासून, 'मी ईश्वर आहे' याची जाणीव होण्यापासून दूर घेऊन जातात. पुष्कळ वेळा असेही दिसून येते, की कष्टाने पैसे कमवून पोट भरणारा व ईश्वर चिंतनात रंगून जाणारा सामान्य मनुष्य तरून जातो, तर लाख लोकांसमोर बसून ईश्वर या विषयावर प्रवचन देणारा किंवा अनेक चमत्कार करून समाजाला आपल्याकडे आकर्षित करणारा लाखो वर्षे अडकतो.

ईश्वरभक्ती, ध्यान-चिंतन, नामस्मरण, स्तोत्रपठण या गोष्टी नियमितपणे करत राहिल्याने सूक्ष्मदेहावर चढलेली काळीकुट्ट आवरणे हळूहळू गळू लागतात. सूक्ष्म देह हळूहळू तेजस्वी होऊ लागतो. अंतरात्म्याच्या प्रकाशाची किरणे त्यातून बाहेर पडू लागतात. हळूहळू मी कोण आहे हे जाणण्याची भूक लागते. थोडक्यात, ईश्वराची ओढ लागते. ही ओढ जेव्हा खरीखुरी लागते तेव्हा पुढील मार्ग दाखविणारा कोणीतरी जरूर भेटतो. जेव्हा असा कोणीतरी भेटतो तेव्हा नम्रतेने सेवा करावी लागते. खऱ्या सद्गुरुंना पैशाने विकत घेता येत नाही, कुठल्याही गोष्टीने त्यांना आपण प्रभावित

करू शकत नाही. ते तुमच्या अंत:करणातील भाव पहात असतात. तो भाव जर शुद्ध असेल, तर तात्काळ तुम्हाला आत्मसाक्षात्कार घडवून देतात व भाव जर अशुद्ध असेल, तर सेवा करत राहा म्हणून सांगतात.

**जरी भाव असेल मायिक । तरी देव होई महाठक ।**
**नवल तयाचे कौतुक । जैशासी तैसा ।।**

एका जन्मात स्वत:च्या स्वरूपाची ओळख करून घेणे, आत्मसाक्षात्कार प्राप्त करणे अवघड असले, तरी ईश्वरभक्ती करीत राहावी. हळूहळू स्वत:चाच म्हणजे ईश्वराचा शोध लागतो. यालाच ईश्वरप्राप्ती, असे म्हणतात.

**३०. दुर्गा : आध्यात्मात प्रगती होत आहे का? हे कसे समजावे?**

**श्रीदत्त** : शांती, समाधान व आनंद या गोष्टींची वाढ जीवनात होऊ लागली, की आध्यात्मात प्रगती होत आहे, असे समजावे.

तेजस्विता वाढू लागली, ज्ञान होऊ लागले, मनोलय साध्य होऊ लागला, की आध्यात्मात प्रगती होत आहे, असे समजावे.

ध्यान करताना देहाचे भान नाहीसे होऊ लागले, देह शून्य अशी अवस्था होऊ लागली, की आध्यात्मात प्रगती होऊ लागली, असे समजावे.

दया, क्षमा, शांती, करुणा, अहिंसा, प्रेम, नम्रता, परोपकार, सहनशक्ती, मानवता, दान, निर्भयता, आनंदी वृत्ती, अखंड समाधान, निरपेक्ष वृत्ती अशा सद्‌गुणांचा विकास होऊ लागला, की आध्यात्मात प्रगती होऊ लागली, असे समजावे.

**३१. दुर्गा : सुख व दुःख म्हणजे काय ?**

**श्रीदत्त :** दोन दुःखांमधील अंतराला सुख म्हटले जाते. कधी कधी हे अंतर काही दिवसांचे असते, तर कधी कधी काही महिन्यांचे असते, तर कधी कधी हे अंतर काही वर्षांचे असते. या सर्व गोष्टी प्रत्येक माणसाच्या पूर्वजन्मातील कर्मावर अवलंबून असतात. हे जरी खरे असले, तरी जगात सुख असे काहीच नाही. जग हे दुःखमय आहे, असेच म्हणावे लागेल. फरक इतकाच, की अतिशय गरीब व गांजलेला दहा-वीस रुपयांसाठी रडत व रखडत असतो, कष्टकरी हजार रुपयांसाठी रखडत असतो. मध्यमवर्गीय पन्नास हजार ते लाख रुपये कसे प्राप्त करावेत या विवंचनेत असतो. त्याहून मोठा लाखो रुपये कसे मिळवावेत किंवा लाखो रुपयांच्या चिंता कशा सोडवाव्यात या विवंचनेत असतो. तर कोट्याधीशाच्या चिंताही कोटीमध्येच असतात. सुख, शांती, आनंद व समाधान या गोष्टी भिकाऱ्याकडेही नसतात व कोट्याधीशाकडेही नसतात.

ईश्वराने अशी योजनाच करून ठेवली आहे, की जोपर्यंत

मनुष्य **आत्मसुख** प्राप्त करत नाही तोपर्यंत तो सदैव समस्याग्रस्त व दु:खी राहील, त्यामुळेच मी जगात सुख नाही, असे म्हटले आहे. हे आत्मसुख एखाद्या वेळी गरिबाला पटकन प्राप्त होते; परंतु श्रीमंताला प्राप्त होणे कठीण असते.

हे आत्मसुख एखाद्या सरळ, साध्या, भोळ्याभाबड्या साधूला प्राप्त होणे शक्य असते; पण वेगवेगळ्या प्रकारच्या तंत्रमंत्राच्या साधना करून विविध प्रकारच्या सिद्धी, सामर्थ्य प्राप्त करून समाजाला आपल्या मुठीत ठेवणाऱ्या साधकांना प्राप्त होणे अशक्यप्राय असते.

**सांडोनिया आत्मसुख । सामर्थ्य वांछती ते मूर्ख ।।**
**तपा अंती राज्य । राज्या अंती नरकवास ।।**

असा इशारा प्राचीन संतांनी देऊन ठेवला आहे. म्हणून प्रत्येकाने आत्मसुखाच्या दृष्टीने वाटचाल करणे आवश्यक असते. आपल्या प्रारब्धातील चांगले-वाईट अनुभव घेत असताना लक्ष आत्मकेंद्रित करायला. हवे, तरच खरे सुख प्राप्त होईल. आत्मसुख हेच खरे सुख-बाकी सुखे क्षणभंगुर असतात. ती येतात व जातात. आत्मसुख एकदा प्राप्त झाले, की ते कधीही भंग पावत नाही. समाधानी वृत्ती वाढू लागली, की आत्मसुखाच्या दिशेने आपला प्रवास सुरू झाला असे समजावे.

**३२. दुर्गा : सद्‌गुणांना महत्त्व का आहे ?**

**श्रीदत्त :** परमार्थ मार्गामध्ये सद्‌गुणांना अतिशय महत्त्व आहे. जितके सद्‌गुण जास्त तितकी आध्यात्मिक प्रगती, जास्त. सद्‌गुण हे देवतास्वरूप आहेत. सद्‌गुण अंगी प्रकट होणे म्हणजे देवता अंतरंगात प्रगट होणे. इतके सद्‌गुणांचे महत्त्व आहे.

**३३. दुर्गा : मनुष्याला पुनर्जन्म असतो का ?**

**श्रीदत्त :** मनुष्याला पुनर्जन्म असतोच. आपण पुन:पुन्हा जन्माला येतोच.

आध्यात्मात प्रगती करण्यासाठी, पूर्वजन्मातील अपुरे कार्य पूर्ण करण्यासाठी, ऋण चुकविण्यासाठी अशा अनेकविध कारणांनी आत्म्याला पुन:पुन्हा जन्म घ्यावा लागतो.

ज्यांच्याकडे संपत्ती, सामर्थ्य व सत्ता आहे, अशी माणसे खूप अन्याय करतात, अत्याचार करतात, समाजाला लुबाडतात. अशा माणसांना पुष्कळ वेळा प्राणी-पशूंचेही जन्म घ्यावे लागतात. आपण पुष्कळ वेळा अस्वलांचे, माकडांचे; तसेच इतर प्राण्यांचे खेळ करणारी माणसे पाहतो. प्राण्यांच्या जीवावर हे लोक पोट भरत असतात. हे प्राणी पूर्वजन्मी सावकार, सत्ताधीश मानव होते. त्यांनी या गरिबांना छळलेले असते, त्यांची संपत्ती हडप केलेली असते. या कर्माची शिक्षा म्हणून त्यांना प्राण्याचा जन्म मिळतो व प्राण्याचा जन्म मिळूनसुद्धा

जंगलात राहण्याऐवजी हे माणसांची सेवा करत राहतात.

**३४. दुर्गा : एकाग्रता म्हणजे काय व ती कशी साध्य होते ?**

**श्रीदत्त :** माणसाचे मन कधीही एका ठिकाणी स्थिर राहत नाही. ते व्यग्र असते म्हणजे सारखे भरकटत असते, अस्थिर असते. **या अस्थिर मनाला कुठल्यातरी एका स्थानावर स्थिर करणे म्हणजे एकाग्रता!** मन एकाग्र करण्याचे शेकडो उपाय आहेत. मी माझ्या पुस्तकांमध्ये मन एकाग्र करण्याच्या अनेक पद्धती सांगितलेल्या आहेत. येथे एक-दोन पद्धती सांगतो.

दिव्याच्या ज्योतिकडे डोळ्यांची पापणी न हलवता पहात राहावे. एक मिनिटापासून सुरुवात करावी व ती पाच मिनिटांपर्यंत वाढवावी. असे अनेक वर्षे करावे. पाच मिनिटांपर्यंत एकाग्रतेने ज्योतिकडे पाहणे शक्य झाल्यानंतर डोळे मिटून भ्रूमध्याकडे पाहण्याचा अभ्यास करावा. एक वर्षभर असा अभ्यास केल्यानंतर ब्रह्मरंध्राकडे पाहण्याचा (डोळे मिटून) अभ्यास करावा. सलग २-३ वर्षे असा अभ्यास केल्यानंतर एकाग्रतेचे फायदे दिसू लागतील.

दीर्घ श्वास घेत राहावे व ते श्वास मोजावेत. पहिल्या दिवशी पाचशे श्वास मोजावेत. एक आठवड्यानंतर दररोज हजार श्वास मोजावेत. एक महिन्यानंतर तीन हजार श्वास मोजावेत. चार महिन्यांनंतर श्वास मोजणे बंद करून फक्त

श्वासावर लक्ष ठेवावे. एक वर्षानंतर श्वासावरचे लक्ष कमी करून श्वास आत घेताना व बाहेर सोडताना होणाऱ्या नैसर्गिक ध्वनीवर लक्ष ठेवावे. दोन-तीन वर्षे ही साधना केल्यानंतर पुढे जो काही अनुभव येईल तो स्वत:च घ्यावा. या सर्व लययोगाच्या साधना आहेत. या साधनेने आत्मसाक्षात्कार होतो. ईश्वरदर्शन होते; परंतु प्रारब्ध जर शुद्ध नसेल, तर विघ्नेही येतात.

# १०. जोशीमठ

**द्रो**णागिरी पर्वताहून आम्ही जोशीमठला आलो. याच रस्त्याने मी श्रीस्वामीजींबरोबर चार वेळा बद्रिनाथला गेले आहे पण या खेपेला मात्र बद्रिनाथला जाता येणार नाही; कारण हिवाळ्यामध्ये बद्रिनाथचा मार्ग सहा महिने बंद असतो. तो सर्व पर्वत बर्फाखाली झाकलेला असतो. बद्रिनाथ येथून ४५ किलोमीटर अंतरावर आहे. बद्रिनाथप्रमाणेच गंगोत्री, यमुनोत्री व केदारनाथ या तीर्थक्षेत्रांकडे जाणारे मार्गही हिवाळ्यात बंद असतात. प्रचंड हिमवर्षावाने ही सर्व स्थाने बर्फामध्ये झाकली जातात. वरील २५००-३००० फूट उंचीवरील तीर्थक्षेत्र बर्फाखाली झाकली जातात. म्हणून आम्ही जोशीमठलाच थांबलो. जोशीमठाहून सुमारे १५ किलोमीटर पुढे हिमालय पर्वतामधील औली हे स्थान आम्ही बघायला गेलो. मनुष्य

वस्तीचे हे शेवटचे ठिकाण. येथून पुढे थोड्या अंतरावर तिबेटची हद्द सुरू होते. आजूबाजूचे सर्व डोंगर बर्फाने झाकलेले आहेत. येथे स्किइंग व स्केटिंगचे ट्रेनिंग सेंटर पण आहे. श्रीस्वामीजींनी व मी येथे तासभर ध्यान केले व येथून जोशीमठला परत आलो.

**३५. दुर्गा : मुक्ती व जीवनमुक्ती यातील फरक काय?**

**श्रीदत्त :** मुक्ती हा शब्द बऱ्याच अर्थाने वापरला जातो. मी तुम्हाला एक एक अर्थ समजावून सांगतो. पिशाच्च योनीमध्ये हजारो वर्षे आत्मे यातना भोगत असतात. यांना जेव्हा मुक्ती मिळते, तेव्हा ती खरी मुक्ती नसते; पण यातनांपासून मुक्ती मिळाल्याचा आनंद त्यांना होत असतो. म्हणून पिशाच्च योनीतून सुटका झाल्यानंतर आम्हाला मुक्ती मिळाली, असे पिशाच्चे म्हणतात.

पृथ्वीतलावर जीवन जगत असताना वाईट मार्गाने पैसा कमावणारे लोक, सामान्य जनतेला त्रास देणारी माणसे, विशेषत: राजकारणी लोक, अधिकारी लोक मृत्यूनंतर भयंकर यातनामय अशा पिशाच्च लोकात जातात. पिशाच्च लोकांचेही अनेक प्रकार आहेत. पृथ्वीतलावर आपण जेवढे जिवंत असतो त्यापेक्षा हजारो पटीने आत्मा येथे जिवंत असतो. त्यामुळे थोडासा चटका लागल्यानंतर जितक्या यातना आपल्याला पृथ्वीतलावर होतात त्याच्या हजारो पटीने यातना पिशाच्च

लोकात होत असतात. या यातनांना अंत नसतो. दिवस-रात्र असा भेद नसतो; कारण हा लोकच अंध:कारमय असतो. येथे प्रकाशाचा एकही किरण दिसत नाही. फक्त यातना होत असतात व या यातना प्रतिक्षण पृथ्वीतलावर आपण केलेल्या पापाची जाणीव करून देत असतात.

कर्माच्या हिशेबाप्रमाणे कोणाची एक हजार वर्षे यातना भोगल्यानंतर सुटका होते, तर कोणाची पंचवीस हजार वर्षे यातना भोगल्यावर सुटका होते. या घटनेला सर्व पिशाच्चे मुक्ती असे म्हणतात; पण ही खरी मुक्ती नव्हे, ही फक्त सुटका असते.

एखादा आत्मा पिशाच्च लोकामध्ये यातना भोगत असतो. त्याच्यावर प्रेम करणारी व्यक्ती किंवा नातेवाईक यांना त्या यातना पाहवत नाहीत. ते ईश्वराकडे प्रार्थना करतात किंवा ते ज्या लोकात रहात असतात त्या लोकांच्या अधिपतीला प्रार्थना करतात. तेव्हा यातना भोगणाऱ्या व्यक्तीला विचारले जाते, की या यातनातून तुला सुटका मिळेल; परंतु पृथ्वी-तलावर ओझी वाहणाऱ्या जनावराचा जन्म घ्यावा लागेल. प्रतिक्षण जनावराच्या जन्माच्या यातना भोगाव्या लागतील व दररोज चाबकाचे फटके खावे लागतील. चालेल का ?

यावर यातना भोगणारा आत्मा मला जनावराचा जन्म चालेल. मी चाबकाचे फटके खाईन पण या पिशाच्च योनीतील यातना नको असे उत्तर देतो. अशा प्रकारे यातना भोगणारा

पिशाच्च आत्मा पृथ्वीतलावर बैलाच्या अथवा रेड्याच्या रूपाने जन्माला येतो. येथे त्याला पोटभर कधीही खायला मिळत नाही. दररोज चाबकाचे फटके खावे लागतात व तो जेव्हा चाबकाचे फटके मारणाऱ्या आपल्या मालकाकडे पाहतो तेव्हा त्याला आठवते, की पूर्वजन्मी जेव्हा मी सत्ताधारी होतो तेव्हा याच माणसाला छळले होते. याचीच जमीन हडप केली होती. पुढच्या जन्मामध्ये त्याची जमीन त्याला परत मिळाली आहे. तो अतिशय सुखाने संसार करत आहे. मी मात्र चाबकाचे फटके खात यातना भोगत आहे. पंचपक्वान्न खाण्याची तीव्र वासना या रेड्याच्या अथवा बैलाच्या रूपाने राहणाऱ्या आत्म्याला होत असते; पण पूर्वजन्मी नेता, पुढारी, राजकारणी असताना आपण ज्याचा छळ केला तो पंचपक्वान्ने खात असतो व याच्या पुढ्यात कडबा टाकत असतो. या सर्व गोष्टींचे अतिशय दुःख होऊन या बैलाच्या अथवा रेड्याच्या रूपात असणाऱ्या आत्म्याच्या डोळ्यांतून पाणी येते, याचे कारण हेच आहे. अशी जनावरे जेव्हा मरतात तेव्हा त्यांची पशू योनीतून सुटका होते. या सुटकेला मुक्ती असे म्हणतात; परंतु ही खरी मुक्ती नव्हे.

अशा प्रकारे प्रत्येक माणूस मुक्तीचा अर्थ आपआपल्या परीने लावत असतो. येथे मुक्तीचा अर्थ फक्त सुटका असाच असतो. या सर्व प्रकारांना जरी मुक्ती म्हटले जात असले तरी ही खरी मुक्ती नव्हे.

खरी मुक्ती म्हणजे आध्यात्म मार्गामध्ये प्रगती होणे व मृत्यूनंतर दिव्यलोकात प्रवेश करणे, देवलोकात प्रवेश करणे, ईश्वराच्या साम्राज्यात प्रवेश करणे, पुन्हा कधीही जन्माला न येणे. फक्त आध्यात्मात प्रगती केल्यानंतरच अशी मुक्ती प्राप्त होऊ शकते. प्रारब्धाची शुद्धी झाल्यानंतरच आध्यात्मात प्रगती होते. जोपर्यंत प्रारब्ध शुद्ध होत नाही तोपर्यंत आध्यात्मात प्रगती होत नाही. सत्पुरुषाच्या किंवा सद्‌गुरूच्या सेवेने प्रारब्धाची शुद्धी होते व मुक्ती प्राप्त होते, आध्यात्मात प्रगती होते. प्रारब्धशुद्धीचा दुसरा उपाय म्हणजे दान. दानानेही प्रारब्धाची शुद्धी होते.

जीवनमुक्ती म्हणजे साधना करून ईश्वराशी एकरूप होणे, निराकार ईश्वराशी साधनेद्वारा एकरूप होणे, देवत्व प्राप्त करणे म्हणजे जीवनमुक्ती.

**३६. दुर्गा : मृत्यूनंतर मनुष्य सद्‌गतीला गेला की दुर्गतीला हे कसे समजावे ?**

**श्रीदत्त :** मरतेवेळी आत्मा कोठून बाहेर पडतो हे पाहावे म्हणजे मनुष्य सद्‌गतीला गेला की दुर्गतीला गेला ते समजते.

तोंड, नाक, डोळे, कान या सातद्वारांनी जर आत्मा बाहेर पडला, तर तो स्वर्गलोकात जातो. मूत्रमार्गे अथवा गुदद्वाराच्या मार्गे आत्मा बाहेर पडून गेल्यास नरकात जातो. अशा आत्म्याला खूप यातना भोगाव्या लागतात. मूत्रमार्गे

बाहेर पडल्यास मृत्यूच्या वेळी लघवी होते व गुद्द्वारामार्गे बाहेर पडल्यास रेच होतो. डोळ्यांमार्गे प्राण बाहेर गेल्यास डोळे उघडे राहतात व तोंडामार्गे प्राण बाहेर गेल्यास तोंड उघडे राहते.

**३७. दुर्गा : योगभ्रष्ट म्हणजे काय ?**

**श्रीदत्त :** ईश्वराशी एकरूप होण्यासाठी योगी साधना करतात. ही साधना करत असताना जर मृत्यू आला, तर उरलेली साधना पूर्ण करण्यासाठी अशा योग्यांना तात्काळ पुन्हा जन्म मिळतो. अशा पुन्हा जन्माला आलेल्या योग्यांना योगभ्रष्ट असे म्हणतात. या नवीन जन्मात ते आपली साधना पूर्ण करतात व ईश्वराशी एकरूप होतात.

**३८. दुर्गा : जगातील वाईट गोष्टी केव्हा नष्ट होतील?**

**श्रीदत्त :** जगातील वाईट गोष्टींमुळे सज्जनांना त्रास होतो ही गोष्टी जरी खरी असली, तरी जगातील वाईट गोष्टी तेव्हाच नष्ट होतील जेव्हा जास्तीत जास्त लोक परोपकारी व दानी होतील. जग हळूहळू चांगले होत आहे. वाईटाचा नाश हळूहळू होत आहे. जग शंभर टक्के चांगले होण्यास २२२२ हे वर्ष उजाडेल.

सन २२२२ नंतर सर्व जग चांगले झालेले असेल. जगातील प्रत्येक व्यक्ती सज्जन व परोपकारी असेल. एकाच धर्माचे अस्तित्व असेल. सर्व जण श्वासावर लक्ष केंद्रित करून

ईश्वराची आराधना करतील. श्वासालाच ईश्वर मानतील. आपल्या अंत:करणात ईश्वराचा शोध घेतील. सर्व जण प्रेमळ व परोपकारी असतील व जगाची लोकसंख्या पन्नास कोटींहूनही कमी असेल.

**३९. दुर्गा : अहं ब्रह्मास्मी, तत् त्वम असि, अयमात्मा ब्रह्म, सर्वं खल्विदं ब्रह्म याचा अर्थ काय ?**

**श्रीदत्त :** या चारही वाक्यांना महावाक्य असे म्हटले जाते. साधना करताना या चारही वाक्यांचा अनुभव येतो. 'अहं ब्रह्मास्मी' म्हणजे 'मी ब्रह्म आहे' असा अनुभव सुरुवातीला येतो. तद्नंतर 'तत् त्वम असि' म्हणजे 'तू ब्रह्म आहेस' असा अनुभव येतो. त्याच्यानंतर माझा तसेच सर्वांचा आत्मा हा ब्रह्मच आहे, असा अनुभव येतो, म्हणजे 'अयमात्मा ब्रह्म' व शेवटी या विश्वामध्ये एका ब्रह्माशिवाय दुसरे काहीच नाही, असा अनुभव येतो. साधना करणाऱ्याला असे अनुभव येत असतात.

**४०. दुर्गा : माणसाने कल्पना करणे सोडून दिल्यास तो जगू शकेल काय ?**

**श्रीदत्त :** मुळात हा प्रश्नच चुकीचा आहे. माणसाने कल्पना करणे सोडून दिल्यास तो मनुष्य राहणार नाही, तो देव बनेल, तो परमहंस बनेल; कारण मन कल्पना करते. हे मन नष्ट झाल्याशिवाय कल्पना बंद होत नाहीत. मन नष्ट झाल्यानंतर आत्मा परमात्मा होतो. याला उन्मनी अवस्था असे म्हणतात.

अशा प्रश्नांची कल्पना न केलेली बरी. कल्पनाविरहित मन म्हणजे उन्मनी अवस्था. जीवन मुक्तावस्था.

VB

# ११. कर्णप्रयाग

**श्री** बद्रिनाथाला जोशीमठ येथूनच भक्तिभावाने नमस्कार केला; कारण बर्फामुळे बद्रिनाथला जाणे शक्य नव्हते. बद्रिनाथच्या पुढे माना हे भारताच्या सरहद्दीचे शेवटचे गाव, त्यापुढे तिबेट सुरू होतो. सध्या तिबेटवर चीनचा ताबा असल्याने चीनची सरहद्द सुरू होते, असे म्हणायला हरकत नाही. दोनच वर्षांपूर्वी माना गावाला भेट दिली होती; तसेच अलकनंदा नदीचा उगमही पाहिला होता. त्याच वेळेला श्रीस्वामीजींबरोबर गंगोत्रीलाही काही दिवस राहिलो होतो. यमुनोत्री व केदारनाथ या ठिकाणी चोवीस वर्षांपूर्वी श्रीस्वामीजींबरोबर गेले होते. त्यानंतर तिकडे जाणे झाले नाही; कारण या दोन्ही ठिकाणी सुमारे अठरा किलोमीटर चालावे लागते. एक वर्षापूर्वी श्रीस्वामीजींबरोबर वैष्णोदेवीला जाऊन आले. हिमालयाकडे

पहात असताना या सर्व स्मृती जागृत झाल्या आहेत. २५०० ते ३००० फूट उंचावर असलेली गंगोत्री, यमुनोत्री, केदारनाथ व बद्रिनाथ ही सर्व स्थाने बर्फाने झाकली गेल्याने तेथील मार्ग बंद आहेत. अशा सर्व स्मृतींना उजाळा देत जोशीमठहून आम्ही कर्णप्रयागला येऊन पोचलो. अलकनंदा व पिंडारी या दोन नद्यांच्या संगमावर रात्री राहिलो. पिंडारी ही नदी कैलास पर्वतामधून उगम पावते व कर्णप्रयागला अलकनंदा नदीला येऊन मिळते.

आम्ही फक्त तीन माणसे यात्रा करत होतो. मी, श्रीस्वामीजी व परशुराम. आमची गाडी होती टेम्पो ट्रॅव्हलर. टेम्पो ट्रॅव्हलरच्या ड्रायव्हरला मदत करण्यासाठी परशुरामचा ड्रायव्हर होता. गाडीत सुमारे १६-१७ माणसे बसतील एवढ्या सीट्स होत्या. एवढी मोठी बस घेऊन आम्ही नेहमीच प्रवास करीत असू. या बसमध्ये हिमालयातील ही माझी पाचवी यात्रा.

एवढी मोठी बस घेऊन फक्त ४-५ माणसांनी प्रवास करण्याचे कारण काय, असा प्रश्न साहजिकच लोक आम्हाला विचारायचे; परंतु आमची बाकी संपूर्ण बस सामानाने भरलेली असायची. इतकी की आम्हाला बसायलाही जागा राहायची नाही. श्रीस्वामीजी आम्हाला भरपूर सामान खरेदी करायला लावायचे, त्यामुळे संपूर्ण बस भरायची. आम्ही शेकडोच्या संख्येने ब्लँकेट्स, शाली, मफलर, कानटोप्या, शर्ट-पँटची

कापडे, साड्या, ड्रेसमटेरिअल, भगव्या लुंग्या, पांढऱ्या लुंग्या, कफनीचे कापड विकत घेत असू; तसेच शेकडोच्या संख्येने कॉफीचे डबे, चहाचे डबे, दूध पावडर, गाईचे तूप, अगरबत्ती, कापूर; तसेच एक एक किलोची ड्रायफ्रूट्सची पाकिटे, साखर, खाद्य पदार्थ हे सर्व क्विंटलने घेत असू, याशिवाय दररोज ५००-६०० बिस्किटांचे पुडे व ३०-४० किलो शेंगदाणे, चणे व कुरमुरे खरेदी केले जायचे, केळी तसेच फळफळावळ खरेदी केली जायची आणि वाटेत भेटणाऱ्या माकडांना व गाईंना खायला घालत असू. तीर्थक्षेत्रात राहणाऱ्या साधूंना डाळ, तांदूळ, तूप, ब्लँकेट, शाली, मफलर असे वाटले जायचे, तर गरिबांना पँट-शर्टची कापडे, साड्या, ड्रेस मटेरिअल वाटले जायचे. लहान मुलांना दररोज ४००-५०० बिस्किटांचे पुडे वाटले जायचे. वस्तूंबरोबर सर्वांना पैसेही वाटले जायचे. यासाठी प्रत्येकाकडे म्हणजे ड्रायव्हरजवळसुद्धा शंभराची, पन्नासाची, विसाची व दहा रुपयांची बंडले ठेवलेली असायची. वाटेत दिसणाऱ्या गोरगरिबांना व साधूंना या नोटा वाटल्या जायच्या.

सतत वाटत राहणाऱ्या व्यक्तीला कुठल्याही गोष्टीची कधी कमतरता पडत नाही व त्याचे प्रारब्धही शुद्ध होते, असे श्रीस्वामीजी नेहमी सांगतात. धनाचा साठा करण्याऱ्या व्यक्तीचे धन हे चोर, अग्नी, रोग, कोर्टकचेऱ्या अशा अनेक वाटांनी निघून जाते. त्यापेक्षा दान करून पुण्य मिळविलेले

चांगले असते, असे ते नेहमी म्हणतात.

कर्णप्रयाग येथील संगमाचे दृश्य अतिशय सुंदर आहे. नदीच्या संगमाच्या पलीकडे काही साधू-भिकारी बसलेले दिसले. मी आमचा ड्रायव्हर राहुल याला त्या सर्वांना पैसे वाटायला सांगितले. त्याप्रमाणे तो सर्वांना पैसे वाटायला गेला. थोड्या वेळाने परत येऊन त्याने एक विलक्षण हकिकत सांगितली.

राहुलने संगमावर बसलेल्या सर्व भिकाऱ्यांना प्रत्येकी दहा-दहा रुपये व बिस्किटाचे पुडे वाटले. संगमापासून जवळ एके ठिकाणी पाच साधू बसले होते. भिकाऱ्यांना पैसे व पुडे वाटून झाल्यानंतर राहुल त्या साधूंजवळ गेला. प्रत्येक साधूला त्याने २० रु. दिले व बिस्किटाचे पुडे दिले. इतरही अनेक वस्तू दिल्या. त्या साधूंनी सर्व वस्तू घेतल्या. पैसे मात्र त्या पाचांपैकी जो प्रमुख साधू होता त्या प्रमुखाकडे दिले.

प्रमुख साधूच्या हातात वीस रुपयांच्या पाच नोटा होत्या. त्याने त्या पाचही नोटा राहुलच्या तळहातावर ठेवल्या व त्यावर राहुलचा दुसरा हात ठेवला. एक सेकंदभर डोळे मिटून मंत्र पुटपुटल्यासारखे केले व राहुलला वरील हात बाजूला काढण्यास सांगितले. राहुलला आश्चर्य वाटले, त्याच्या हातातील नोटा अदृश्य झालेल्या होत्या. त्याने राहुलकडे आणखी काही नोटा मागितल्या. राहुलने त्याच्या हातात नोटा दिल्या. त्याने त्या नोटा राहुलच्या कपाळाला लावल्या व हात राहुलला

दाखविला. नोटा पुनःश्च अदृश्य झाल्या होत्या. अशा प्रकारे राहुलच्या खिशातील तीन चारशे रुपये अदृश्य झाले होते व त्याला तेथून पळूनही जाता येत नव्हते. राहुलने मनातल्या मनात श्री दत्ताची प्रार्थना करायला सुरुवात केली. इतक्यात तो साधू म्हणाला, 'तुझ्या खिशात पाचशे रुपयांच्या नोटा आहेत, त्या मला दे व तू जा !' राहुलने आपल्या जवळच्या पाचशेच्या नोटा त्याला दिल्या व तेथून पळतच आमच्याकडे आला व सर्व हकिकत आम्हाला सांगितली.

श्रीस्वामीजींना ही हकिकत कळल्यावर ते म्हणाले, की छान! काहीतरी नवीन गोष्टीचा अनुभव आला. मी श्रीस्वामीजींना विचारले, 'राहुलच्या खिशात पाचशे रुपयाची नोट आहे हे त्याला कळले, परंतु तो एका सत्पुरुषाबरोबर आहे हे त्याला कळले नाही, हे कसे काय ?'

यावर श्रीस्वामीजी म्हणाले, 'पैशासाठी त्याने राहुलवर पिशाच्च सिद्धीचा वापर केला. याला क्षूद्र सिद्धी असे म्हणतात. अशा सिद्धी मिळविण्यासाठी तीन दिवसांची साधना पुरेशी असते; परंतु अशा साधनेने आत्मा पिशाच्च लोकात अडकतो. मुक्तीच्या मार्गात असंख्य अडथळे असे साधक स्वतःच निर्माण करतात. तांत्रिक भाषेत यांना सैतानाची साधना असे म्हणतात. असे लोक ईश्वरी मार्गाकडे वळू शकत नाहीत.'

कर्णप्रयागचा हा अनुभव विलक्षणच होता. या प्रसंगाला

अनुलक्षून मी काही प्रश्न श्रीस्वामीजींना विचारायचे ठरविले.

**४१. दुर्गा : माणसाचा जन्म हा ईश्वरप्राप्ती करण्यासाठी झाला असताना लोक पिशाच्च साधना का करतात ?**

**श्रीदत्त :** घर सोडून साधू झाल्यानंतर खाण्यापिण्यापासून पैशापर्यंत सर्वच गोष्टींची पंचाईत होते. ईश्वरभक्ती अंत:करणात नसतेच. या लोकांनी डोक्यात काहीतरी राख घालून घर सोडलेले असते. आता काहीतरी चमत्कारिक विद्या प्राप्त केल्याशिवाय पैसा मिळणार नाही याची जाणीव होते व पैशासाठी झटपट विद्या मिळविण्याच्या मागे असे साधू लागतात व स्वत:च्याच आत्म्याचे नुकसान करणारा पिशाच्च सिद्धींचा मार्ग अनुसरतात. मेस्मेरिझम किंवा संमोहनाची विद्या प्राप्त करण्यासाठी कुठलीही साधना करावी लागत नाही, काहीही कष्ट करावे लागत नाहीत; परंतु या विषयावर मी जास्त सांगणे योग्य ठरणार नाही.

**४२. दुर्गा : पिशाच्च साधना सर्वसाधारण कशा प्रकारे केली जाते ?**

**श्रीदत्त :** पिशाच्च साधनेचे असंख्य प्रकार आहेत. शेकडो प्रकारांनी ही साधना केली जाते. स्मशान हे या साधनेचे मुख्य स्थान मानले जाते. बऱ्याचशा साधना स्मशानातच केल्या जातात. मी माझ्या '**भारतीय गूढविद्या**' या पुस्तकात

पिशाच्च साधनेची माहिती दिलीच आहे.

**४३. दुर्गा : दैव व प्रयत्न यामध्ये श्रेष्ठ कोण ?**

**श्रीदत्त :** दैव हे सदैव श्रेष्ठच आहे. दैवगतीनुसार मनुष्य प्रयत्न करतो. लाखातील एखादा मनुष्य तीव्र इच्छाशक्तीच्या बळावर दैवावर म्हणजे प्रारब्धावर मात करू शकतो; परंतु तेही दैव गतीनेच साध्य होत असते. तसे करण्याची शक्तीही दैवच देत असते.

उदा. : समजा एक मुलगा आहे. त्या मुलाची पत्रिका जर आपण ज्योतिषाला दाखविली, तर ज्योतिषी सांगतो, हा मुलगा खूप मोठा डॉक्टर होणार.

ही गोष्ट तुम्ही त्या मुलाला सांगितलेली नसते; परंतु त्या मुलाकडून निसर्गतः सर्व प्रयत्न पूर्ण होतात व तो मुलगा डॉक्टर बनतो. याचा अर्थ डॉक्टर होण्यासाठी दैवाने त्याच्याकडून सर्व प्रयत्न करून घेतले व मुलाला डॉक्टर बनविले. याचा अर्थ आवश्यक ते सर्व प्रयत्न दैवच करून घेत असते.

**४४. दुर्गा : स्वतंत्र इच्छा (Free will) म्हणजे काय?**

**श्रीदत्त :** स्वतंत्र इच्छा म्हणजे स्वतःच्या इच्छेने जगणे. प्रत्येक माणसाला असे वाटते की, मी माझ्या इच्छेने जगत आहे; परंतु ही गोष्ट शंभर टक्के खोटी असते; कारण मनुष्य आपल्या नशिबानुसार जगत असतो. अनेक ग्रह त्याला

वेगवेगळी बुद्धी देत असतात. वातावरणातील असंख्य शक्ती त्याला स्वत:च्या हातातील खेळणे बनवून इकडून तिकडे नाचवत असतात आणि तरीही मरेपर्यंत माणसाला मी माझ्या इच्छेनुसार जगत आहे, असे वाटत असते. या सर्व गोष्टीला माया असे म्हणतात. स्वत:च्या इच्छेनुसार मनुष्य काहीही करू शकत नाही. नशिबाच्या हातातील तो एक खेळणे असतो.

स्वतंत्र इच्छेनुसार जगणे हे जीवनमुक्त सिद्धयोग्यांनाच शक्य होते. ते सुद्धा जीवनमुक्त अवस्था प्राप्त झाल्यानंतर. सुमारे शंभर-दीडशे वर्षे साधना झाल्यानंतरच ते शक्य होते. या व्यक्तीवर नशीब, ग्रह व प्रारब्ध याचा काहीही परिणाम होत नाही. अशी व्यक्ती लाखात एक असते.

ईश्वरभक्ती, साधना व दान अशा प्रकारच्या पुण्याचरणाने आपल्या प्रारब्धातील प्रतिकूल भाग अनुकूल करता येतो, या जन्मातील भोग टाळता येतात किंवा पुढे ढकलता येतात; परंतु जीवनमुक्त अवस्था प्राप्त होऊन शंभर-दीडशे वर्षे तपश्चर्या होईपर्यंत स्वतंत्र इच्छा (Free Will) प्राप्त होत नाही. एकदा स्वतंत्र इच्छा प्राप्त झाली, की मनुष्य ईश्वराच्या इच्छेनुसार जगू लागतो. कर्माच्या शृंखलांपासून त्याची मुक्तता होते.

# १२. उखीमठ

**दोन** दिवस कर्णप्रयागला राहून आम्ही तेथून निघालो. कर्णप्रयागहून २० किलो मीटर दूर असणाऱ्या आदिबद्रीचे दर्शन घेतले व तेथून रुद्रप्रयागला आलो. रुद्रप्रयाग येथे अलकनंदा व मंदाकिनी या दोन नद्यांचा संगम आहे.

संपूर्ण हिमालयच निसर्गरम्य व अत्यंत सुंदर आहे. हिमालयामध्ये आपल्याला काळ वेळेचे भान रहात नाही. एका विलक्षण आनंदामध्ये मन हरखून जाते. हिमालय यात्रेचे निमित्त करून श्रीस्वामीजी मला विविध प्रकारचे ज्ञान देत होते.

रुद्रप्रयागचा नरभक्षक बिबट्या (Man eating leapord of Rudra Prayag) हे जिम कॉर्बेटचे पुस्तक श्रीस्वामीजींनी १९६३ मध्ये प्रथम वाचले. नंतर त्यांनी जिम कॉर्बेटची

मिळतील तेवढी पुस्तके वाचली. कुमाऊचे नरभक्षक (Man eaters of Kumaon), देवळातला वाघ (Temple Tiger), अरण्य ज्ञान (Jungle Lore) अशी सर्व पुस्तके अनेकदा वाचली. ही पुस्तके वाचताना त्यांचे भान हरपून जात असे, मन हिमालयाशी एकरूप होऊन जात असे. त्यांना जिम कॉर्बेटविषयी अतिशय आदर होता.

कालाढुंगी येथे असणाऱ्या जिम कॉर्बेटच्या बंगल्यावर श्रीस्वामीजी मला घेऊन गेले. त्या घराचे आता म्युझियम केलेले आहे. जिम कॉर्बेटच्या सहवासात राहिलेल्या दोन माणसांचे दर्शन त्यांनी मला घडविले. या दोघांचेही वय शंभरच्या आसपास होते. या दोघांनाही श्रीस्वामीजींनी ब्लँकेट, शाल, मफलर, कानटोपी, बिस्किटाचे पुडे, खाद्य पदार्थ असे बरेच काही दिले व त्यांचा सत्कार केला. त्यांच्या मुलांना व नातवांना शर्ट-पँटची कापडे दिली व खूप खाऊ दिला; तसेच त्या सर्वांना खूप खूप पैसे म्हणजे चक्क पाच पाचशेच्या नोटा वाटल्या. श्रीस्वामीजी मला म्हणाले, या दोन माणसांनी जिम कॉर्बेटला खूप सहकार्य केले. त्यामुळे अनेकांचे प्राण वाचले. समाजावर यांचे खूप उपकार आहेत. मी थोडीशी कृतज्ञता दर्शविली इतकेच!

रुद्रप्रयाग या ठिकाणावरून जाताना या सर्व गोष्टींची मला आठवण झाली. जिम कॉर्बेटचे कालाढुंगी येथील घर नैनितालजवळ आहे. रुद्रप्रयागहून आम्ही उखीमठला आलो.

येथे आम्ही आता दोन दिवस राहणार आहोत. येथे आल्यावर प्रथम जिम कॉर्बेटसंबंधी जे काही आठवले ते सर्व लिहून काढले व श्रीस्वामीजींना प्रश्न विचारायचे ठरविले.

**४५. दुर्गा : पूर्वी खूप सिद्धपुरुष दिसायचे, हल्ली दिसत नाहीत, असे का ?**

**श्रीदत्त :** मध्यंतरीच्या काळामध्ये समाजाच्या अंत:करणातील भक्तिभाव बऱ्याच प्रमाणात कमी झाला होता. त्यामुळे सिद्धपुरुष दिसत नव्हते. १९८० नंतर समाजाच्या मनातील भक्तिभाव पुन्हा हळूहळू वाढू लागला आहे. त्यामुळे भावी काळामध्ये पुन:श्च सिद्धपुरुष दिसू लागतील.

**४६. दुर्गा : एखाद्या देशाला पारतंत्र्य का भोगावे लागते?**

**श्रीदत्त :** समाज जेव्हा बुरसटलेल्या आचारांचा, विचारांचा होतो, अर्थहीन रुढींच्या बंधनात जेव्हा समाजाला जखडले जाते, तेव्हा त्या देशावर परचक्र येते व देशाला पारतंत्र्य भोगावे लागते.

आपला भारत देश जवळ जवळ १४०० वर्षे पारतंत्र्यात होता. त्यातील १३०० वर्षे तर आपण पारतंत्र्यात आहोत हे

सुद्धा तो विसरून गेला होता.

**४७. दुर्गा : ईश्वर परमानंदमय आहे मग जगात इतके दु:ख का ?**

**श्रीदत्त :** परमानंदमय ईश्वर विन्मुखता हेच जगाच्या दु:खाचे कारण आहे. परमानंदमय ईश्वर हे प्रत्येक माणसाचे स्वरूप आहे. या स्वरूपाचा विसर पडल्याकारणाने अनेक समस्या तयार होतात.

ईश्वर अनेक रूपाने नटला. जगातील प्रत्येक जीव हा ईश्वरच आहे. सध्या आपण फक्त मनुष्यापुरतेच बोलू !

मनुष्याचे रूप धारण करताना ईश्वरानेच काही नियम बनविले आहेत.

१) मनुष्य जे काही कर्म करेल त्या कर्माचे फळ त्याला भोगावे लागेल.

२) सुख व दु:ख या दोन्ही गोष्टींचा अनुभव घेत असताना जोपर्यंत त्याला आत्मज्ञान होत नाही, स्वरूप साक्षात्कार होत नाही, तोपर्यंत तो अंतरंगामध्ये सतत बेचैन राहील. कितीही श्रीमंत झाला तरी बेचैन राहील व कितीही गरीब झाला तरी बेचैन राहील.

३) मनुष्याचा आत्मा हा ईश्वराकडून निघालेला आहे, तो परत ईश्वरापर्यंत पोहचेल. जोपर्यंत तो ईश्वराशी एकरूप होत नाही तोपर्यंत त्याला शांती, समाधान व आनंद या

गोष्टी प्राप्त होणार नाहीत; परंतु जसजसे सद्‌गुण वाढत जातील, तसतशी त्याला थोडीफार शांती, समाधान मिळेल.

४) मनुष्य जे काही दान करेल त्याच्या अनेक पटीने त्याला परत मिळेल. तो जमिनीमध्ये जे काही पेरेल त्याच्या अनेक पटीने पीक त्याला घेता येईल.

५) त्याने जर वाईट कर्मे केली तर त्याचे दुष्परिणाम त्याला भोगावे लागतीलच; पण त्याच बरोबर त्याच्या वंशजांना ही भोगावे लागतील.

६) तो जे काही नोकरी, उद्योग, धंदा अथवा शेती करेल या सर्व गोष्टींमध्ये यश येणे अथवा न येणे हे त्याच्या कर्मावर अवलंबून राहील. त्याने जर सत्कर्मे केली असतील, तर त्याला यश मिळेल, पण त्याने जर दुष्कर्मे केली असतील तर त्याला यश मिळणार नाही.

७) सत्कर्माचे अथवा दुष्कर्माचे फळ त्याला मृत्यूनंतरही भोगावे लागेल. सत्कर्मे केली असतील, तर मृत्यूनंतर आनंद लोक मिळेल. दुष्कर्मे केली असतील तर यातना लोक प्राप्त होईल. जन्म-मृत्यूची तशीच सुख-दु:खाची ही परंपरा मनुष्याला ईश्वरत्व प्राप्त होईपर्यंत चालू राहील.

सृष्टीच्या आरंभी ईश्वराने हे नियम बनविल्याकारणाने व या नियमांचे मनुष्याला काहीच ज्ञान नसल्याकारणाने ज्यांनी ज्यांनी दुष्कर्मे केली, वाईट कर्मे केली, अशी असंख्य माणसे गेली लाखो वर्षे अंध:कारमय लोकामध्ये यातना

भोगत आहेत व खूपच थोडी माणसे दिव्य लोकात किंवा आनंदमय लोकात गेली आहेत.

स्वार्थाला परमेश्वराच्या दरबारात सर्व पापाचे मूळ मानले जाते आणि पृथ्वीतलावरील मनुष्य जे काही करतो ते स्वार्थासाठीच करतो किंबहुना स्वार्थाशिवाय दुसरे तो काहीच करू शकत नाही. यामुळे त्याच्या जीवनात दु:ख निर्माण होते. दु:ख ही जरी वाईट गोष्ट असली, तरी दु:ख माणसाला ईश्वराची आठवण करून देते. माणसाच्या मूळ स्वरूपाची आठवण करून देते, या दु:खामुळेच मनुष्य ईश्वराकडे वळतो. ईश्वराची भक्ती करू लागतो. योगसाधना करतो. जसजशी ईश्वरभक्ती वाढत जाते, साधना तपस्या वाढत जाते, तसतशी आत्म्यावरील आवरणे गळून पडू लागतात, जीवनात आनंद वाढू लागतो. अनेक जन्मांच्या साधनेनंतर विचार विजय व कल्पना विजय साध्य होतात व त्यानंतर सच्चिदानंदस्वरूप परमात्मा हृदयात प्रगट होतो व जीवन आनंदमय होते.

**४८. दुर्गा : आपण नि:स्वार्थीपणे वागत असलो, इतरांना आनंद देण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न करत असलो व लोकांनी दिलेला त्रास सहन करत असलो, तरीसुद्धा आपल्या जीवनामध्ये अडीअडचणी निर्माण होतात, याचे कारण काय ?**

**श्रीदत्त :** अशी माणसे आध्यात्मिकदृष्ट्या खूप उन्नत

असतात. आध्यात्ममार्गावरून चालत असणारी त्यांची गाडी आनंदाच्या अतिरेकाने घसरू नये म्हणून ईश्वर अधून-मधून अशी इंजेक्शन्स देत राहतो व आपल्या या प्रिय भक्ताला जाणीव करून देतो, की अद्याप तुला पूर्णत्व प्राप्त झालेले नाही.

**४९. दुर्गा : मनावर विजय कसा मिळविता येईल ?**

**श्रीदत्त :** मनावर विजय प्राप्त झाला, की पंचाहत्तर टक्के आध्यात्मिक प्रवास पूर्ण होतो. त्यासाठी मन प्रथम शुद्ध करावे लागते. मन शुद्ध होण्यासाठी नकारात्मक विचार शंभर टक्के घालवावे लागतात, सकारात्मक विचार करावे लागतात. वाईट विचार मनात येऊ देता कामा नये. नेहमी चांगले विचार करावे लागतात. दान व परोपकार करणे आवश्यक असते. प्रयत्नपूर्वक सद्‌गुणांचे आचरण करावे लागते. इतक्या सर्व गोष्टी झाल्यानंतर बिंदू त्राटक करावे लागते. एक वर्ष बिंदू त्राटक केल्यानंतर पुढे एक वर्ष ज्योति त्राटक करावे लागते. ही त्राटक साधना दररोज सकाळ-संध्याकाळ पाच पाच मिनिटे केली तरी चालते. याने मनोविजय प्राप्त होतो. मन अशुद्ध असताना ते जबरदस्तीने एकाग्र करण्याचा प्रयत्न केल्यास असे मन साधकाला अक्षरश: रसातळाला नेऊन पोचविते. म्हणून...

**मन करा रे प्रसन्न । सर्व सिद्धींचे कारण ।।**

असे म्हटले जाते.

मनाला प्रसन्न करायचे असते. त्याला नेहमी आनंदी ठेवायचे असते व ही गोष्ट सर्वांना फक्त आनंद देऊनच साध्य होते.

**५०. दुर्गा : नाद, बिंदू, कला म्हणजे काय ?**

**श्रीदत्त :** श्वासावर लक्ष ठेवून जो जप केला जातो (सोऽहम अथवा अन्य कुठलाही मंत्र अथवा नाम) त्याने एक प्रकारची तंद्रा अवस्था प्राप्त होते. या तंद्रा अवस्थेला **लय** असे म्हणतात. येथे जप बंद पडतो, मन निर्विचार होते व हे निर्विचार मन श्वासामधून निर्माण होणाऱ्या नादामध्ये लीन होऊ लागते. या अवस्थेला **नाद** असे म्हणतात.

या नाद अवस्थेचा खूप खूप अनुभव घ्यावा लागतो व अभ्यास करावा लागतो. नाद जितका खोल जातो तितका तो चांगला असतो. या अवस्थेत मन पूर्ण लीन झाले, की मिटलेल्या डोळ्यांसमोर काजव्याप्रमाणे बिंदू दिसू लागतात. या अवस्थेला **बिंदू** असे म्हणतात. प्राथमिक अवस्थेमध्ये असंख्य बिंदू विखुरलेले दिसतात. बराच काळ मनोलय साध्य झाल्यानंतर त्या असंख्य बिंदूचा एकच बिंदू होतो व तो बिंदू सतत नजरेसमोर राहतो. हा बिंदू नजरेसमोर स्थिर झाला की, **बिंदू** ही अवस्था प्राप्त होते. या बिंदूमध्ये मनोलय साध्य

झाल्यानंतर त्या बिंदूची ज्योति होते. ही ज्योति ब्रह्मरंध्रातून (fontanel) बाहेर येते. या ज्योतिला **कला** असे म्हणतात. यालाच स्वरूप अथवा निजरूप असे म्हणतात.

**५१. दुर्गा : नाद, बिंदू, कला यांचा अनुभव कसा येतो, या विषयी तुम्ही सांगितले. या अवस्थांच्या नंतर आणखी कुठल्या अवस्था असल्यास सांगा?**

**श्रीदत्त :** नाद, बिंदू, कला यांचा अनुभव आल्यानंतर **नादांत** नावाची अवस्था प्राप्त होते. येथे आत्मसाक्षात्कार होतो. यानंतर शक्ती, समना, उन्मना, अवधूत व सहजावस्था अशा पायऱ्या आहेत; परंतु तो सर्व सिद्धांचा प्रांत असल्याकारणाने त्या विषयी मी काही लिहिणे योग्य होणार नाही. काही रहस्ये गुप्त ठेवणे योग्य असते.

**५२. दुर्गा : ग्रहगतीचे परिणाम मानवी मनावर कसे होतात ?**

**श्रीदत्त :** पूर्वजन्मामध्ये जी काही चांगली-वाईट कर्मे केलेली असतील, त्या कर्मानुसार एका विशिष्ट ग्रहस्थिती मध्ये माणसाचा जन्म होतो. त्यावेळी जी ग्रहस्थिती असेल ती ग्रहस्थिती मृत्यूपर्यंत त्या माणसावर नियंत्रण करत असते. त्या ग्रहस्थितीनुसारच तो मनुष्य वर्तन करतो. ग्रहस्थितीने जर त्याला इंजिनिअर बनवायचे ठरविले असेल, तर त्या

माणसाला आपण इंजिनिअर व्हावे असे वाटते व तो इंजिनिअर होतो. ग्रहस्थितीने जर त्याला डॉक्टर बनवायचे ठरविले असेल, तर तद्नुसार त्याला डॉक्टर व्हावे असे वाटते व तो डॉक्टर होतो. ग्रहस्थिती ही माणसाच्या मनावर परिणाम करत असते व तद्नुसार मनुष्य वागत असतो.

श्रीस्वामीजींनी जे काही सांगितले, ते मी लिहून घेतले. गेल्याच महिन्यात ग्रहस्थिती माणसाच्या मनावर कसा परिणाम करत असते, याचा मला एक अनुभव आला. तो अतिशय उद्बोधक असल्याकारणाने पुढे देत आहे.

माझ्या माहितीतील एक तरुण मुलगा अतिशय आळशी होता. पंचवीस वर्षांचा झाला तरी सुद्धा सकाळी साडेअकरा पर्यंत झोपून राही. साडेअकरा ते बाराच्या दरम्यान उठल्या-नंतर स्नान करून तो जेवत असे व पुन्हा एक ते दीडच्या दरम्यान झोपत असे व संध्याकाळी सहा-साडेसहाला उठत असे. त्याची पत्रिका मी एका ज्योतिषाला दाखविली. ज्योतिषाने सांगितले, 'हा प्रचंड आळशी आहे. पूर्वजन्मी केलेल्या गुरुसेवेमुळे याच्यावर गुरुची कृपा आहे. गुरुकृपेने याला जेवायला मिळेल; परंतु हा स्वत:हून कुठलाही नोकरी-धंदा करणार नाही.'

मानवी मनावर ग्रहगतीचे कसे परिणाम होतात याचे हे उत्तम उदाहरण आहे, असे मला वाटते.

**५३. दुर्गा : काही लोक मृत्युपत्र तयार करतात व मी मेल्यावर माझी प्रॉपर्टी दान करा, असे लिहितात. यावर मला असे विचारायचे आहे, की जिवंतपणी दान करणे योग्य की, मृत्युपत्राद्वारे दान करणे योग्य ?**

**श्रीदत्त :** जिवंतपणी दान करणे अधिक चांगले; परंतु काही कारणाने जिवंतपणी दान करणे शक्य नसेल, तर मृत्युपत्राद्वारे दान करणेही चांगले. अशा दानाने आत्म्याला सद्‌गतीचा मार्ग मिळतो, आत्म्याचा उद्धार होतो.

**५४. दुर्गा : पावित्र्य म्हणजे काय व ते कसे राखावे?**

**श्रीदत्त :** सूक्ष्म शरीर शुद्ध होणे म्हणजे पावित्र्य. जप, हवन, स्तोत्रपठण, प्राणायाम, ध्यान, दीर्घश्वसन या गोष्टींनी सूक्ष्म शरीर शुद्ध होते, पवित्र होते. सूक्ष्म शरीराची पवित्रता राखण्यासाठी दररोज सकाळी एक तास व संध्याकाळी एक तास हवन करावे. एखाद्या स्तोत्राचे भरपूर पाठ करावेत व किमान दोन तास साधना करावी. पंधरा मिनिटे तरी प्राणायाम करावा. याने सूक्ष्म शरीराचे पावित्र्य राखले जाते.

# १३. श्रीनगर (गढवाल)

उखीमठच्या जवळच गुप्तकाशी नावाचे एक स्थान असून, तेथे भगवान शंकराचे गुप्तरूपाने वास्तव्य होते असे म्हणतात. उखीमठ येथील वास्तव्य संपवून जवळच असलेल्या देवरियातालकडे जाण्यास निघालो. असे म्हणतात, की पूर्वी देवरियाताल या परिसरामध्ये खूप महात्मे होते. पर्यटकांच्या सततच्या आगमनामुळे देवरियाताल येथे पूर्वीसारखा महिमा दिसून येत नाही. देवरियातालहून आम्ही उखीमठला परत आलो. उखीमठहून एक रस्ता केदारनाथला जातो. केदारनाथला आमचे जाणे होणार नाही; कारण केदारनाथचा रस्ता बंद आहे. सुमारे बावीस वर्षांपूर्वी श्रीस्वामीजीं बरोबर केदारनाथला जाण्याचा व राहण्याचा योग आला होता. त्यानंतर आज तागायत पुन्हा तसा योग आला नाही. उखीमठहून आम्ही

चोपता येथे गेलो. चोपता येथून हिमालयाचे अनुपम निसर्ग सौंदर्य दिसून येते. चोपता येथून पुढे आठ किलोमीटर अंतरावर तुंगनाथ नावाचे स्थान आहे. आठ किलोमीटर पायी प्रवास करावा लागतो. सध्या हे स्थान बर्फामध्ये झाकले असल्या-कारणाने तेथेही जाणे होणार नाही. तुंगनाथ परिसरामध्ये आजही काही योगी गुप्तरूपाने तपस्या करत आहेत, असे म्हटले जाते. तेथे अनेक गुंफा असून, या गुंफांमध्ये प्राचीन ग्रंथसंपदा ठेवली आहे, असे म्हटले जाते. चोपता परिसरातील निसर्गसुंदर हिमालय पाहून आम्ही श्रीनगरला आलो. श्रीनगर येथे अलकनंदा नदी आहे. रात्री श्रीनगर येथे राहिलो. श्रीनगरच्या जवळच एक गुंफा आहे. ती गुंफा दाखविण्यासाठी श्रीस्वामीजी आम्हाला घेऊन गेले. या परिसरामध्ये बहुतेक करून अघोर पंथाचे साधक साधना करतात. आमच्या सुदैवाने आम्ही जेव्हा तेथे गुहेतील काली मंदिरात गेलो तेव्हा तेथे कोणीही अघोरपंथीय साधक नव्हता. प्राचीनकालीन दोन-तीन मंदिरे तेथे आहेत. अलकनंदेच्या किनारी आम्ही ध्यान करत बसलो. श्रीनगर ते रुद्रप्रयाग हा परिसर अतिशय सुंदर आहे, मनाला मोहून टाकणारा आहे. या परिसरात बऱ्याच ठिकाणी आम्ही ध्यान केले. संध्याकाळी गेस्ट हाऊसवर परत आलो, सर्व प्रवास वर्णन लिहून काढले व श्रीस्वामीजींना प्रश्न विचारण्यास सुरुवात केली.

**५५. दुर्गा : वृक्षांमध्ये आत्मे असतात का ?**

**श्रीदत्त :** वृक्षांमध्ये आत्मे असतात. इतकेच नव्हे, तर ते मानवाबरोबर बोलतात. मानवाला मार्गदर्शनही करतात. त्यांना भावनाही असतात, काही वृक्षांमध्ये पिशाच्चांचे आत्मे असतात, काही वृक्षांमध्ये यक्ष-यक्षिणी असतात, काही वृक्षांमध्ये देव-देवता असतात.

माझ्या माहितीतील एक मनुष्य दररोज रात्री रूईच्या झाडाजवळ लघुशंकेस जात असे. दोन-चार दिवस असे केल्यानंतर एका रात्री तो तेथे लघवी करत असताना कोणीतरी त्याच्या इतक्या जोरात थोबाडीत मारली, की त्याचे दोन दात निखळून पडले.

माझ्या माहितीतील दुसरा एक साधक वनस्पती साधना करायला गेला. एका वृक्षावरील बांद्याला त्याने अभिमंत्रित केले. तो बांदा जेव्हा तोडायला गेला तेव्हा त्याला कोणीतरी उचलले व हवेत भिरकावून दिले. ज्या झाडावर तो चढला होता त्या झाडापासून ४००-५०० फूट दूर अंतरावर जाऊन पडला.

यावरून वृक्षांमध्ये आत्मे असतात हे सिद्ध होते. औदुंबर वृक्षाने माझ्याकडे एकदा माती मागितली व पिंपळ वृक्षाने तुमच्या सेवकाने मला आठ दिवस पाणी दिले नाही, अशी तक्रार केली. या माझ्या दोन्ही अनुभवांवरून वृक्ष आपले मनोगत कळवू इच्छितात हे सिद्ध होते. वृक्षांनाही मन असते,

भावना असतात, विचार असतात व सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे जगण्याची इच्छा असते, हे सिद्ध होते.

तुमच्या प्रश्नाचे उत्तर देत असताना मला दोन-तीन गोष्टी आठवल्या त्या सांगतो.

एका भव्य वारुळाशेजारी एक साधक बसून राहिला. चोवीस तास बसल्यानंतर संध्याकाळी एक बाई तेथे आली व त्या साधूला म्हणाली, 'तू येथे बसू नकोस, त्यामुळे आम्हाला त्रास होतो!' 'तू येथून निघून जा !' त्या साधूने तिकडे दुर्लक्ष केले. दुसऱ्या दिवशी ती स्त्री परत आली व तिने पुन्हा कडक शब्दांत तेथून जाण्याबद्दल सांगितले, तरीही तो तेथून हलला नाही. तिसऱ्या दिवशी तीच बाई परत आली. तिने अतिशय उग्र रूप धारण केले होते व ती म्हणाली की, 'आत्ताच्या आत्ता येथून चालता हो, नाहीतर भयंकर शिक्षेला तोंड द्यावे लागेल.' तरीही तो साधू तेथेच बसून राहिला. रात्री त्याला एक किडा चावला. सकाळपर्यंत त्याच्या अंगावर असंख्य फोड उठले. त्या फोडांमधून लस वाहू लागली. शेवटी त्याला तेथून उठून जावे लागले. कुमारस्वामी नावाच्या माझ्या सेवकाने त्याची सेवा करून त्याला बरे केले. यावरून त्या वारुळामध्ये असणाऱ्या त्या आत्म्याला त्या साधूच्या तेथे राहण्याने त्रास होत होता हे सिद्ध होते.

अनेक झाडांमधून साधूंचे आत्मे बाहेर येतात, दर्शन देतात व पुन्हा झाडांमध्ये गुप्त होतात, हे मी स्वत: पाहिले

आहे. माझ्या ओळखीचे एक साधू होते ते फळे, फुले, हार, नारळ घेऊन एका झाडाजवळ जायचे. त्या झाडातून एक आत्मा प्रकट होत असे व माझ्या ओळखीच्या साधूच्या हातातील फळे, फुले, हार, नारळ या सर्व गोष्टींचा स्वीकार करत असे. यावरून वृक्षांमध्ये आत्म्यांचे निवासस्थान असते, हे सिद्ध होते.

**५६. दुर्गा : पिशाच्चांचा प्रभाव कोणावर पडतो व कोणावर पडत नाही?**

**श्रीदत्त :** हे ज्याच्या त्याच्या प्रारब्धावर अवलंबून आहे. ज्या माणसाचे प्रारब्ध भूत आत्म्याशी संलग्न (connecting) असेल त्याच्याशीच भूत आत्म्याचा संबंध येतो, इतर कोणाशीही येत नाही.

**५७. दुर्गा : ग्रह आणि नक्षत्र मानवी जीवनावर कसा काय परिणाम करतात ?**

**श्रीदत्त :** ग्रह आणि नक्षत्र हे काही फक्त खडक, दगड आणि माती यांचेच बनलेले नाहीत, खरं म्हणजे कोट्यावधी शक्तीमान जीवांचे अस्तित्व या ग्रह, नक्षत्रांवर आहे. या सर्व गोष्टी मानवाला अद्याप अज्ञात आहेत. या अज्ञात शक्ती मानवी जीवनावर सतत प्रभाव पाडत असतात, तसेच प्रत्येक माणसाच्या कर्मानुसार त्याला त्याच्या कर्माचे फळ देत

असतात. चंद्राच्या प्रभावामुळे समुद्राला भरती व ओहोटी येते. सूर्याच्या प्रभावामुळे पृथ्वीवर वादळे निर्माण होतात. जेव्हा शुक्र पृथ्वीच्या जवळ येतो, तेव्हा पृथ्वीवर ठिकठिकाणी त्सुनामी नांवाची भयंकर चक्रीवादळे निर्माण होतात व यात लाखो लोकांना प्राण गमवावे लागतात.

२००४ मध्ये शुक्र पृथ्वीच्या जवळ आल्याकारणाने पृथ्वीवर त्सुनामीने भयंकर संहार केला होता.

**५८. दुर्गा : स्तोत्र वाचनाचे परिणाम काय होतात ?**

**श्रीदत्त :** स्तोत्र वाचल्याने देवतेची कृपा होते. यासाठी कमीत कमी दररोज २१ वेळा स्तोत्र वाचायला हवे. दररोज ३६ वेळा या प्रमाणे १२१ दिवस स्तोत्र वाचले असता खूप चांगले अनुभव येतात.

**५९. दुर्गा : हवनाचे परिणाम काय होतात ?**

**श्रीदत्त :** हवनाने सूक्ष्म शरीर शुद्ध होते, आध्यात्मात प्रगती होते, मंत्र सिद्ध होतात, वातावरणामध्ये पवित्रता निर्माण होते. ज्या घरामध्ये हवन केले जाते ते घर पवित्र होते. तेथे वाईट शक्ती रहात नाहीत. देवतांचा निवास घरामध्ये होऊ लागतो, मन एकाग्र होऊ लागते, मनात चांगले विचार येऊ लागतात.

**६०. दुर्गा : वास्तू शुद्ध कशी राखावी ?**

**श्रीदत्त :** वास्तू मध्ये ईश्वराच्या पवित्र स्तोत्रांचे पठण करत राहावे. त्याच प्रमाणे दररोज सकाळ-संध्याकाळ हवन करावे. देवासमोर तुपाचा दिवा लावावा. तुपाचा दिवा लावणे शक्य नसल्यास तेलाचा दिवा लावावा. घरातील प्रत्येक खोलीमध्ये अगरबत्ती फिरवावी व देवाजवळ लावावी. या गोष्टी केल्याने वास्तू पवित्र राहते.

**६१. दुर्गा : मानवी जीवनावर दिशांचे परिणाम कसे होतात ?**

**श्रीदत्त :** पृथ्वीच्या पोटातून विविध प्रकारचे प्रवाह वाहत असतात. त्यांचा अभ्यास करून दिशांचे परिणाम ठरविले गेले आहेत.

**पूर्व दिशा :** पूर्व दिशेकडून वाहणारे प्रवाह हे प्रकाश मार्गाचे आहेत, देव-देवतांचे आहेत. त्यामुळे पूर्व दिशेकडे तोंड करून जप, ध्यान केले असता खूप चांगले अनुभव येतात, ज्ञानप्राप्ती होते, प्रकाशाचा मार्ग मिळतो, देव-देवतांची कृपा होते.

**ईशान्य दिशा :** ईशान्य दिशेकडून वाहणारे प्रवाह पूर्व दिशेप्रमाणेच दैवी असतात, प्रकाशमान असतात व ईश्वरीय असतात.

**उत्तर दिशा :** उत्तर दिशेकडून वाहणारे प्रवाह हे सिद्धपुरुषांचे असतात, ऋषींचे असतात. या दिशेकडे तोंड करून जप-ध्यान केले असता दैवी कृपा व ज्ञान प्राप्त होते.

पूर्व, ईशान्य व उत्तर दिशा या मोक्षप्राप्ती करून देणाऱ्या आहेत.

**पश्चिम दिशा :** या दिशेकडून वाहणारे प्रवाह साधकाला संपत्ती, ऐश्वर्य व कीर्ती प्राप्त करून देतात. देव-देवतांची कृपा प्राप्त करून देतात.

**वायव्य दिशा :** वायव्य दिशेकडे तोंड करून जप केला असता पश्चिम व उत्तर या दोघांची मिश्रफळे प्राप्त होतात.

**दक्षिण दिशा :** दक्षिण ही पिशाच्चांची दिशा आहे, वाईट शक्तींची दिशा आहे. या दिशेकडे तोंड करून साधना केली असता दुसऱ्याचे वाईट करण्याची शक्ती प्राप्त होते. असा मनुष्य कधीही दुसऱ्याचे चांगले करू शकत नाही. दक्षिण दिशेकडे तोंड करून साधना केली असता मनात कधीही चांगले विचार येत नाहीत, फक्त वाईट विचारच मनात येतात. काळी विद्या (Black Magic), चेटूक विद्या (Witch-craft) अशा दुसऱ्याचे वाईटच करण्याच्या विद्या, पिशाच्च विद्या, काळ्या शक्ती प्राप्त करू इच्छिणारे साधक दक्षिण दिशेकडे तोंड करून साधना करतात. अतिशय दुष्ट अशा शक्तींचे प्रवाह दक्षिण दिशेकडून वाहतात. सैतानी शक्तींचे प्रवाह दक्षिण दिशेकडून वाहतात.

**नैर्ऋत्य दिशा :** दक्षिण दिशेपेक्षाही भयंकर अशा शक्तींचे प्रवाह नैर्ऋत्य दिशेकडून वाहतात. राक्षसी शक्तींचे प्रवाह या दिशेकडून वाहतात. या दिशेला राक्षसांची दिशा असे म्हटले जाते. राक्षसी आत्मे या दिशेला राहतात. दक्षिण दिशेप्रमाणेच या दिशेची फळे आहेत. दक्षिण किंवा नैर्ऋत्य दिशेकडे पाय करून कधीही झोपू नये. पिशाच्च बाधा व रोग होतात.

**आग्नेय दिशा :** या दिशेला अग्नीची दिशा मानलेले आहे. अग्नितत्त्वाची उपासना करणारे लोक या दिशेकडे तोंड करून साधना करतात. यक्ष-यक्षिणींची साधना आग्नेय दिशेकडे तोंड करून केली जाते.

सर्वसामान्य माणसांच्या जीवनावर दिशांचे परिणाम फारसे दिसून येत नाहीत.

साधकांना मात्र दिशांचे भान ठेवावेच लागते.

# १४. उत्तरकाशी

**श्री**नगरहून आम्ही निघालो आणि देवप्रयाग येथे आलो. देवप्रयाग येथे अलकनंदा व भागीरथी यांचा संगम आहे. गमतीची गोष्ट म्हणजे गोमुखहून गंगा निघते ती गंगोत्रीला येते. गंगोत्रीहून ती उत्तरकाशीला येते. उत्तरकाशीहून टिहरीला येते. येथपर्यंत सुमारे २०० किलोमीटर तिचा प्रवास पूर्ण झालेला असतो. टिहरीहून ती देवप्रयागला येते. टिहरी ते देवप्रयाग या भागातील गंगेला भागीरथी असे म्हटले जाते. अलकनंदा व भागीरथी संगमावर दोन गुंफा आहेत. देवप्रयागहून आम्ही पुढे निघालो आणि धरासू येथे आलो. धरासू येथून एक रस्ता गंगोत्रीकडे जातो व एक रस्ता यमुनोत्रीकडे जातो.

गंगोत्री व यमुनोत्री ही दोन स्थाने बर्फाच्या वर्षावाने झाकली गेली असल्याने, तेथे भरपूर बर्फ पडला असल्याने

दोन्हीकडील रस्ते बंद आहेत. गंगोत्रीच्या मार्गाने आम्ही आणखी बरेच पुढे जाणार आहोत; परंतु मी वाचकांना प्रथम काही यमुनोत्रीच्या गोष्टी सांगते.

बावीस वर्षांपूर्वी श्रीस्वामीजींबरोबर यमुनोत्रीची यात्रा करण्याचा योग आला होता. हनुमान चट्टी ते यमुनोत्री सुमारे १३ किलोमीटर आम्ही चालत गेलो होतो. यमुनोत्रीला यमुना नदीच्या उगमाजवळ एका बाजूला प्रचंड थंडगार पाणी, ज्याला स्पर्श करणेही शक्य नव्हते, पाण्यात बोटे बुडविली असता बोटे वाकडी होऊन जात होती, तेथेच दुसऱ्या बाजूला भूगर्भातून अतिशय उकळलेले पाणी बाहेर येत होते. या उकळत्या पाण्याच्या आसपास जाणेही शक्य नव्हते. हे उकळते पाणी यमुनेच्या प्रचंड थंड पाण्यात येथे मिसळून जात होते. तेथे यात्रिक स्नान करत होते. बावीस वर्षांपूर्वीच्या या माझ्या स्मृती आता जागृत झाल्या व डोळ्यांसमोर हनुमान चट्टी, जानकी चट्टी व यमुनोत्री असा मार्ग तरळून गेला. यमुनोत्रीहून आम्ही परत येताना जानकी चट्टीच्या आसपास पायवाटेवर एक अतिशय वृद्ध स्त्री बसलेली होती. असंख्य यात्रेकरू तिच्याकडे दुर्लक्ष करून पुढे जात होते. श्री स्वामीजींनी मला त्या स्त्रीला भरपूर पैसे, गरम कपडे, साडी, ड्रेस मटेरिअल वगैरे द्यायला लावले. तेथून सुमारे शंभर-दीडशे पावले पुढे आल्यानंतर श्रीस्वामीजी मला म्हणाले, 'ती म्हातारी तेथे आहे का? पाहून या!'

मी परत तेथे गेले. ती म्हातारी तेथे बसलेली नव्हती. ती यमुनादेवी होती, असे श्रीस्वामीजी म्हणाले.

यमुनोत्रीकडे जाणे न झाल्याकारणाने स्मृतीची ही सर्व पाने चाळत आम्ही उत्तरकाशीकडे निघालो. उत्तरकाशीच्या पुढे सुखी, झाला, हरसील अशी हिमालयातील अत्यंत सुंदर गावे आहेत व नंतर आपण गंगोत्रीला पोहचतो.

गंगोत्री हे स्थान व त्याच्या आसपासचा परिसर बर्फाने झाकला गेला असल्याकारणाने हा मार्ग आता चार महिने बंद राहणार आहे. गंगोत्री, यमुनोत्री, केदारनाथ व बद्रिनाथ या चारही तीर्थस्थानाचे मार्ग वर्षातून चार महिने बंद राहतात. या चारही महिन्यांत येथे प्रचंड बर्फ पडतो. आम्ही उत्तरकाशीला राहणार आहोत. उत्तरकाशीहून जवळच श्रीस्वामीजींचे एकांतवासातील राहण्याचे स्थान आहे. तेथे आम्ही त्यांना सोडणार आहोत. तेथे हरिदास नावाचा एक सेवक त्यांना हरिद्वारला भेटायला आला व परत उत्तरकाशीला गेला होता. हा खूप मोठा व चांगला साधक आहे, असे श्रीस्वामीजींनी मला सांगितले. हरिद्वारला असताना तो मला म्हणाला की, मी गेली अनेक वर्षे हिमालयात रहात आहे. हिमालयातील अनेक प्रसिद्ध साधूंना मी ओळखतो. काही साधूंचे अब्जावधी रुपयांचे आश्रम आहेत, स्व:ताची हेलिकॉप्टर्स आहेत, तर काही साधू पूर्ण एकांतवासी आहेत. हिमालयातील अशा सर्व साधूंना भेटून त्यांच्याकडून ज्ञान

मिळविण्याचा मी खूप प्रयत्न केला. अगदी सिक्कीम, नेपाळ, आसाम भागातही जाऊन तेथील संत महंतांना भेटलो; परंतु ज्ञानाची माझी तहान कुठेच भागली नाही. ज्या साधूंच्या नावाने आध्यात्मावर अनेक पुस्तके आहेत, अशा साधू लोकांनाही भेटलो; परंतु मनाची तृप्ती काही होत नव्हती. त्या सर्वांचे ज्ञान आध्यात्मातील पहिल्या दुसऱ्या इयत्तेच्या पलीकडे काही जात नव्हते. एकदा अचानक उत्तरकाशीच्या पुढे गंगोत्री येथे गंगा नदीच्या किनारी असणाऱ्या अस्सी घाटावर श्रीस्वामीजींची भेट फक्त दोन मिनिटे झाली. त्या दोन मिनिटांत त्यांनी मला जे काही सांगितले, त्याने मी एकदम अंत:र्मुख झालो. सतत त्यावर विचार करू लागलो. आध्यात्मातील रहस्यमय गोष्टी फक्त दोन मिनिटांत सांगून श्रीस्वामीजी निघून गेले. तेव्हापासून मी ज्या ज्या वेळेला ध्यान करत असे त्या त्या वेळी त्यांचा चेहरा माझ्या डोळ्यांसमोर येई. पुढेपुढे हाच प्रकार दिवसा व रात्री होऊ लागला, डोळे उघडे असतानाही होऊ लागला. श्रीस्वामीजी कोण ? त्यांचे नाव काय ? ते कोठे राहतात ? मला काहीच माहीत नव्हते. असे सात-आठ महिने गेले आणि एक दिवस पुनश्च गंगोत्री येथे त्यांचे दर्शन झाले. तेव्हापासून त्यांच्या मार्गदर्शनानुसार मी साधना करत आहे.

हरिदासने ही सर्व हकिकत मला भेटला तेव्हा सांगितली होती. आम्ही त्याला उद्या भेटणार आहोत तेव्हा खूप चर्चा

रंगेल, अशी माझी अपेक्षा आहे. त्यावेळी श्रीस्वामींजीनी हरिदासला जे काही सांगितले ते मी शब्दश: लिहून घ्यायचे ठरविले आहे.

**६२. दुर्गा : मंत्र, स्तोत्र, पूजा यांच्या द्वारा परमशून्यात प्रवेश प्राप्त करणे शक्य आहे का ? कारण मंत्र, स्तोत्र, पूजा या सर्व गोष्टी अक्षरब्रह्मात येतात व परब्रह्म तर निरक्षर आहे.**

**श्रीदत्त :**

**कोटी पूजा समं स्तोत्रम् । कोटी स्तोत्रं समं जपः ।।**
**कोटी जपः समं ध्यानम् । कोटी ध्यानं समं लय : ।।**

कोटी पूजांपेक्षा स्तोत्राचे पाठ करणे श्रेष्ठ, कोटी स्तोत्रापेक्षा मनातल्या मनात जप करून त्यावर लक्ष केंद्रित करणे श्रेष्ठ, कोटी जपापेक्षा ध्यान करणे श्रेष्ठ व कोटी ध्यानापेक्षा शून्यामध्ये मनाचा लय होणे श्रेष्ठ होय.

भारतामध्ये व त्यातल्या त्यात हिमालयामध्ये संन्याशांना शास्त्रशुद्ध शिक्षण दिले जाते. अशा संन्याशांना शास्त्रशुद्ध शिक्षण देणाऱ्या कितीतरी संस्था हिमालयात अस्तित्वात आहेत. या सर्व संस्थांमध्ये संस्कृतमधून शिक्षण दिले जाते म्हणून हरिदाससारख्या विद्वान संन्याशाला श्री स्वामीजी संस्कृतमधून समजावून देत होते.

हरिदास हा कर्नाटकातील आहे. बंगळूरहून त्याने I. I. M. केले. तो कॅनरा बँकेत नोकरीला होता. एक दिवस बँकेच्या कामानिमित्त तो मुंबईहून गोव्याला जात असताना त्याच्या गाडीचा ॲक्सिडेंट झाला. त्याच्याबरोबर असणाऱ्या तिघांना किरकोळ जखमा झाल्या; परंतु हरिदास मात्र कोमात गेला. तो तीन महिने कोमात होता. डॉक्टरांच्या तीन महिन्यांच्या प्रयत्नांनंतरही तो कोमातून बाहेर आला नाही. तेव्हा एका संन्याशाने त्याच्या आई-वडिलांकडून; तसेच नातेवाइकांकडून हरिदास आमच्याकरिता मृत झाला आहे, असे लिहून घेतले व कोमात असलेल्या हरिदासला आपल्या ताब्यात घेतले आणि आपल्या अरण्यातील एकांतस्थानी त्याला घेऊन गेला. त्याच्यावर आयुर्वेदिक उपचार केले व त्याला शुद्धीवर आणले. तो शुद्धीवर आल्यानंतर काही दिवस त्याला आपल्याकडे ठेवून घेतले. त्याची प्रकृती शंभर टक्के चांगली झाल्यानंतर हिमालयात जाऊन गायत्री मंत्राचा जप करत राहा, योग्य वेळी तुझा गुरु तुला भेटेल, असे सांगितले. गुरूच्या आदेशाप्रमाणे गेली बारा वर्षे हरिदास हिमालयातील विविध ठिकाणी फिरून गायत्री पुरश्चरणे करीत आहे. आतापर्यंत २४ लाखांचे एक पुरश्चरण अशा प्रकारे तीन गायत्री पुरश्चरणे त्याने पूर्ण केली आहेत व हिमालयातील अतिशय दुर्गम भागात साधना केलेली आहे.

श्रीस्वामीजींच्या व हरिदासच्या संवादामध्ये मलाही

नवीन प्रकारचे ज्ञान मिळत आहे.

**६३. दुर्गा : उत्तम स्थिती कोणती ?**

**श्रीदत्त :**

**उत्तमा सहजावस्था । मध्यमा ध्यानधारणा ।।**
**मूर्खस्य प्रतिमापूजा । तीर्थयात्रा अधमाधमा ।।**

सहजावस्थेमध्ये राहणे उत्तम, ध्यानधारणा करणे ही मध्यम अवस्था आहे, मूर्खांनी म्हणजे अज्ञानी जीवांनी प्रतिमा पूजा करावी व अत्यंत खालच्या दर्जाची साधना म्हणजे तीर्थयात्रा होय.

श्रीस्वामीजी साधनेचे मर्म व अक्षरांच्या पलीकडील साधना कशा कराव्यात याचे ज्ञान हरिदासला देत होते; परंतु ते जसेच्या तसे शब्दश: या पुस्तकात घेणे योग्य नाही; परंतु एक गोष्ट मात्र खरी, की येथे मला विपुल ज्ञान मिळाले. जगातील सर्व विद्या अक्षरांवर आधारीत कशा आहेत व त्या अक्षरांच्या पलीकडील परब्रह्माला कसे जाणून घ्यायचे हे श्री स्वामीजींनी हरिदासला समजावून दिले.

**६४. दुर्गा : एकूण मिती किती आहेत ?**

**श्रीदत्त :** एकूण नऊ मिती असून, आपण तिसऱ्या मितीत राहतो. आपल्या जगाला त्रिमिती विश्व (Three Dimension World) असे म्हणतात. पहिल्या मितीपासून

नवव्या मितीपर्यंत परमात्म्याची सत्ता चालते. त्यापुढील सर्व आत्मे हे स्वतंत्र असतात. संस्कृत भाषेमध्ये या नऊ मितींना नवदुर्गा असे म्हटले जाते.

**६५. दुर्गा : एखादा कानडी भाषिक किंवा तामीळ भाषिक सिद्धपुरुष मराठी अथवा हिंदी भाषिक माणसाच्या मनातील विचार कसे ओळखतो ?**

**श्रीदत्त :** विचारांना भाषा नसते, विचारांना स्पंदने असतात, लहरी असतात, रंग असतात. सिद्धपुरुषांना या सर्व गोष्टी दिसत असल्याकारणाने ते परभाषिक माणसाच्या मनातील विचार अथवा चिंता ओळखू शकतात.

**६६. दुर्गा : गाईमध्ये पवित्र स्पंदने असतात हे खरे आहे काय ?**

**श्रीदत्त** : गाईमध्ये पवित्र स्पंदने असतात. गाईच्या सहवासात राहिल्याने आपले सूक्ष्म शरीर शुद्ध होते. १०८ वेळा गायत्री मंत्राचा जप केल्यानंतर जेवढी शुद्धता आपल्यामध्ये येते, तेवढी शुद्धता १० मिनिटे गाईजवळ बसून, राहिल्याने आपोआप प्राप्त होते.

एखादा मनुष्य सात्त्विक असेल, सज्जन व भक्तिमान असेल, तर मृत्यूनंतर त्याचा आत्मा गाईच्या शेपटीला धरून वैतरणा नदी पार करतो व दिव्य लोकात प्रवेश करतो. एखाद्या

माणसाला सिद्धपुरुषाचा आशीर्वाद प्राप्त झाला असेल, तर मृत्यूनंतर सिद्धपुरुषाचा हात धरून त्याचा आत्मा वैतरणा नदी पार करतो. म्हणून हिंदू धर्मामध्ये गाय व सिद्धपुरुष यांना खूप महत्त्व आहे.

# १५. ग्वालदम

**क**र्णप्रयागहून आम्ही निघालो व १५० किलोमीटर दूर असलेल्या ग्वालदम येथे आलो. ग्वालदम येथील निसर्गसौंदर्य अप्रतिम आहे. संध्याकाळच्या वेळेला जेव्हा सूर्याची किरणे बर्फावर पडतात, तेव्हा सर्व शिखरे गुलाबी रंगाची दिसू लागतात. हे दृश्य अतिशय सुंदर दिसते. आता परत मी माझ्या लिखाणाला सुरुवात केली.

**६७. दुर्गा : अश्वत्थामा जिवंत आहे का ?**

**श्रीदत्त :** हो ! अश्वत्थामा जिवंत आहे. फक्त अश्वत्थामाच नाही, तर अश्वत्थामासारखे असंख्य ऋषिमुनी अद्याप सदेहाने तपस्या करत आहेत.

**६८. दुर्गा : भारतात मोठमोठे सिद्धपुरुष होऊन गेले. त्यांनी दुष्टांना ताळ्यावर का आणले नाही ?**

**श्रीदत्त :** ज्याप्रमाणे नदी कोणालाही सांगत नाही की, माझ्याकडे या व पाणी प्या; तसेच नदी हेही म्हणत नाही की, मी फक्त गाईची व हरणांची तहान भागवेन, वाघ, सिंहासारख्या क्रूर पशूंची तहान भागविणार नाही. त्याचप्रमाणे सिद्धपुरुष हे स्थितप्रज्ञ असतात. जो त्यांच्यावर श्रद्धा ठेवतो, त्यांचे भले होते. परंतु ते काळाच्या ओघाला बदलू शकत नाहीत किंवा काळाच्या साम्राज्यात हस्तक्षेप करत नाहीत.

दुष्ट, दुर्जनांचे राज्य भारतावर आले. कोट्यावधी स्त्रीयांची अब्रू लुटली गेली. कोट्यावधी लोकांचे धर्मांतरण करण्यात आले पण हे सर्व का घडले याचा विचार कोणी केला आहे काय? सतीच्या प्रथेसारखी अत्यंत निंदनीय प्रथा ज्यांनी सुरू केली त्यांनी याचे दुष्परिणाम काय होतील याचा विचार कधी केला होता काय? १९४७ पूर्वीच्या ५००० वर्षांचा इतिहास पाहिल्यास राजा म्हटला, की त्याला शेकडो राण्या असल्याच पाहिजेत. जेवढ्या राण्या जास्त तेवढा राजा मोठा, अशी प्रथा होती. या प्रथेच्या बरोबरच दरबारी अधिकारी, संस्थानिक, जहागिरदार व श्रीमंत फक्त एकापेक्षा एक बायका करण्यातच रंगून गेलेले होते. वय वर्ष दहा होण्यापूर्वी मुलीचे लग्न झालेच पाहिजे, असा दंडक होता. काही ठिकाणी तर त्याहून लहान मुलींची लग्ने केली जात.

आजही भारतात या प्रथा सुरू आहेत. अशा असंख्य कुप्रथांचे दुष्परिणाम काय होणार ? संपूर्ण समाजालाच त्याचे परिणाम भोगावे लागणार नाहीत काय ? कुप्रथा मोडू पाहणाऱ्या प्रत्येक सत्पुरुषाला समाजाने छळलेच आहे. आजही खऱ्या सत्पुरुषाला छळायचे हे प्रकार चालूच आहेत. अशा समाजाला काळ तडाखे देत असतो. अशा वेळी सिद्धपुरुष कधीही काळाच्या प्रवाहात बदल करत नाहीत व तसे करणे योग्य नसते.

**६९. दुर्गा : माणसाला दारिद्र्य का येते ?**

**श्रीदत्त :** जवळ धन असताना जे लोक उन्मत्तासारखे वागतात अशा लोकांना कालांतराने दारिद्र्य भोगावे लागते. जे लोक आपल्या उत्पन्नातील किमान २० टक्के भाग दानधर्मात खर्च करतात त्यांना कधीही संपत्ती कमी पडत नाही. त्यांच्या घराण्यामध्ये आठ पिढ्यांपर्यंत म्हणजे सुमारे दोनशे वर्षांपर्यंत लक्ष्मीचा निवास राहतो. शंभर वर्षांपूर्वी ज्यांच्या घरामध्ये सोन्यानाण्यांनी भरलेल्या पेट्या होत्या त्यांच्या घरात आज जेमतेम खायला अन्न आहे, अशी परिस्थिती आहे व तेच लोक आता म्हणत आहेत. आमच्याकडे खायला अन्न नाही, तर आम्ही दान कोठून करायचे ?

# १६. कौसानी

**ग्वा**लदमहून आम्ही वैजनाथला आलो. वैजनाथ येथे सुमारे हजार वर्षांपूर्वीचे शंकराचे मंदिर असून, जवळच खळखळ वाहणारी गोमती नदी आहे. या स्थानामध्ये मनाला अतिशय आनंद होतो, इतके हे स्थान सुंदर आहे. सुमारे एक तासभर येथे ईश्वरचिंतन करून आम्ही कौसानीला गेलो. कौसानीहून हिमालयाचे दृश्य अतिशय सुंदर दिसते. बर्फाने झाकलेले पर्वत चारही बाजूला दिसतात. कौसानीला भारताचे स्वित्झर्लंड म्हटले जाते. महात्मा गांधी कौसानीला १२ दिवस राहिले होते. कौसानीपासून २० किलोमीटर अंतरावर एक शंकराचे सुंदर स्थान आहे, परंतु दरड कोसळल्याने आम्ही त्या स्थानात जाऊ शकलो नाही. कौसानीच्या आसपासची निसर्ग दृश्ये पाहून बर्फाच्छादित हिमालयाची शिखरे पहात पुढील लेखनास सुरुवात केली.

## श्रीदत्त-दुर्गा संवाद

**७०. दुर्गा : सविकल्प समाधी व निर्विकल्प समाधी यामध्ये फरक काय ?**

**श्रीदत्त :** सविकल्प समाधीमध्ये मी समाधिस्त आहे, याचे भान असते व निर्विकल्प समाधीमध्ये मी आहे हे भानसुद्धा मावळते. हा भेद अतिशय सूक्ष्म असतो. विचाराचे तरंग मनात उठणे बंद होऊ लागले, की हळूहळू समाधी लागू लागते. सुरुवातीला थोडा वेळ समाधी लागते. जसजशी प्रॅक्टिस वाढत जाते तसतसा समाधीचा काळ वाढत जातो आणि मन निर्विकल्प होऊ लागते. हळूहळू काही सेकंदांत मन निर्विकल्प करणे जमू लागते. साधकाला निर्विकल्प समाधी लागते व जीवन धन्य होते. निर्विकल्प समाधी अवस्था अंगी जिरल्यानंतर साधक सहजस्थितीचा अभ्यास करतात व हळूहळू त्यातही पारंगत होतात.

**७१. दुर्गा : सहजस्थिती म्हणजे काय ?**

**श्रीदत्त :** सुरुवातीला ज्याप्रमाणे आपण बटन ऑन करताच लाइट लागतो व बटन ऑफ करताच लाइट बंद होतो, अशी स्थिती असते. थोडक्यात, स्वीच ऑफ केल्याप्रमाणे मनात येणारे विचार थांबविता येतात. याची खूप काळ प्रॅक्टिस करावी लागते. हळूहळू मनात उठणाऱ्या कल्पना थांबविण्याची प्रॅक्टिस करावी लागते. असे करणे जमले, की समाधी लागू लागते. समाधी लावणे व उतरविणे अशी प्रॅक्टिस खूप करावी

लागते. बरेच दिवस अशी प्रॅक्टिस केल्यानंतर जीवनातील सर्व व्यवहार करताना मन स्वीच ऑफ या अवस्थेमध्ये म्हणजे मनात कुठलेही विचारतरंग किंवा कल्पनातरंग उठू न देता वागण्याची प्रॅक्टिस करावी लागते. बोलणे, चालणे, भांडणे, वादविवाद करणे, सर्व प्रकारची कामे करणे व हे सर्व करताना मनात एकही विचारतरंग उठू न देणे अशी प्रॅक्टिस करावी लागते. ही प्रॅक्टिस जेव्हा सहजपणे करता येऊ लागते, कुठल्याही प्रकारचे मानसिक कष्ट न घेता हे जेव्हा जमू लागते तेव्हा सहजस्थिती प्राप्त होते. अर्थात् याकरिता अनेक वर्षे खर्च करावी लागतात.

चोवीस तास अनुसंधान ठेवावे लागते. अनेक वर्षांच्या अभ्यासाने प्रथम सविकल्प समाधी लागते. नंतर निर्विकल्प समाधी लागते. निर्विकल्प समाधीचाही अनेक वर्षे अभ्यास केल्यानंतर सहजस्थितीमध्ये प्रवेश प्राप्त होतो. सहजस्थितीचा अनेक वर्षे अभ्यास केल्यानंतर सहजावस्था प्राप्त होते. पुष्कळ वेळा यासाठी तीन-चार जन्मही खर्ची घालावे लागतात. एकदा का ही सहजस्थिती प्राप्त झाली, की आत्म्यांचा प्रवास संपतो. साधकाला कैवल्यपदाची प्राप्ती होते.

**७२. दुर्गा : आपण समाजात का येत नाही ?**

**श्रीदत्त :** प्रत्येक सत्पुरुषाला ईश्वराच्या आज्ञेनुसार वागावे लागते. मी एकांतात राहावे अशी ईश्वराची इच्छा आहे म्हणून मी एकांतात राहतो.

७३. दुर्गा : GOD व्हर्सेस DOG म्हणजे काय ?

**श्रीदत्त : GOD व्हर्सेस DOG** म्हणजे दैवी शक्ती विरुद्ध आसुरी शक्ती (सैतानी शक्ती, वाईट शक्ती) यांचे चाललेले युद्ध !

वाईट शक्ती (DOG) पृथ्वीतलावरील मानवांना वाईट मार्गाने नेण्याचा प्रयत्न करतात. या वाईट शक्ती माणसामध्ये दंभ, दर्प, गर्व, हाताखालच्या लोकांना कस्पटासमान लेखण्याची प्रवृत्ती, स्वार्थ, कंजूष प्रवृत्ती, लोभ, क्रूरता, मग्रूरता, दुष्टपणा इत्यादी दोष तयार करतात. या प्रवृत्तींचा मनुष्य गुलाम होतो. या प्रवृत्तीमुळे त्याच्या हातून अनेक गुन्हे घडतात व त्याचे दुष्परिणाम त्याला भोगावे लागतात. जगामध्ये घडणाऱ्या सर्व वाईट गोष्टी, आतंकवाद इत्यादी वाईट शक्तींच्या प्रभावामुळे घडत असतात. समाजाला याचा त्रास होतोच; पण त्याचबरोबर वाईट शक्तीच्या प्रभावाखाली राहून जी माणसे वाईट कामे करतात त्यांना त्याचे दुष्परिणाम हजारो वर्षे भोगावे लागतात. या सर्व वाईट शक्तींना DOG असे म्हटले जाते.

GOD म्हणजे दैवी शक्ती. प्रकाशमय शक्ती, चांगली शक्ती ! सर्व चांगल्या गोष्टींचे प्रेरणास्थान, प्रेम, परोपकार, मानवता, करुणा, दया अशा प्रकारचे सर्व सद्‌गुण किंवा सत्प्रवृत्ती दैवी शक्ती (GOD) प्राप्त होत असतात. जगामध्ये जे काही सत्यम् शिवम् सुंदरम् आहे, जे काही चांगले आहे ते दैवी शक्तीच्या (GOD) अंतर्गत येते. मानवी जीवन किंवा

माणसाचे जीवन या चांगल्या व वाईट शक्तींनी भरलेले असते. चांगल्या शक्ती म्हणजे दैवी शक्ती किंवा ईश्वरी शक्ती त्याला वाईट गोष्टी करू नकोस असे सांगत असतात, तर वाईट गोष्टी त्याला सतत स्वत:कडे खेचत असतात व त्याला वाईट गोष्टी व वाईट विचार करायला भाग पाडत असतात.

चांगल्या व वाईट शक्तींचे हे युद्ध अनादी काळापासून सुरू आहे व पुढे अनंत काळ चालू राहणार आहे.

**७४. दुर्गा : धार्मिकता व आध्यात्मिकता यात भेद काय?**

**श्रीदत्त** : धार्मिकता विविध प्रकारची असू शकते, तर आध्यात्मिकता संपूर्ण पृथ्वीभर सारखीच असते.

जगात असंख्य प्रकारचे धर्म आहेत, त्यातील चालीरीती एकमेकांच्या अगदी विरुद्ध आहेत. काही धर्मांमध्ये दाढी, केस वाढविणे याला धार्मिकतेचे आचरण मानले जाते, तर काही धर्मांमध्ये तुळतुळीत दाढी करणे हे धार्मिकतेचे आचरण मानले जाते. अशा प्रकारे धार्मिकतेमध्ये विविधता असू शकते; परंतु आध्यात्मिकतेमध्ये विविधता असू शकत नाही. आध्यात्मिकता सर्वत्र एकच असते.

आध्यात्मिकता म्हणजे स्वत:च्या आत्म्याशी एकरूप होणे किंवा परमात्म्याशी एकरूप होणे. जे कोणी स्वत:च्या आत्म्याशी एकरूप होतात किंवा परमात्म्याशी एकरूप होतात

ते सर्वत्र एकच भाषा बोलत असतात. त्या सर्वांचे ज्ञान एकच असते. तेथे मुळीच द्वैत म्हणजे वेगळेपणा नसतो. परमात्म्याशी एकरूप झालेला हिंदू जे बोलेल तेच मुस्लिम बोलेल, ज्यू जे बोलेल तेच पॅलेस्टीनी बोलेल. आध्यात्मिकता सर्वत्र सारखी असते.

**७५. दुर्गा : कैलास पर्वत, मानस सरोवर याविषयी थोडीफार माहिती सांगावी.**

**श्रीदत्त :** उद्या आपण येथून प्रथम अल्मोड्याला जाणार आहोत व तेथून जागेश्वरला जाणार आहोत. जागेश्वर हे थोडे बाजूला आहे; पण आपण ज्या रस्त्याने जाणार आहोत तो अल्मोड्याहून सरळ आस्कोटला जातो. आस्कोटहून धारचुलाला जावे लागते. धारचुलाहून तवाघाटला जावे लागते. तेथून चालत प्रवास सुरू होतो. पुढे गाला, बुध्दी, मालपा अशा छोट्या छोट्या वस्त्या आहेत. पुढे कालापानी नावाची एक जागा आहे. येथे काली नदीचा उगम होतो. कालापानीच्या नंतर नबीडांग नावाची एक छोटीशी वस्ती आहे. भारतातील हे शेवटचे गाव. या नबीडांग जवळच ॐ पर्वत आहे. या पर्वतावर जेव्हा बर्फ पडतो तेव्हा नैसर्गिकरीत्या आपोआप ॐ चा आकार तयार होतो. हा ॐ चा आकार अत्यंत सुंदर दिसतो. म्हणून याला ॐ पर्वत असे म्हणतात. या परिसरामध्ये अनेक सिध्द व ऋषी आजही गुप्तपणे तपस्या करत आहेत.

एखाद्या भाग्यवान सद्भक्ताला त्यांचे दर्शनही होते.

कालापानी येथे काली नदीचा उगम होतो व ॐ पर्वताच्या पुढे गौरीकुंड येथून गौरी नदी उगम पावते. या दोन्ही नद्या खाली आल्यानंतर या नद्यांना काली गंगा व गोरी गंगा असे म्हटले जाते. आस्कोटच्या जवळ या दोन्ही नद्यांचा संगम आहे. काली नदीच्या एका किनाऱ्यावर भारत आहे, तर दुसऱ्या किनाऱ्यावर नेपाळ आहे. गोरी नदीच्या एका किनाऱ्यावर भारत आहे, तर दुसऱ्या किनाऱ्यावर तिबेट आहे. गोरी नदी ओलांडल्यानंतर लिपूलेक नावाचे गाव आहे. हे गाव तिबेटमध्ये आहे. लिपूलेकनंतर तकलाकोट नावाचे एक गाव येते. तेथे बाराही महिने अधून-मधून हिमवर्षाव होत असतो. यानंतर पुढे राक्षसताल नावाचा एक खूप मोठा तलाव आहे. या तलावाच्या किनारी बसून रावणाने तपश्चर्या केल्याने याला राक्षसताल असे म्हणतात. येथून जवळच मांधाता पर्वत आहे. ईश्वाकू वंशाचा मूळपुरुष मांधाता याने येथे तपश्चर्या केल्याने या पर्वताला मांधाता पर्वत असे म्हणतात. येथून जवळच वृषभ पर्वत आहे. वृषभ नावाच्या महायोग्याने या पर्वतावर तपस्या केल्याने याला वृषभ पर्वत असे म्हणतात. याला ऋषी पर्वत असे दुसरे नावही आहे. अनेक ऋषी या पर्वताच्या परिसरात आजही तपस्या करत आहेत, असे म्हटले जाते. याच्यापुढे येते मानस सरोवर. आजकाल याला मान सरोवर असे म्हणतात; परंतु याचे प्राचीन नाव मानस सरोवर असे आहे. येथील निसर्ग

पराकोटीचा सुंदर आहे. त्याचे वर्णन शब्दाने करता येणार नाही. सर्वत्र बर्फच बर्फ असतो. हंस पक्ष्यांचे थवेच्या थवे येथे विहार करताना दिसतात. या मानस सरोवराच्या किनारी आहे भव्य, दिव्य, अलौकिक, महान कैलास पर्वत!

या कैलास पर्वताला व मानस सरोवराला हिंदू लोक प्रदक्षिणा करतात, तर बुद्ध लोक साष्टांग दंडवत करत प्रदक्षिणा करतात. हा सर्व परिसर अतिशय दिव्य व भव्य आहे.

कैलास पर्वत व मानस सरोवर यांचे वर्णन मंत्रमुग्ध होऊन मी ऐकत होते. रात्रीचे दोन वाजले होते. नंतर झोपले. स्वप्नामध्ये कैलास पर्वताचे दिव्य दर्शन घडले. सकाळी उठून पाहते, तर संपूर्ण बर्फाने आच्छादलेली हिमशिखरे सोनेरी किरणांनी न्हालेली होती.

# १७. पिठोरागड

**कौ**सानीहून आम्ही प्रवासास सुरुवात केली. प्रथम कटारमल येथे गेलो. येथे एक प्राचीन सूर्यमंदिर आहे. या सूर्यमंदिराचे दर्शन घेतले व तेथून अल्मोड्याला गेलो. अल्मोड्याहून सुमारे ४५ किलोमीटर दूर असणाऱ्या जागेश्वर येथे गेलो. जागेश्वर हे स्थान सुमारे दीड हजार वर्षे जुने असून, हिमालयाच्या अंतर्भागात आहे. येथे थोडाफार बर्फ पडलेला होता. बर्फावरून अनवाणी पायाने चालत जात आम्ही जागेश्वराच्या मंदिरात गेलो. सुमारे तासभर तेथे पूजाअर्चा करून अरण्यातून मेन रोडवर परत येताना वाटेत दंडेश्वर महादेवाचे दर्शन घेतले व पिठोरागडच्या दिशेने प्रयाण केले.

पिठोरागडला पोहोचेपर्यंत रात्र झाली होती. पिठोरागड हे स्थान कैलास व मानस सरोवरच्या वाटेवर असल्या- कारणाने कैलास व मानस सरोवरला जाणारे यात्रिक येथे थांबतात. पिठोरागड, धारचुला, तवाघाट या मार्गाने नारायण आश्रमापर्यंत आपल्याला जाता येते. याच रस्त्याने कैलास व मानस सरोवरचे यात्रेकरू जातात. नारायण आश्रमाच्या पुढे पायी प्रवास सुरू होतो. नंतर तिबेटच्या हद्दीत प्रवेश करावा लागतो. चीनने व्हीसा दिल्याशिवाय त्या परिसरात जाता येत नाही. अर्थात् आम्हाला तिकडे जायचेही नाही. दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही पिठोरागडमधील प्रसिद्ध गुहा पाताळ भुवनेश्वर ही पाहिली व तेथून डीडीहाटला गेलो. डीडीहाट येथे छोटीशी गुहा पाहून सिरकटा देवीचे दर्शन घेऊन आम्ही आस्कोट अभयारण्यात गेलो. आस्कोट अभयारण्यात असंख्य हरणे, सांबर, कस्तुरीमृग व बारासिंगा; तसेच जंगली हत्तीही आहेत. येथे काली नदी नावाची नदी असून, या नदीच्या पलीकडे नेपाळ देश आहे. आस्कोटला ऐंशी मंदिरे असल्याने या गावाचे नाव आस्कोट पडले आहे.

**७६. दुर्गा : ध्यानामध्ये दृश्ये दिसणे, देव-देवतांची अथवा ऋषींची दर्शने होणे, ध्यानामध्ये ग्रहगोलावर फिरून येणे यालाच ब्रह्म साक्षात्कार असे म्हणतात का ?**

**श्रीदत्त :** ध्यानामध्ये दृश्ये दिसणे, देव देवतांची दर्शने

होणे, ध्यानामध्ये ग्रह गोलावर फिरून येणे या सर्व गोष्टी ब्रह्म साक्षात्कार मार्गातील अनुभव आहेत परंतु ब्रह्म साक्षात्कार म्हणजे 'मी कोण आहे !' हे समजणे, म्हणजे आत्मानुभव येणे. आत्मानुभव आल्यानंतर परमात्मा व आपण वेगळे नाही याचा अनुभव येतो. परमात्म्याशी म्हणजेच परब्रह्माशी तादात्म्यता होते. यालाच ब्रह्मसाक्षात्कार असे म्हणतात. अद्वैत असे म्हणतात. सिद्धावस्था असे म्हणतात.

**७७. दुर्गा : तीन आकाश म्हणजे काय ?**

**श्रीदत्त :** भूताकाश, चित्ताकाश व चिदाकाश यांना तीन आकाश असे म्हणतात.

मिटलेल्या डोळ्यांसमोर जो अंधार दिसतो त्या अंध:काराला भूताकाश असे म्हणतात.

ध्यानामध्ये जेव्हा देव-देवता दिसू लागतात तेव्हा त्याला चित्ताकाश असे म्हणतात.

ईश्वर साक्षात्कार, आत्मसाक्षात्कार, परब्रह्माचा अनुभव या गोष्टी चिदाकाशात प्राप्त होतात.

**७८. दुर्गा : सद्गुण कसे निर्माण होतील ?**

**श्रीदत्त :** कोणतेही काम देवाची पूजा समजून करावे. प्रामाणिकपणे वागावे. आपण जे काही करतो याकडे ईश्वराचे

लक्ष आहे याची जाणीव ठेवावी. शांती, प्रेम, आनंद आणि समाधान आपल्या वर्तनात सदैव दिसून यावे. इतरांना जास्तीत जास्त आनंद देण्याचा प्रयत्न करावा. कोणी त्रास दिला तर सहन करावा. अशा वागण्याने हळूहळू सद्‌गुणांची वाढ होते व आपला सर्वत्र विजय होतो. आपण ईश्वराला प्रिय होतो.

**नम्र झाला सर्वांभूतां ।**
**तेणे कोंडिले अनंता ॥**

**Work is worship**

**God is love**

# १८. देवीधुरा

**आ**स्कोटहून सकाळी आम्ही निघालो. बरेच अंतर आम्हाला कापायचे होते. वाटेत घाट या ठिकाणी पन्नार नदीच्या किनारी शंकराचे एक मंदिर आहे. येथे आम्ही थोडा वेळ थांबलो. या शंकराच्या मंदिराला रामेश्वर असे म्हणतात व तेथून देव पर्वत नावाच्या जागी आलो. स्थानिक लोक या पर्वताला देव पर्वत असे म्हणतात, कारण या पर्वतावर साक्षात् देवाचे वास्तव्य आहे, अशी त्यांची श्रद्धा आहे. येथे थोडा वेळ ध्यान करून आम्ही लोहाघाटजवळील मायावती आश्रम पाहिला व तेथून देवीधुराला आलो.

देवीधुरा येथे वाराही देवीचे मंदिर असून, या देवीला फार पूर्वी नरबळी दिला जात असे. नरबळी देण्याची ही प्रथा महाभारत काळापासून सुरू होती असे म्हणतात. कालांतराने

देवीच्याच आज्ञेने ही प्रथा बंद केली गेली. त्याऐवजी राखी पौर्णिमेच्या दिवशी आसपासच्या गावातील सर्व ग्रामस्थ एकत्र येतात व पाषाण युद्ध खेळतात.

पाषाण युद्ध म्हणजे ग्रामस्थ दोन गट करतात व हे दोन गट एकमेकांच्या अंगावर दगड फेकून मारतात. लोकांना जखमा होतात. या जखमांचे जे रक्त जमिनीवर सांडते त्याने देवी तृप्त होते, असा गावकऱ्यांचा समज आहे. येथील वाराही देवी अतिशय जागृत आहे, असे मानले जाते.

लोहाघाट येथून जवळच पूर्णगिरी नावाचे एक सिद्धपीठ असून, हे सिद्धपीठ डोंगरावर आहे. पायथ्याशी शारदा नदी वाहते. या पर्वतावर किंवा पर्वताच्या आसपास भाग्यवंतांना रात्रीच्या वेळी ज्योति दिसतात. शारदा नदीच्या एका तीरावर भारत आहे, तर दुसऱ्या तीरावर नेपाळ आहे. पूर्णगिरी देवीच्या दर्शनासाठी १३ किलोमीटर चालावे लागत असल्याने आम्ही तिकडे गेलो नाही.

**७९. दुर्गा : मृत्यूनंतर मानवाला कोणतेही रूप प्राप्त होते?**

**श्रीदत्त :** मृत्यूनंतर मानवाला कोणते रूप प्राप्त व्हायचे हे त्याच्या कर्मावर अवलंबून आहे. समजा एखाद्या माणसाने आयुष्यभर खूप पुण्य केले, ईश्वरभक्ती केली, परोपकार - दान केले, देवतांच्या स्तोत्रांचे लाखो पाठ केले आणि असा

मनुष्य वयाच्या ९७-९८ व्या वर्षी मृत्यू पावला, तर त्याच्या शरीरातून तीस वर्षांचा दिव्यदेहधारी पुरुष बाहेर येईल व तो दिव्य लोकात निघून जाईल. ईश्वराचे दूत त्याचे स्वागत करतील.

समाजा एखादा मनुष्य वर वर्णन केलेल्या सर्व गोष्टी, पुण्यकर्म, सत्कर्मे करून अधिक गुरुसेवा व योगसाधना केलेली असेल, तर त्याच्या देहातून अत्यंत तेजस्वी असा वीस वर्षांचा युवक बाहेर पडेल व दिव्य लोकात निघून जाईल.

वाईट कर्मे करणारा एखादा तीस वर्षांचा तरुण जरी मेला, तरी त्याच्या देहातून शंभर वर्षांचा म्हातारा बाहेर येईल. हजारो पिशाच्चे त्याला तात्काळ छळू लागतील. अदृश्य सृष्टीतील अनेक प्राणी त्याच्यावर हल्ला करू लागतील. भयंकर अंध:कारमय अशा यातना लोकात तो खेचला जाईल व त्याच्या यातनांना अनेक वर्षे अंत नसेल.

याहूनही अधिक वाईट कर्म करणारे जे लोक असतात, आतंकवादासारखी भीषण कृत्ये जे लोक करतात त्यांना तात्काळ रेड्यासारखे रूप प्राप्त होते. मन माणसाचे असते. शरीर रेड्याचे असते. अदृश्य सृष्टीतील वाघ-सिंहासारखे प्राणी त्याच्यावर हल्ला करू लागतात. येथे रेडा हे फक्त उदाहरण म्हणून घेतले आहे. वाईट कर्मे जशी असतील त्याप्रमाणे प्राण्याला देह प्राप्त होतो. अनेक वर्षे यातना

भोगल्यानंतर ज्या प्राण्याचे रूप अदृश्य सृष्टीमध्ये प्राप्त झाले त्या प्राण्याच्या रूपाने पृथ्वीतलावर जन्म मिळतो.

**८०. दुर्गा : सूक्ष्म शरीर कसे असते ?**

**श्रीदत्त :** जेवढा माणसाचा देह असतो तेवढेच सूक्ष्म शरीर असते. पुण्यवान माणसाचे सूक्ष्म शरीर तेजस्वी असते, तर वाईट कर्मे करणाऱ्या माणसाचे सूक्ष्म शरीर काळे असते. या सूक्ष्म शरीरामध्ये पंचज्ञानेंद्रिये, पंचकर्मेंद्रिये, पंचतन्मात्रा व मन, बुद्धी, अहंकार हे असतात. तन्मात्रा म्हणजे शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध यांचा अनुभव घेण्याची शक्ती. या सूक्ष्म शरीरालाच जिवात्मा असे म्हटले जाते. हे सूक्ष्म शरीर विचारावर जगते.

**८१. दुर्गा : कारण देह कसा असतो ?**

**श्रीदत्त :** कारण देह हा अंगठ्याएवढा असतो. या कारण देहामध्ये असंख्य जन्मांमध्ये जी काही चांगली-वाईट कर्मे केलेली असतात त्यांचे रेकॉर्ड असते. हा कल्पनेवर जगतो. तो विविध प्रकारच्या कल्पना करत असतो. सूक्ष्म देह व स्थूल देहाच्या आधाराने कल्पना प्रत्यक्षात आणत असतो. कारण देह जेव्हा कल्पना करणे सोडून देतो तेव्हा मन ईश्वरात विलीन होऊ लागते.

**८२. दुर्गा : महाकारण देह कसा असतो ?**

**श्रीदत्त :** महाकारण देह छोट्याशा नीलबिंदूसारखा दिसतो, ईश्वरस्वरूप असतो, अतिशय शुद्ध व पवित्र असतो. कुठल्याही कारणाने अशुद्ध होत नाही. आपली जाणीव महाकारण देहाशी एकरूप झाली, की आपण जीवनमुक्त होतो. एखाद्या माळेमध्ये असंख्य मणी ओवलेले असतात. एखाद्या दोरीवर असंख्य कपडे हँगरला टांगलेले असतात. त्याप्रमाणे अब्जावधी महाकारण देह ईश्वरामध्ये गुंफलेले असतात. निरनिराळ्या रंगांची फुले एका हारामध्ये जशी गुंफलेली असतात, तसे असंख्य महाकारण देह ईश्वरात गुंफलेले असतात. ते कधीही ईश्वरापासून वेगळे होत नाहीत.

**८३. दुर्गा : सामूहिक प्रारब्ध कसे असते?**

**श्रीदत्त :** समजा एका घरामध्ये दहा माणसे आहेत. घरात एक कर्ता पुरुष आहे. तो दर महिन्याला पंचवीस हजार रुपये मिळवीत आहे. त्यामुळे घरातील सर्व जण मजेत खात-पीत आहेत, आनंदात आहेत. अचानक त्या माणसाची नोकरी गेली, तर पुढील काही दिवसांत त्या दहाही माणसांवर उपाशी राहण्याची पाळी येते. याला Collective fate किंवा सामूहिक प्रारब्ध म्हणतात. हे ज्याप्रमाणे एका घराचे वर्णन केले त्याप्रमाणे एका राष्ट्राचे, एका देशाचेही वर्णन करता येते. कलेक्टिव्ह फेटचा योग्य वेळीच विचार करून जर निर्णय घेतले नाहीत, तर त्याचे

दुष्परिणाम भोगावे लागतात.

**८४. दुर्गा : गुरु करणे योग्य आहे का ?**

**श्रीदत्त :** माझे स्पष्ट मत आहे, की कोणालाही गुरु करू नये (मलासुद्धा). त्याऐवजी दत्तात्रेयाच्या स्तोत्राचे व देवीसूक्ताचे दररोज ५०-५० पाठ करावेत. या उपासनेने आपोआप मार्ग मिळत जातो व वेळोवेळी मार्गदर्शनही होत राहते.

**८५. दुर्गा : काही लोक नास्तिक का असतात?**

**श्रीदत्त :** कोणीही मनुष्य नास्तिक नसतो. धर्माच्या नावाखाली लोक देवांच्या मूर्ती बनवितात व या मूर्तीच्या आधाराने स्वार्थाची दुकानदारी व चुकीच्या रुढी व प्रथांचा बाजार मांडतात. या गोष्टींना जे लोक विरोध करतात त्यांना नास्तिक म्हटले जाते; पण जेव्हा मनुष्य वृद्धापकाळाचा व मृत्यूनंतरच्या अस्तित्वाचा विचार करतो तेव्हा तो नेहमी आस्तिकच असतो व नास्तिक असला, तरी आस्तिक बनतो.

**८६. दुर्गा : योग:श्चित्तवृत्ती निरोध म्हणजे काय?**

**श्रीदत्त :** पातंजल योगदर्शनमधील हे सूत्र आहे. याचा सरळ सरळ अर्थ असा, की चित्तवृत्तीचा निरोध करणे, म्हणजे योग व सूक्ष्म अर्थ असा की, जर तुम्हाला ईश्वराशी

एकरूप व्हायचे असेल, तुमच्या मूळ स्वरूपाशी तुम्हाला एकरूप व्हायचे असेल, तर तुमच्या अंत:करणात उठणाऱ्या प्रत्येक वृत्तीवर तुम्हाला विजय मिळवावा लागेल, मनात उठणाऱ्या विचारांवर व कल्पनांवर तुम्हाला विजय मिळवावा लागेल.

**८७. दुर्गा : ध्यान कसे करावे ?**

**श्रीदत्त :** पूर्वेकडे तोंड करून ताठ बसावे. शरीर स्थिर करण्याचा प्रयत्न करावा. शरीर स्थिर झाले म्हणजे मन आपोआप स्थिर होऊ लागते. आपल्या आवडत्या देवतेचा जप मनातल्या मनात करत राहावा. श्वासावर लक्ष केंद्रित करावे. वर्षभर अशी साधना केल्यानंतर आपल्या आवडत्या देवाचे रूप डोळ्यांसमोर आणण्याचा प्रयत्न करावा. याला सगुण ध्यान म्हणतात.

निर्गुण ध्यानामध्ये वरीलप्रमाणे सर्व तयारी करावी व मन:चक्षूने आकाश, ज्योति पाहण्याचा प्रयत्न करावा. याला निर्गुण ध्यान म्हणतात.

आत्मध्यानामध्ये स्वत:च्या श्वासावर लक्ष केंद्रित करावे व श्वासाने ब्रह्मरंध्राला धक्के द्यावेत. म्हणजे 'उलट पवन ठोकर मारे खोले दरवाजा' याचा अनुभव येतो, प्रकाशमय परब्रह्माचा अनुभव येतो, आत्मसाक्षात्काराचा अनुभव येतो. आत्मज्ञान होते, ब्रह्मज्ञान होते, प्रकाशब्रह्माचा साक्षात्कार होतो. पुढील

साधना कशा कराव्यात याचे मार्गदर्शन दिव्यलोकातून प्राप्त होते. ही साधना करताना ब्रह्मरंध्रावरही लक्ष केंद्रित करावे, म्हणजे फळ लवकर प्राप्त होते.

**८८. दुर्गा : मृतात्म्यांशी संपर्क साधणे चांगली गोष्ट आहे का ?**

**श्रीदत्त :** साधना करताना एक अशी अवस्था येते, की साधकाचा वातावरणातील विविध स्तरांवर राहणाऱ्या आत्म्यांशी संबंध येतो व त्यांचे सुख-दु:ख जाणून घेता येते. कालांतराने विविध स्तरांवरील देवतांशी साधकाचा संबंध येतो. या देव-देवतांकडून मार्गदर्शनही मिळते. या सर्व गोष्टी जरी साधकांच्या बाबतीत खऱ्या असल्या, तरी सामान्य माणसाने मृतात्म्यांशी संपर्क करण्याचा मूर्खपणा कधीही करू नये. त्याची काही विशिष्ट तंत्रे असतात, काही विशिष्ट पद्धती असतात. यात कोठेही चूक झाल्यास अनेक पिशाच्चे व्यक्तीच्या मनाचा व घराचा ताबा घेतात व संपूर्ण घराण्याची सुखशांती नष्ट होते.

**८९. दुर्गा : श्राद्ध करावे की करू नये ?**

**श्रीदत्त :** आपल्या मृत प्रियजनांच्या नावाने आपण श्रद्धेने जे काही अन्नदान करतो त्याला श्राद्ध म्हणतात. श्राद्ध अवश्य करावे. ज्यामुळे पूर्वजांना आनंद मिळतो, त्यांची तृप्ती होते व त्यांचे आशीर्वाद प्राप्त होतात. इतकेच नव्हे तर पूर्वजांच्या

नावाने अधून-मधून अन्नदान करत राहावे. अन्नदान करणे शक्य नसेल, तर पक्वान्नांचे जेवण करून एखाद्या पत्रावळीवर सर्व पदार्थ ठेवून ती पत्रावळ अग्नीला अर्पण करून त्यावर तुपाची धार सोडावी. केळीच्या पानावर अन्नपदार्थ वाढून गाईला खाऊ घालावेत. थोडे अन्नपदार्थ भटक्या कुत्र्याला खाऊ घालावेत व थोडे अन्नपदार्थ कावळ्याला खाऊ घालावेत. हे शरीर सोडून एक दिवस आपल्यालाही जायचे आहे याचे भान असावे.

**९०. दुर्गा : मृत्यूनंतर एखादा ब्रह्मलोकात गेला हे कसे समजावे ?**

**श्रीदत्त :** फक्त योगी लोकांचा आत्मा ब्रह्मलोकात जातो. ते समजण्याची खूण म्हणून कवटीला बारीकसे भोक पडते किंवा तडा जातो व तेथून आत्मा बाहेर पडतो व ब्रह्मलोकात निघून जातो.

**९१. दुर्गा : पुरुषाला स्त्रीचा व स्त्रीला पुरुषाचा जन्म मिळतो का ?**

**श्रीदत्त :** कर्मानुसार स्त्रीला पुरुषाचा व पुरुषाला स्त्रीचा जन्म प्राप्त होतो. पुष्कळ वेळा आध्यात्मात प्रगती व्हावी म्हणून पुरुषाला स्त्रीचा जन्म दिला जातो. स्त्री देहामध्ये आध्यात्म मार्गामध्ये प्रगती वेगाने होते.

**९२. दुर्गा : मनुष्य जन्मानंतर प्राणी, पशू, पक्षी, वृक्ष अशा रूपाने जन्म प्राप्त होऊ शकतात का ?**

**श्रीदत्त :** वाईट कर्माचे फळ म्हणून किंवा शिक्षा म्हणून एखाद्या आत्म्याला तिर्यक योनी प्राप्त होते म्हणजे प्राणी, पशू, वृक्ष यांच्या रूपाने जन्म घ्यावा लागतो; परंतु असे फार क्वचितच घडते. बऱ्याच आत्म्यांना पिशाच्च लोकात अथवा अंध:कारमय लोकात पाठवले जाते व हजारो वर्षे यातना दिल्या जातात. पशूचा अथवा वृक्षाचा जन्म द्या; पण या यातना नकोत अशा प्रार्थना जेव्हा आत्मा करतो तेव्हा त्याला तिर्यक योनीमध्ये पाठविले जाते.

**९३. दुर्गा : स्वर्गस्थ आत्म्यांना वस्त्रे कोठून मिळतात?**

**श्रीदत्त :** अदृश्य सृष्टीमध्ये एक अशी व्यवस्था आहे, की तेथे मागणी करताच पुरवठा होतो. अमूक एक वस्तू हवी असे मनात म्हणताच तात्काळ ती वस्तू निर्माण होते व आपल्याला प्राप्त होते. अशा प्रकारे स्वर्ग लोकातील आत्मे स्वत:साठी घरे निर्माण करतात, बगीचे निर्माण करतात व किंबहुना असे म्हणायला हवे, की स्वर्ग लोकामध्ये प्रथम वस्तू निर्माण होतात व नंतर त्या पृथ्वीतलावर येतात.

**९४. दुर्गा : अंत्यविधीचे अनेक प्रकार आहेत, त्यांतील सर्वांत चांगला प्रकार कोणता?**

**श्रीदत्त :** प्रेत जाळणे हा सर्वांत चांगला प्रकार. प्रेत जाळल्यानंतर ज्या काही अस्थी शिल्लक राहतात, त्या अस्थीसुद्धा वाहत्या पाण्यामध्ये किंवा समुद्रामध्ये विसर्जन करून टाकल्या पाहिजेत. याचे मुख्य कारण म्हणजे माणसाच्या हाडाचा एक जरी तुकडा तांत्रिक-मांत्रिकाच्या हाताला लागला, तर ते त्या आत्म्याला आपला गुलाम बनवू शकतात. प्राचीन हिंदू ऋषी- मुनींना ही गोष्ट माहिती असल्याकारणाने त्यांनी हिंदू धर्मामध्ये दहनाची प्रथा पाडली.

**९५. दुर्गा : अर्धमानव शक्ती असतात का ?**

**श्रीदत्त :** अदृश्य सृष्टीमध्ये अर्धमानव शक्ती असतात. या अर्धमानव शक्ती मानवी जीवनावर खूप परिणाम करत असतात. प्रत्येक शक्तीमध्ये वेगवेगळे अधिकार असतात. आपआपल्या क्षेत्रामध्ये त्या अधिकार गाजवीत असतात.

**९६. दुर्गा : आध्यात्मिकता म्हणजे काय ?**

**श्रीदत्त :** खरी आध्यात्मिकता म्हणजे स्वत:मध्ये सत्प्रवृत्तींची वाढ करणे व ईश्वराच्या निर्गुण-निराकार स्वरूपाचे किंवा आत्मस्वरूपाचे ध्यान करणे. अंत:करणाची उदारता, विशालता जसजशी वाढत जाते, तसतशा देव-

देवता अंगी प्रगट होऊ लागतात. देव-देवतांना आनंद होईल, अशा प्रकारे वागावे म्हणजे देवतांची कृपा होते.

**९७. दुर्गा : वास्तुशास्त्र मानावे का ?**

**श्रीदत्त :** वास्तुशास्त्र जरूर मानावे; परंतु वास्तुशास्त्रामुळे संपूर्ण जीवन बदलून जाईल, असे समजू नये. जीवन सुखी होण्याला वास्तुशास्त्राची मदत होते. पण त्याचबरोबर पुण्याईपण करावी लागते.

माझ्या माहितीतील एक मनुष्य मुहूर्त पाहून, राहूकाळ केतूकाळ पाहून घरातून बाहेर पडत असे व तरीही त्याला वर्षातून आठ-नऊ वेळा अपघात होत असे. तो पुण्यकर्म मात्र मुळीच करत नसे.

**९८. दुर्गा : नादयोग म्हणजे काय व नादसाधना कशी करतात?**

**श्रीदत्त :** ताठ बसावे व श्वासोच्छ्वासावर लक्ष ठेवावे. हे लक्ष ठेवल्यानंतर जो नाद ऐकू येतो त्या नादाची साधना करणे म्हणजे नादयोग! ही साधना सोपी वाटत असली, तरी साधकाच्या योग्यतेनुसार या साधनेचे अनुभव येतात. जसजसे साधनेत मन एकाग्र होऊ लागेल तसतसे विविध प्रकारचे नाद ऐकू येऊ लागतात. कधी कधी कोकिळेचाही आवाज ऐकू येतो, तर कधी सिंहाचा आवाज ऐकू येतो.

साधकाच्या प्रकृतीनुसार विविध प्रकारचे आवाज ऐकू येतात. शेवटी साधकाच्या मनाचा लय होतो.

**९९. दुर्गा : खेचरी मुद्रा म्हणजे काय ?**

**श्रीदत्त :** खेचरी मुद्रा तीन प्रकारांनी करता येते.

१) जीभ उलटी मागे वळवून पडजिभेच्या जवळ जे विवर असते त्या विवरामध्ये घुसविणे. या प्रकाराने मनाची एकाग्रता वाढते, आरोग्य सुधारते, आध्यात्मात प्रगती होते.

२) दोन्ही डोळे वर करून भ्रूमध्याच्या ठिकाणी पाहणे यालाही खेचरी मुद्रा म्हणतात. या खेचरी मुद्रेने तृतीय नेत्र जागृत होतो व सिद्धपुरुषांची दर्शने होतात. सूक्ष्मदेहाने ब्रह्मांडात कोठेही फिरण्याची कला प्राप्त होते.

३) मनाने सहस्रारचक्राकडे पाहणे (fontanel) यालाही खेचरी मुद्रा असे म्हणतात. ही खेचरी मुद्रा केल्याने आध्यात्मिक प्रगती वेगाने होते.

**१००. दुर्गा : शांभवी मुद्रा कशी करतात ?**

**श्रीदत्त :** जीवनातील सर्व व्यवहार करत असताना मनावर सतत लक्ष ठेवणे म्हणजे शांभवी मुद्रा. थोडक्यात, मनावर सतत लक्ष ठेवणे व मनात कुठलाही विचार अथवा कल्पना उठू न देणे याला शांभवी मुद्रा म्हणतात. जीवनातील

सर्व व्यवहार चालू असताना म्हणजे बोलताना, खाताना, चालताना अगदी भांडतानासुद्धा लक्ष मनावर ठेवणे व मनात विचार अथवा कल्पना येऊ न देणे याला शांभवी मुद्रा असे म्हणतात.

शांभवी मुद्रा सिद्ध झाली असता साधक ईश्वरस्वरूप होतो. या मुद्रेचे आचरण करणे कठीण आहे. प्रथम सतत श्वासावर लक्ष ठेवावे लागते. अनेक वर्षे असा अभ्यास केल्यानंतर शांभवी मुद्रा धारण करण्याची क्षमता साधकामध्ये येते.

**१०१. दुर्गा : काही लोक उकळत्या तेलात हात घालून वडे, सामोसे काढतात, तर काही लोक अग्नीतही बसतात, त्यांचा केसही जळत नाही, इतर लोक त्याच अग्नीवर सिगारेट पेटवतात किंवा चहा करतात हे कसे शक्य होते?**

**श्रीदत्त :** या अतिशय क्षूद्र विद्या आहेत. या विद्या साध्य करण्यासाठी भक्ती, ज्ञान, आध्यात्मिकता, ध्यान, जप इत्यादी कशाचीही गरज पडत नाही. अगदी दोन मिनिटे सुद्धा जप करावा लागत नाही. इतक्या या विद्या सहज साध्य असतात. पुस्तकांमध्ये किंवा जाहीररित्या अशी रहस्ये प्रकट करणे योग्य नसते. दैवी शासन (Divine administration) नियमांचा भंग केल्याचा गुन्हा होऊ शकतो, म्हणून या विद्या कशा मिळवतात, हे मी उघडपणे सांगू शकत नाही. फक्त

थोडक्यात सांगतो ते लिहून घ्या !

लाकडांची रास रचून त्यावर साधू (जादूगार) बसतो व त्या लाकडांच्या ढिगाला चक्क रॉकेल ओतून आग लावतो. सर्व लाकडे धडाधडा पेटू लागतात. साधू त्यावर आरामात बसलेला असतो. तो अग्नी खरा आहे. हे दाखविण्यासाठी आजूबाजूची माणसे त्यावर सिगारेट पेटवतात. कोणी त्यातील लाकडे घेऊन चहा करतो, तर कोणी स्वत:च्या हातातील टॉवेल त्या अग्नीवर धरतो तेव्हा तो टॉवेल लगेच पेट घेतो. कोणी वर्तमानपत्राचा कागद अग्नीवर धरतो, तर तो कागद पेटतो. तो अग्नी खरा आहे याची पारख अनेक प्रकारे लोक करतात व असे जाहीर केले जाते, की ही नजरबंदी नसून हा अग्नी खरा आहे व अग्नीत बसलेले साधू हे खूप मोठे सिद्धपुरुष असल्याकारणाने त्यांना अग्नी जाळू शकत नाही. अशा साधूची वर्तमानपत्रामधून, टी. व्ही. चॅनल्समधून खूप प्रसिद्धी होते. काही साधू आणखी एक वेगळा प्रयोग करून दाखवितात. टॉवेलला पीळ मारून त्याची गोलाकार रिंग बनवतात. ही रिंग रॉकेलमध्ये भिजवून डोक्यावर ठेवतात. त्या साधूचा सेवक या रिंगला आग लावतो. डोक्यावर ठेवलेली कापडाची रिंग (चिंबूळ) पेटते. साधूचा सेवक त्यावर पाण्याने भरलेले पातले ठेवतो. त्यात साखर टाकतो, पाण्याला उकळी येताच त्यात चहापावडर टाकतो. चहाचे पातेले खाली उतरवतो. त्यात दूध टाकून सर्वांना हा चहा देतो. साधूच्या डोक्यावरची रिंग (चिंबूळ) काढून त्यावर पाणी ओतून ती विझवून

टाकतो. साधूच्या डोक्याचा केससुद्धा जळत नाही.

उकळत्या तेलात हात घालून बटाटे वडे, सामोसे, काढण्याऱ्या लोकांविषयी तुम्ही ऐकले आहेच.

हे चमत्कार कसे करतात, असा तुमचा प्रश्न आहे. या प्रश्नाचे उत्तर मी असे सांगेन, की ही नजरबंदी नसते; परंतु ही क्षूद्र विद्या आहे. ही विद्या फक्त तीन दिवसांत मिळविता येते. यासाठी जप करण्याची आवश्यकता नाही.

लोकांना मोठा चमत्कार दिसतो इतकेच. आध्यात्मिक प्रगती, आत्म्याचा विकास, ईश्वरी कृपा या दृष्टीने याचा काहीही उपयोग नाही.

प्रश्नाचे उत्तर देऊन श्रीस्वामीजी ध्यानाला निघून गेले. ते प्रश्नाचे उत्तर देत असताना मला एक गोष्ट आठवली ती पुढे देत आहे.

शिरीष मसुरकर नावाचा श्रीस्वामीजींचा एक भक्त एकदा एका साधूच्या दर्शनाला गेला. त्या साधूने त्याला विचारले, 'स्वामीजी कोठे आहेत ?'

ते कोठेतरी एकांतवासामध्ये साधना करण्यासाठी गेले आहेत. शिरीषने उत्तर दिले. त्यावर त्या साधूने म्हटले, की तुला त्यांना पाहायचे आहे का ? पाहा ! असे म्हणून त्या साधूने स्वत:च्या तळहातांमध्ये शिरीषला पाहायला सांगितले.

शिरीषला तळहातामध्ये टी. व्ही.प्रमाणे दृश्य दिसू लागले.

एक खळखळ वाहणारी नदी दिसली. नदीच्या किनाऱ्यावर एक गुहा दिसली. गुहेमध्ये श्रीस्वामी दत्तावधूत ध्यान करत बसलेले दिसले. हा सर्व चमत्कार पाहून शिरीष मसुरकरला अतिशय आनंद झाला. त्याने अनेकांना या दृश्याविषयी सांगितले. मलाही सांगितले; परंतु आजता-गायत मी कोणालाही याचे खरे रहस्य सांगितले नव्हते. कारण अशी रहस्ये फोडायची नसतात; परंतु वाचकांच्या माहितीसाठी म्हणून मी आज हे लिहीत आहे.

'त्या साधूने हिप्नॉटिझमच्या आधाराने शिरीष मसुरकरला ते दृश्य दिसेल अशी व्यवस्था केली होती. प्रत्यक्षामध्ये त्या वेळेला श्रीस्वामीजी काही भक्तांबरोबर प्रवास करत होते.'

समाजामध्ये जशी चांगली-वाईट माणसे असतात. तसाच प्रकार साधूंमध्ये पण असतो. असंख्य साधू एक क्षणभरसुद्धा ईश्वरभक्ती न करता पिशाच्च सिद्धींच्या आधाराने आयुष्यभर स्वत:ची दुकानदारी चालवत असतात. त्यांच्याकडे येणाऱ्या भक्तांचीच पुण्याई व तेज ते खेचून घेतात व त्या आधाराने त्यांचा महिमा चालत राहतो. प्रकाशाचा मार्ग दाखविणारा किंवा खरा मार्ग दाखविणारा साधू नशिबानेच मिळतो.

ईश्वरानुरागी साधू बहुतकरून एकांतवासातच राहतात. एखाद-दुसरा सत्पुरुष ईश्वराच्या आज्ञेने समाजात राहतो किंवा ईश्वराच्या आज्ञेनेच लिखाण करतो. व्यक्तिश: त्याला जगाशी काही देणे-घेणे नसते.

**१०२. दुर्गा : एकूण किती प्रकारच्या सिद्धी असतात?**

**श्रीदत्त :** कोट्यावधी प्रकारच्या सिद्धी असतात; परंतु खऱ्या साधकाने किंवा ज्याला ईश्वरप्राप्ती, आत्मज्ञान किंवा ब्रह्मज्ञान प्राप्त करायचे आहे त्याने सिद्धींच्या नादाला लागू नये. ती गोष्ट अतिशय वाईट असते. प्रारब्धानुसार जे काही भोग अथवा उपभोग प्राप्त होतील ते निर्लेप मनाने भोगावेत. मनाला कसलाही स्पर्श होऊ देऊ नये. 'मी कोण आहे ?' 'कोठून आलो?' व 'जाणार कोठे?' याचा शोध घेण्यासाठी ईश्वरभक्ती करीत राहावे.

**१०३. दुर्गा : तरीपण वाचकांच्या ज्ञानात भर पडण्यासाठी थोडीफार माहिती द्या.**

**श्रीदत्त :** अनेक प्रकारच्या सिद्धी असतात. भूतसिद्धी, प्रेतसिद्धी, पिशाच्चसिद्धी, अप्सरासिद्धी, यक्षिणीसिद्धी अशा विविध प्रकारच्या सिद्धी असतात. काही सिद्धी तर अशा असतात, की त्या साध्य करण्यासाठी काहीच करावे लागत नाही. साधू अथवा सामान्य मनुष्य एखाद्या स्थानात जातो आणि तेथून एखादे पिशाच्च आपल्याबरोबर घेऊन येतो. ते पिशाच्च त्या साधूला अथवा त्या व्यक्तीला पैसा व प्रसिद्धी मिळवून देते. अशा लोकांकडे जे कोणी जातात, त्यांचे प्रचंड आध्यात्मिक नुकसान होते. भक्त श्रद्धेने जात राहतो व अशी माणसे आपल्याकडे येणाऱ्या सर्वांची पुण्याई खेचून घेतात.

काही स्थाने तर अशी असतात, की त्या स्थानांमध्ये माणसांची व जनावरांची हाडे पुरलेली असतात. लोक श्रद्धेने तेथे नमस्कार करत असतात व स्वत:ची पुण्याई घालवत असतात. हे अतिशय भयानक आहे. याविषयी फार न बोललेले बरे !

**१०४. दुर्गा : या कलियुगामध्ये देवतांची दर्शने होतात का? देव-देवतांची दर्शने होताना काय अनुभव येतात ?**

**श्रीदत्त : हो !** या कलियुगामध्येसुद्धा देव-देवतांची दर्शने होतात, हे अगदी सत्य आहे. सात्त्विक देवतेची साधना करताना प्रथम सुगंध येतो. आपल्या अवतीभवती कोणीतरी हजारो बाटल्या अत्तर ओतलेले आहे, असे वाटते. या सुगंधाने श्वास आत आत खेचला जातो. मनोलय साध्य होऊ लागतो. पुष्कळ वेळा पायातील पैंजणांचा आवाज ऐकू येतो. प्रथम देवीचे चरण दिसतात व हळूहळू पूर्ण देवीचे दर्शन होते. ती आशीर्वाद देते व बोलते.

पुरुष देवतेचे अनुभव थोडे वेगळे असतात. कधी शंख अथवा डमरूचा आवाज ऐकू येतो, तर कधी मारुतीचा भुभु:कार ऐकू येतो. असे वेगवेगळे अनुभव येत असतात. चार तास सकाळी व चार तास संध्याकाळी देवतेच्या नावाचा जप केला असता सहा महिन्यांत अनुभव येऊ लागतात.

१०५. दुर्गा : तेहतीस कोटी देवता व नवदुर्गा म्हणजे काय ?

श्रीदत्त : तेहतीस कोटी देवता म्हणजे तेहतीस प्रकारच्या देवता आहेत. प्राचीन ग्रंथांत तसे लिहिलेले आहे. कोटी या शब्दाचा अर्थ प्रकार; परंतु हेही तितके खरे नसून, अनंत प्रकारच्या देवता आहेत हेच म्हणणे जास्त योग्य ठरते. प्राचीन ग्रंथांतील तेहतीस कोटींचा अर्थ द्वादश आदित्य, (बारा) एकादश रुद्र (अकरा) अष्टवसू (आठ), इंद्र (एक) व प्रजापति (एक) मिळून तेहतीस कोटी देवता असे म्हटले आहे. याचा अर्थ पृथ्वीवर सत्ता गाजवणाऱ्या देवता, अंतरिक्षात (द्यावा) सत्ता गाजवणाऱ्या देवता, सूर्यलोकातील बारा प्रकारच्या देवता व रूद्रलोकातील अकरा प्रकारच्या देवता असा अर्थ होतो. एकूण सारेच प्रकार असंख्य व अनंत आहेत.

**जगी द्वादशादित्य । ते रुद्र अकरा ।**

म्हणजे या जगामध्ये बारा आदित्य व अकरा रूद्र आहेत, असे प्राचीन ग्रंथांमध्ये म्हटलेले आहे; परंतु हे तितकेसे खरे नाही. सूर्य असंख्य आहेत व रुद्रही असंख्य आहेत. नवदुर्गा म्हणजे विश्वामध्ये एकूण नऊ मिती आहेत. आपण तिसऱ्या मितीत राहतो. नऊही मितींचे वर्णन करणे अशक्य आहे पण अगदी थोडक्यात जे सांगता येईल, ते सांगतो.

कागदावरील रेष ही पहिली मिती. याचा अर्थ भू-पिशाच्चे. तसेच एकाच रेषेत प्रवाहित होणारी भूते ही पहिली मिती.

कागद ही दुसरी मिती. याचा अर्थ इकडे तिकडे फिरू शकणारे बंदिस्त भूतात्मे. ही दुसरी मिती.

पृथ्वीवरील जीवन ही तिसरी मिती.

काळ (Time) ही चौथी मिती. यामध्ये सूक्ष्म शरीरे येतात; परलोक जीवन येते.

कालातीत ही पाचवी मिती. यामध्ये देवता येतात.

प्रकाश ही सहावी मिती. यामध्ये स्वर्ग लोकातील प्रकाशविश्वात राहणारे तेजोमय आत्मे येतात.

कल्प ही सातवी मिती. यामध्ये ऋषीलोक येतात.

परमात्मा ही आठवी मिती.

परमेश्वर ही नववी मिती.

या नऊ मितीत एकूण चौदा लोक येतात. चौदा लोक म्हणजे सात स्वर्ग व सात पाताळ.

**१०६. दुर्गा : रुद्र म्हणजे काय ? अष्टवसू म्हणजे काय? आदित्य म्हणजे काय? त्यांचे कार्य कसे चालते ?**

**श्रीदत्त :** रुद्र म्हणजे रडविणे, असा शब्दश: अर्थ ! हे जरी खरे असले, तरी चुकीचे वागल्यानंतर ज्या शक्ती माणसांना त्रास देतात किंवा शिक्षा करतात, त्या शक्तींना रुद्र म्हटले जाते. जगातील आतंकवाद व युद्ध रुद्रशक्तींमुळे होतात; तसेच भूकंप, जलप्रलय, अग्निप्रलय या गोष्टी रुद्र

शक्तीमुळे होतात.

मनुष्य बेताल वागतो व त्यानंतर त्याला त्याचे दुष्परिणाम भोगावे लागतात. रुद्रशक्ती त्याला तडाखे देत असतात; वातावरणात उष्णता प्रचंड वाढते व त्यामुळे जंगलांना आग लागते, हे रुद्रशक्तीमुळे घडते. सर्व प्रकारच्या नैसर्गिक आपत्ती रुद्र शक्तीमुळे येतात.

रुद्रशक्तींच्या हाताखाली काम करणाऱ्या शक्तींना भैरव म्हटले जाते. भैरव आठ प्रकारचे असतात असे म्हटले जाते; पण प्रत्यक्षात भैरवांची संख्या असंख्य आहे. भैरवांना क्षेत्रपाल (Rangers) थोडक्यात एरिया कमांडर असे म्हटले जाते. विशिष्ट प्रकारच्या माणसांच्या मन व बुद्धीवर या भैरवांचे नियंत्रण असते. भैरवांनाच संस्कृतमध्ये अष्टवसू असे म्हटले जाते. हे मानवी समूहांना नियंत्रित करतात. भैरवांच्या हद्दी ठरलेल्या असतात. भैरवाच्या खाली वेताळ नावाच्या अधिपतीचे कार्य चालते. बेताल वागणाऱ्या लोकांच्या मन व बुद्धीवर यांचा प्रभाव असतो. अगदी एका वाक्यात सांगायचे ठरविल्यास स्वार्थी व संकुचित मनाच्या माणसांवर वेताळ शक्तींचा प्रभाव चालतो, तर दानधर्म न करणाऱ्या माणसांची मन-बुद्धी; तसेच क्षूद्र साधना करणाऱ्या माणसांचे मन-बुद्धी भैरव बांधून ठेवतो. अशा प्रकारे अष्टवसू व एकादश रुद्राचे कार्य चालते.

**आदित्य** म्हणजे उदित होणे किंवा उदित झालेला !

अंतरिक्षामध्ये एकूण बारा राशी आहेत. या बारा राशींनाच द्वादश आदित्य असे म्हटले जाते; कारण मूल जेव्हा जन्माला येते तेव्हा कुठली राशी उदित झाली आहे हे पाहिले जाते व त्यानुसार लग्नकुंडली मांडली जाते. बारा राशींच्या चक्रामधून पृथ्वी सतत फिरत राहते. म्हणून द्वादश आदित्य असे म्हटले जाते. ही लग्नकुंडली माणसाच्या संपूर्ण जीवनावर प्रभाव टाकत असते. अशा प्रकारे बारा राशी म्हणजेच द्वादश आदित्य मानवी जीवन प्रभावित करत असतात.

संपूर्ण ब्रह्मांडाला बारा राशींमध्ये विभागलेले आहे. या बारा राशींमध्ये जी नक्षत्रे असतात, जे तारे असतात ते मानवी जीवन, पृथ्वीतलावरील जीवन प्रभावित करत असतात. अशा प्रकारे द्वादश आदित्याचे कार्य चालते.

आकाशातील ग्रह, नक्षत्र, तारे यांची किरणे मानवी जीवनाला प्रभावित करतात हे जगातील प्रत्येकाला माहीत आहे. ही किरणे ज्या संपर्क माध्यमाद्वारे प्रवाहित होतात. (Channeling) त्या प्रवाहाला 'द्यावा' असे म्हटले जाते. द्यावा म्हणजे विद्युतशक्ती! अशा प्रकारे बत्तीस देवतांचे (द्वादश आदित्य, एकादश रुद्र, अष्ट वसू व इंद्र एकूण बत्तीस) वर्णन संपले. तेहतिसावी देवता म्हणजे प्रजापति!

**१०७. दुर्गा : माणसाचे सर्व जीवन हे ग्रह-नक्षत्रे नियंत्रित करतात, तर मग कुलदेवता, कुलस्वामी यांचा**

**मान राखणे, देव-देवतांची उपासना करणे या गोष्टींची आवश्यकता काय ?**

**श्रीदत्त :** या प्रश्नाचे उत्तर देताना श्रीस्वामीजी म्हणाले, तुम्हाला माहीत आहे, की मानवाने उपग्रह (सॅटेलाइट) निर्माण केला आणि या उपग्रहाला अवकाशामध्ये ३६ हजार किलोमीटर उंचीवर प्रस्थापित केले. इतक्या उंचीवरून हा उपग्रह तुमच्या हातातील मोबाईल व तुमच्या घरातील टी. व्ही. यांचे संचालन करतो. एकदा या सत्याला मानल्यानंतर आकाशातील ग्रह, नक्षत्र, तारे मानवी जीवन नियंत्रित करतात हे मानणे कठीण जाऊ नये.

आता दुसरा मुद्दा असा की, असे समजा, तुम्ही एखाद्या गाडीमध्ये बसलेले आहात. त्या गाडीमध्ये एक स्क्रीन आहे. या स्क्रीनचे बटण दाबले असता तुम्ही कोठे आहात व तुम्हाला जेथे जायचे आहे त्या रस्त्याचा नकाशा स्क्रीनवर दाखविला जातो; तसेच रस्त्यात स्पीड ब्रेकर कोठे आहेत, खड्डे कोठे आहेत, त्याचा अलार्मसुद्धा वाजतो. अशी सोय त्या गाडीत आहे.

हातात मोबाईल आहे, घरी टी. व्ही. आहे, अडथळे व रोड मॅप दाखविणारी गाडी आहे. एवढ्या तीन गोष्टींनी तुमचे लाइफ चालेल का ?

मी म्हणाले, 'नाही! जीवनामध्ये आणखी कितीतरी गोष्टींची आवश्यकता असते.'

श्रीस्वामीजी म्हणाले, 'केवळ मोबाईल, टी. व्ही., गाडी असून चालत नाही. जीवनामध्ये अजून कितीतरी गोष्टींची आवश्यकता असते. अगदी तसेच ग्रह, नक्षत्रे तुम्हाला तुमच्या जीवनाचा रोड मॅप दाखवितात. त्यातील खड्डे व अडथळे कसे चुकवावेत हे तुम्ही ठरवायचे असते. तुमच्या उपयोगी पडणारे कोण व तुमचा मार्ग कोणता हेही ग्रह, नक्षत्रे सांगतात; पण ग्रह, नक्षत्रे कुठलीही गोष्ट उचलून तुम्हाला देऊ शकत नाही. इथे कुलदेवता, कुलस्वामिनी, देव-देवता (राम, कृष्ण, देवी, हनुमान, गणपती, शिव, दत्त इत्यादी) यांची उपासना उपयोगी पडते. कारण देव-देवतांचे सामर्थ्य हे ग्रह-नक्षत्रांपेक्षा हजारो पटीने जास्त असते. म्हणून फक्त नशिबावर अवलंबून न राहता देव-देवतांचा आधार घेऊन जीवन व्यतित करणे जास्त चांगले.

**१०८. दुर्गा : सत्पुरुषाच्या दर्शनानंतरसुद्धा माणसाच्या वृत्तीत फरक पडत नाही, असे का ?**

**श्रीदत्त :** हा प्रश्न म्हणजे साबणाचे अनेक कारखाने आहेत तरीपण अस्वच्छता का असा आहे; कारण स्वच्छता ही ज्याची त्याने करायची असते. साबण स्वत:हून तुम्हाला स्वच्छ करू शकणार नाही. संत तुकाराम महाराज म्हणतात,

**नाही निर्मळ जीवन । काय करील साबण ।**
**तैसी नाही चित्तशुद्धी । तेथे बोध करील कायी ॥**

म्हणजे चित्त शुद्ध नसेल, तर बोध करूनही काही उपयोग होत नाही.

संतांचे दर्शन ही मानवाला सुधारण्यासाठी दिलेली खूप मोठी संधी असते. आजकाल खरे सत्पुरुष दिसणेही कठीण झाले आहे. अशा परिस्थितीमध्ये तुम्हाला खरा सत्पुरुष भेटला, तर ईश्वराची फार मोठी कृपाच समजायला हवी व नि:स्वार्थ बुद्धीने सेवा करायला हवी. ते सांगतील तशी साधना करायला हवी व आपली आध्यात्मिक प्रगती व्हावी म्हणून प्रारब्ध शुद्धी करायला हवी. प्रारब्ध शुद्ध झाले, की चित्त आपोआप शुद्ध होते.

लोक सत्पुरुषाचा वापर फक्त स्वत:च्या स्वार्थासाठी करतात. स्वार्थाची पूर्ती झाली, की सत्पुरुषाकडे मुळीच लक्ष देत नाहीत. पुन्हा जेव्हा अडचण निर्माण होईल, तेव्हा पुन्हा सत्पुरुषाचे पाय धरायला जातात. माणसे जेव्हा अशी वागतात तेव्हा समाजामध्ये कमर्शिअल साधू तयार होतात. अशा लोकांची अवस्था -

**लोभी गुरु लालची चेला । दोनों नरकमें ठेलम ठेला ।।**

अशी होते. म्हणून जगामध्ये जेव्हा स्वार्थाचा मासळी बाजार सुरू होतो व व्यापारी साधू-संत तयार होतात तेव्हा खरे सत्पुरुष समाजापासून दूर निघून जातात; मात्र आध्यात्माची खरी भूक असणाऱ्याला खरा सत्पुरुष आपोआपच भेटतो.

श्रीस्वामीजींनी जे सांगितले ते अगदी खरे आहे; कारण सतरा हजार फूट उंचीवर साधना करणाऱ्या हरिदासने मला सांगितले, की गेली ८-१० वर्षे मी उत्तराखंडात रहात आहे. शेकडो साधू-संतांना भेटलो; पण श्रीस्वामीजींना भेटल्यानंतर जी शांती व तृप्ती मिळाली तशा शांती व तृप्तीचा अनुभव मला कधीच मिळाला नाही.

विशेष म्हणजे श्रीस्वामीजींनी त्याला शोधून काढले व आध्यात्मिक ज्ञान व आध्यात्माचा अनुभव दोन्ही गोष्टी दिल्या. यावरून एक गोष्ट सिद्ध होते, की ईश्वरचिंतन करून आपण स्वत:ची योग्यता वाढविली पाहिजे म्हणजे खरा गुरु आपोआप भेटतो, त्याला शोधावे लागत नाही. बाजारात अथवा तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी गुरु शोधत फिरल्यास आपल्या देहामध्ये पिशाच्चशक्ती घुसविणारे, आपले तेज व पुण्याई काढून घेणारे अनेक तथाकथित साधू भेटण्याची जास्त शक्यता असते. असे ढोंगी लोक स्वत:जवळ पिशाच्चशक्ती बाळगतात व लोकांमध्ये पिशाच्चशक्ती घुसडून देतात. लोकांच्या पुण्याईवर ढोंगी साधूंची मजाच मजा असते व ज्यांच्या अंगात अशा पिशाच्चशक्ती घुसलेल्या आहेत, अशी माणसे मन:शांतीसाठी तीर्थक्षेत्री भटकत राहतात. नवनवीन साधू संत शोधत राहतात हे मी प्रत्यक्ष पाहिले आहे.

म्हणून श्रीस्वामीजी म्हणतात, 'कुठल्याही साधूच्या नादी लागू नका. अगदी माझ्यासुद्धा नादी लागू नका!' माणसांत

राहणे तर श्रीस्वामीजींनी पंचवीस वर्षांपूर्वीच सोडून दिले आहे.

**१०९. दुर्गा : करोडोपतीही दु:खी व समस्याग्रस्त असतात. गरिबाच्या जीवनात तर दु:खाशिवाय दुसरे काहीच नसते, मध्यमवर्गीय कधी सुखी, तर कधी दु:खी, असतो. शेवटी खरा सुखी कोण असतो ?**

**श्रीदत्त :** आत्मज्ञानी-ज्याने स्वत:ला ओळखले तो किंवा जो परमात्म्याशी एकरूप झाला तो खऱ्या अर्थाने सुखी असतो. जसजसे तुम्ही परमात्म्याच्या दिशेने एक-एक पाऊल पुढे जाऊ लागाल तसतसे सुख वाढू लागते व दु:ख कमी कमी होऊ लागते.

परमेश्वराने अशी व्यवस्थाच केली आहे, की जोपर्यंत जीवात्मा आपल्या मूळ स्वरूपाशी म्हणजे परमात्म्याशी एकरूप होत नाही, तादात्म्य पावत नाही तोपर्यंत कुठल्या ना कुठल्या रूपाने दु:ख त्याला सतावीत राहील. ही व्यवस्था कायमस्वरूपी केलेली आहे. याशिवाय प्रत्येक मानवाने केलेल्या चांगल्या- वाईट कर्मांची फळे त्याला भोगावी लागतात ती वेगळीच !

तुम्ही आस्तिक असा अथवा नास्तिक, सकाम असा अथवा निष्काम, स्वार्थी असा अथवा नि:स्वार्थी, बेचैन व अस्वस्थ मन कधीही कोणालाही स्वस्थ बसू देत नाही. म्हणून दिवसातून एक तासभर तरी शांत बसून चिंतन करण्याचा

अभ्यास करावा.

**११०. दुर्गा : आजकाल बरेच सत्ताधारी भ्रष्ट, लाचखाऊ, लुटारू, क्रूर व स्वार्थी आढळून येतात. अशा लोकांचे काय होते?**

**श्रीदत्त :** अशी माणसे जास्तीत जास्त साठ-सत्तर वर्षे आपली सत्ता गाजवितात. पूर्वजन्मामध्ये केलेल्या पुण्याईमुळे, तामसी तपश्चर्येमुळे त्यांना सत्ता प्राप्त झालेली असते. काही माणसांना राजसी तपश्चर्येमुळे प्रचंड श्रीमंती प्राप्त झालेली असते. यापैकी कोणीही बुद्धीचा दुरुपयोग केल्यास त्यांची अवस्था-

**तपा अंती राज्य । राज्या अंती नरकवास ।।**

अशी होते. बायबलमध्ये सुद्धा सुईच्या नेढ्यातून एखाद्या वेळी उंट जाऊ शकेल; परंतु श्रीमंत व सत्ताधीशांना प्रकाशमार्ग किंवा ईश्वराच्या साम्राज्यात प्रवेश प्राप्त होत नाही, असे म्हटले आहे.

कोणाच्याही उद्धाराची परमेश्वराला घाई नाही, सिद्ध-पुरुषांनाही घाई नाही. सत्तर-ऐंशी वर्षांच्या आयुष्यामध्ये तुम्हाला जो काही गोंधळ घालायचा तो घाला, असे सांगून मानवाला ईश्वराने पृथ्वीतलावर पाठवलेले असते.

**'उद्धरे दात्मनात्मानम्'**

म्हणजे आपणच आपला उद्धार करावा, असे कृष्णाने गीतेत सांगितले आहे.

पृथ्वीतलावर एखाद्याला कोट्यावधी लोक घाबरत असतील किंवा एखाद्याची लाखो लोक देव म्हणून पूजा करत असतील.

ईश्वराच्या दरबारात अशा गोष्टींना काडीचेही महत्त्व नाही, तेथे फक्त एकच न्याय -

**'करावे तसे भरावे'**

या न्यायानुसार प्रत्येक आत्म्याला ईश्वरी कोर्टाचा निर्णय ऐकविला जातो. यामुळे पुष्कळ वेळा भिकारी स्वर्गात असतो. तर राजा नरकात ! तोही कोट्यावधी वर्षांकरिता, असे चित्र दिसून येते.

### १११. दुर्गा : दुष्ट प्रवृत्तीची माणसे का निर्माण होतात?

**श्रीदत्त :** परमेश्वर प्रत्येक माणसाला पृथ्वीतलावर जन्म देतो ते आध्यात्मिक प्रगती करण्याकरिता. एखाद्या माणसाने एक महिना नोकरी केल्यानंतर त्याला मालकाने पगार देणे हे मालकाचे कर्तव्यच असते. त्याप्रमाणे तपश्चर्या अथवा पुण्याई केल्यानंतर सत्ता अथवा श्रीमंती ही आपोआपच प्राप्त होते. माणूस फक्त त्याचा दुरुपयोग करतो इतकेच. सत्ता वाईट नाही, श्रीमंतीही वाईट नाही. दुरुपयोग हा माणूस करतो.

येथे ईश्वराचा काही संबंध नाही.

सत्ता-संपत्तीचा माणूस दुरुपयोग करतो व नंतर त्याची फळे भोगतो. पुष्कळ वेळा अनेक जन्म विविध प्रकारची फळे भोगण्यासाठी घ्यावे लागतात किंवा पुष्कळ वेळा जेथे सुईच्या टोकाएवढा सुद्धा प्रकाश नाही, अशा अंध:कारमय यातना लोकात असंख्य वर्षे काढावी लागतात. म्हणून सांगतो, परमेश्वर दयाळू नाही तो अतिशय कठोर न्यायी आहे. कोणाच्याही उद्धाराची त्याला घाई नाही. देव दयाळू आहे, देव प्रेमळ आहे, असे तेच लोक म्हणतात ज्यांना ईश्वरी सत्तेचे ज्ञान नाही.

**११२. दुर्गा : आध्यात्मिक उन्नती करणारे सद्गुण निर्माण होण्यास काय करावे ?**

**श्रीदत्त** : नि:स्वार्थ बुद्धीने परोपकार करण्यास सुरुवात करावी. दररोज एक तास तरी श्वासावर लक्ष ठेवून ईश्वरचिंतन करावे, दान करावे, ईश्वराच्या स्तोत्राचे दररोज अनेक पाठ करावेत व सतत नामस्मरण करावे, पवित्र ग्रंथांचे वाचन करावे. असे केल्याने हळूहळू अंगी सद्गुण निर्माण होऊ लागतात, आध्यात्मात प्रगती होते.

**११३. दुर्गा : या पुस्तकाला आपण 'दत्त-दुर्गा संवाद' असे नाव का दिले ?**

**श्रीदत्त :** 'हे मी केले!' 'ते मी केले!' असे जगातील सर्व माणसे म्हणत असतात; परंतु माणसाच्या हातात करण्यासारख्या गोष्टी फारच थोड्या असतात.

माणसाच्या मनात एक कल्पना निर्माण होते. ही कल्पना सूक्ष्म सृष्टीतून त्याच्या मेंदूमध्ये उतरलेली असते. याचा अर्थ सूक्ष्म सृष्टीतील सात्त्विक, राजस अथवा तामस अशा एखाद्या आत्म्याच्या मनात कल्पना निर्माण होते. ती कल्पना कोण ग्रहण (carry on) करू शकेल, याचा तो आत्मा शोध घेतो. मग त्याला एखादा असा माणूस सापडतो, जो ती कल्पना ग्रहण करू शकेल. कल्पना ग्रहण करणारी व्यक्ती सापडली, की त्याच्या मेंदूमध्ये ती कल्पना घुसवली जाते. अशा प्रकारे 'सुईपासून तासाला २५ हजार मैल वेगाने जाणाऱ्या रॉकेटपर्यंत सर्व वस्तू तयार होतात.' यावरून ज्ञान हे अदृश्य सृष्टीतून खाली उतरते हे सिद्ध होते.

माझा हा मुद्दा कदाचित वाचकांना पटणार नाही, म्हणून आणखी एक उदाहरण देत आहे.

पिस्तुलाच्या गोळीपासून ते क्षेपणास्त्रापर्यंत असंख्य प्रकारची हत्यारे तयार झाली आहेत. या कुठल्याही शस्त्राला चांगला माणूस कोण व वाईट माणूस कोण हे कळत नाही.

अदृश्य सृष्टीमधील काही आत्मे सध्या असा विचार करत आहेत, की एखादे असे अस्त्र निर्माण व्हावे, की जे फक्त दुष्ट माणसालाच ठार करेल, चांगला मनुष्य त्याच्या शेजारी

जरी उभा असला, तरी त्याच्या केसालाही धक्का लागणार नाही आणि असे अस्त्र हजारो मैलांवरून सोडले तरी ते फक्त दुष्ट माणसांचाच वेध घेईल. इतकेच नव्हे, तर एकदा सोडलेले अस्त्र शेकडो दुष्ट माणसांचा वेध घेत राहील, चांगल्या माणसांना त्याचा काही त्रास होणार नाही.

योग्यांना वातावरणातील विचारचित्रे व कल्पनाचित्रे पाहता येतात. १९८५ च्या आसपास मी वेबकॅमबद्दल सांगितले होते. (वेबकॅम हा शब्द मला नंतर कळला.) तो वेबकॅम आता सर्वत्र झालेला आहे. १९९४ मध्ये मी ट्रान्झिस्टर ज्याप्रमाणे जंगलात बसून माणसे ऐकतात त्याप्रमाणे हातात घेऊन लोक जंगलात बसूनसुद्धा टी. व्ही. पाहू शकतील असे सांगितले आहे. ते अद्याप खरे व्हायचे आहे.

'**श्री दत्त-दुर्गा संवाद**' असे या पुस्तकाला जे नाव दिले आहे, त्याचे कारण हे ज्ञान अदृश्य सृष्टीतून खाली आले आहे. मी लिहिलेल्या पुस्तकातील बराचसा मजकूर हा अदृश्य सृष्टीतूनच बाहेर आलेला आहे. मला ज्ञान देणाऱ्या त्या देव-देवतांबद्दल कृतज्ञता दर्शविण्यासाठी या पुस्तकाला '**श्री दत्त-दुर्गा संवाद**' असे नाव दिले आहे.

**११४. दुर्गा : जर अदृश्य सृष्टीतून सर्व गोष्टी खाली येत असतात, तर माणसाला कर्माची फळे का भोगावी लागतात?**

**श्री दत्त :** अदृश्य सृष्टीतून ज्ञान खाली येते, ही गोष्ट अगदी खरी आहे व प्रत्येक कर्माचे फळ मानवाला भोगावे लागते हे पण शंभर टक्के खरे आहे; कारण मानवाला जे काही पाच-दहा टक्के स्वातंत्र्य ईश्वराने दिलेले आहे, त्याचा तो प्रचंड प्रमाणात दुरुपयोग करतो. फळ कापण्यासाठी ईश्वराने सुरी माणसाच्या हातात दिली. माणसाने बुद्धीचा दुरुपयोग करून त्या सुरीची तलवार बनविली व तलवारीने हजारो माणसांची मुंडकी कापली, हजारो निरापराध लोकांना ठार केले. अशा कर्मांची फळे माणसाला भोगावीच लागतात. हे विश्व अनेक नियमांनी चालते. **'करावे तसे भरावे'**, **'जे पेराल तेच उगवेल'**, **'जेवढे दान द्याल त्याच्या अनेक पटीने तुम्हाला परत मिळेल'** **'इतरांना जेवढे दुःख द्याल त्याच्या अनेक पटीने दुःख तुम्हाला मिळेल'**, **'इतरांना जेवढा आनंद द्याल त्याच्या अनेक पटीने तुम्हाला आनंद मिळेल'**, **'जेवढी इतरांना मदत कराल त्याच्या अनेक पटीने तुम्हाला मदत अदृश्य सृष्टीतून मिळत जाईल'** असे अनेक ईश्वरी नियम आहेत.

त्यानुसार हे विश्व चालत असते. ईश्वरी नियमानुसार अनेक श्रीमंत घराणी दारिद्र्याच्या खाईत लोटली जातात. तर अनेक गरीब घराणी कालांतराने श्रीमंत होतात.

**११५. दुर्गा : अदृश्य सृष्टीविषयी आपण बोलतच आहोत, तर नजीकच्या भविष्यकाळात एखादी चांगली व**

**आमजनतेला दिलासा देणारी क्रांतिकारक गोष्ट जर घडणार असेल, तर सांगा.**

**श्रीदत्त :** आज जगातील सर्व गाड्या पेट्रोल व डिझेलवर चालत आहेत. याच गाड्या येत्या काही वर्षांत पेट्रोल व डिझेल शिवाय चालू लागतील, हे मी तुम्हाला १९९५ मध्ये सांगितले होते. आता हे भविष्य खरे होण्याची वेळ आलेली आहे. येत्या १०-१२ वर्षांत पेट्रोल, डिझेलविरहित गाड्या रस्त्यावर धावू लागतील. भावी काळामध्ये वीजसुद्धा पॉवर हाऊसकडून घ्यावी लागणार नाही. इलेक्ट्रॉनिक वीज अस्तित्वात येईल. (इलेक्ट्रॉन, न्यूट्रॉन व प्रोटॉन यांचा वापर करून.)

**११६. दुर्गा : ईश्वर ही व्यक्ती आहे की सत्ता ?**

**श्रीदत्त :** ईश्वर ही व्यक्ती आहे, ईश्वर ही सत्ता आहे व ईश्वर ही स्टेज आहे.

ज्याप्रमाणे एखाद्या देशाचे सरकार सर्व काही करते; परंतु सरकार म्हणजे काय, असे कोणी विचारल्यास दाखविता येत नाही; तसेच ईश्वर ही एक सत्ता किंवा व्यवस्था असून, याला ईश्वर असे म्हणतात, असे आपण दाखवू शकत नाही; परंतु जो कोणी मनुष्य ईश्वर कोण आहे व ईश्वर काय आहे, याचा शोध घेण्याचा प्रयत्न करतो तेव्हा तो मनुष्य ईश्वरच होतो. म्हणून ईश्वर व्यक्तीही आहे. वातावरणामध्ये असे असंख्य ईश्वर आहेत; तसेच प्रत्येक मनुष्य हाही ईश्वरच आहे.

**११७. दुर्गा : कोट्यावधी वर्षांपूर्वी, म्हणजे आधुनिक भाषेमध्ये ज्याला डायनासॉरचे युग (शार्दूल युग) असे म्हणतात, त्या काळामध्ये पृथ्वीतलावर प्रचंड आकाराचे राक्षस होते. ते अतिशय क्रूर होते. दुसरे टोक म्हणजे अतिशय सात्त्विक ऋषी होते. जे फक्त तपस्या करत. राक्षसांना मारण्यासाठी देवी प्रकट झाली. तिने राक्षसांना ठार केले. काही ऋषींनीही उग्र तपस्या करून राक्षसांना ठार केले. त्यानंतर युग बदलले. परशुरामाने त्या युगात अनेक उग्र राक्षसी प्रवृत्तीच्या राजांना खलास केले. नंतर रामाने रावण, कुंभकर्ण अशा कोट्यावधी राक्षसांना खलास केले आणि कृष्णाने दुष्ट प्रवृत्तीच्या महाबलाढ्य कौरवांना खलास केले. सध्या विविध आकारातील व प्रकारांतील राक्षसी प्रवृत्तीच्या लोकांचा त्रास सामान्य जनतेला होत आहे. यांचा नाश करणारा एखादा अवतार प्रकट का होत नाही ?**

**श्रीदत्त :** जेव्हा सर्व उपाय हरतात तेव्हा दुष्टांना ठार मारण्याचा निर्णय घेतला जातो. प्रथम त्यांना सद्‌बुद्धी व्हावी म्हणून प्रयत्न केला जातो. सध्या दुष्ट लोकांना सद्‌बुद्धी व्हावी म्हणून विविध मार्गांनी प्रयत्न केले जात आहेत. या प्रयत्नांना यश न आल्यास अंतिम उपाय केला जाईल.

**११८. दुर्गा : माणसाने कसा विचार करावा ?**

**श्रीदत्त :** आपल्या आजोबांची, पणजोबांची परिस्थिती

काय होती याचा माणसाने विचार करावा; कारण त्यामानाने आपण खूप सुखी आहोत. ज्या परमेश्वराने आपल्याला सुखसाधने दिली त्या परमेश्वराविषयी कृतज्ञता बाळगावी.

**११९. दुर्गा : गर्व, अहंकार होऊ नये म्हणून काय करावे?**

**श्रीदत्त :** हे शरीर सोडून एक दिवस जायचे आहे. या शरीरात राहणारा 'मी' कोण आहे? मी कशाचा अहंकार अथवा गर्व करावा? पहिलवान मनुष्य एका दणक्यामध्ये शंभर किलो वजनाचे पोते उचलून जमिनीवर टाकतो. तोच पहिलवान ताप आल्यानंतर इतका दुर्बल होतो, की त्याला हात धरून उठवावे लागते. सत्तराव्या, ऐंशीव्या वर्षी आपली परिस्थिती कशी असेल, याचा विचार वृद्ध माणसे व अल्झायमर पेशंट्स यांच्याकडे पाहून करावा. अशा प्रकारे चांगल्या गोष्टींचे चिंतन केल्याने गर्व-अहंकार कमी होतो.

**अनित्यानी शरीराणी । वैभवं नैव शाश्वतम् ।।**
**नित्य सन्नीहतो मृत्यू । कर्तव्यं धर्मसंग्रहः ।।**

**अर्थ :** शरीर हे अनित्य आहे, सारखे बदलत असते. वैभव शाश्वत नाही. मृत्यू कुठल्याही क्षणी कुठल्याही रूपाने झडप घालू शकतो, याची जाणीव ठेवून आध्यात्मिक प्रगतीसाठी सतत प्रयत्न करावा.

**सर्व येथे राहणार । काही न येई बरोबर ।।**
**सत्कर्म आणि सदाचार । हेचि जीवाचे सांगाती ।।**

**१२०. दुर्गा : कुंडलिनी व षड्चक्रे याविषयी काही सांगाल का ?**

**श्रीदत्त :** कुंडलिनी व षड्चक्रे या विषयी माहिती सांगणारी अनेक पुस्तके बाजारात उपलब्ध आहेत. मी तुम्हाला थोडेसे त्याच्या पलीकडचे सांगतो.

कुंडलिनी व षड्चक्रे ही सूक्ष्मदेहात असतात. थर्मामीटर मधील लाल रंगाच्या पाऱ्याप्रमाणे कुंडलिनी एक एक चक्राचा भेद करीत सहस्रारचक्रापर्यंत जाते, हे अगदी सत्य आहे. बाकीचे अनुभव ज्याची जशी धर्मभावना असेल तसे येतात. म्हणजे हिंदू साधकाला मूलाधार चक्रात गणपती, स्वाधिष्ठान चक्रात ब्रह्मा, मणिपूर चक्रात विष्णू, अनाहत चक्रात शिव-पार्वती, आज्ञा चक्रात ज्योति, सहस्रारचक्रात परब्रह्माचा अनुभव येतो.

साधक जर शीख असेल, तर त्याला त्याच्या श्रद्धेप्रमाणे गुरु नानक, गुरु गोविंदसिंग इत्यादी शीख गुरुंची दर्शने होतात.

साधक जर तिबेटी असेल तर त्याला पद्मावती देवी, पद्मसंभव, तिलोपा, नरोपा, मारपा इत्यादी सिद्धपुरुष यांची दर्शने होतात.

साधक जर मुस्लिम असेल तर त्याला वली, पीर, दर्गे दिसतात व साधक जर ख्रिश्चन असेल, तर त्याला येशू ख्रिस्ताचे दर्शन होते. अशा प्रकारे सूक्ष्मदेहातील कुंडलिनी, षड्चक्रे, तसेच उपचक्रे श्रीहाट, गोल्हाट, औटपीठ इत्यादी सर्व गोष्टींचे जंजाळ हे ज्याच्या त्याच्या धर्मभावनेप्रमाणे प्रत्येकाला मार्ग दाखवीत असते. हे जरी खरे असले, तरी एक विशिष्ट पायरी ओलांडल्यानंतर '**ज्याप्रमाणे कापूर उघड्यावर ठेवला असता हवेत विरघळून जातो त्याप्रमाणे सूक्ष्मदेह व कारणदेह हे दोन्ही देह विरघळून जातात, नष्ट होतात.**' तेव्हा कुंडलिनी शक्ती, षड्चक्रे, उपचक्रे या सर्व गोष्टी नाहीशा होतात व हा अनुभव सर्व धर्मांतील साधकांना सारखाच येत असतो. येथे काहीच वेगळेपण अथवा फरक नसतो. येथे सर्व सिद्ध एकरूप होतात.

भारतीय समाज शंभर वर्षांपूर्वी अतिशय अशिक्षित होता. त्यामुळे यापूर्वी होऊन गेलेल्या सर्व सत्पुरुषांनी कुंडलिनी व षड्चक्रांना खूप महत्त्व दिले आहे; कारण समाजामध्ये राम म्हणण्याइतकी सुद्धा पात्रता नव्हती. साधू-संतांनी अवतार धारण करून समाजाला राम, कृष्ण, विठ्ठल, नारायण अशा नामाचा घोष करायला लावला. जे थोडे शिकलेले होते त्यांना कुंडलिनी व षड्चक्राचे महत्त्व सांगून ध्यान कसे करावे ते शिकविले. आता आपण एकविसाव्या शतकात - इलेक्ट्रॉनिक्स युगात वावरत आहोत. योग म्हणजे काय हे बऱ्याच लोकांना

माहीत आहे. लोकांनी आता कुंडलिनी व षड्चक्रे याच्या पलीकडे कसे जायचे याचा विचार करायला हवा.

**१२१. दुर्गा : कुंडलिनी व षड्चक्रे यांच्या पलीकडे जाण्याचा मार्ग कोणता ?**

**श्रीदत्त :** प्रथम ईश्वराच्या एखाद्या स्तोत्राचे किमान चाळीस हजार पाठ करावेत. याने मानसिक तयारी चांगली होते. पाठ अधिक केल्यास अधिक उत्तम. नंतर मन निर्विचार करण्याचा प्रयत्न करावा. सुरुवातीला मन एक मिनिट निर्विचार करण्याचा प्रयत्न करावा व मन निर्विचार करण्यासाठी दररोज तास-दीड तास दीर्घ श्वसनाचा अभ्यास करावा. श्वास खूप खोल खोल घ्यावा. या साधनेने मन निर्विचार होऊ लागते. प्रथम एक मिनिट, नंतर दोन मिनिटे, नंतर पाच मिनिटे अशा प्रकारे मन निर्विचार ठेवण्याचा प्रयत्न करावा. जसजसे मन निर्विचार होऊ लागते, तसतसा परमानंद होऊ लागतो. परमशांतीचा अनुभव येतो. दररोज ४-५ तास मन निर्विचार ठेवता आले तर साधकात देवत्व प्रकट होऊ लागते. जस जसे मन निर्विचार होऊ लागते, तसतसे लक्षात येते, की आपण विचार करीतच नसतो, बाहेरील वातावरणातून विचार मनात शिरत असतात. शरीरातील वायुतत्त्व बिघडल्याने मनात विचार गर्दी करत असतात किंवा वातावरणातील काही शक्ती कानामध्ये बोलत असतात. इतकेच नव्हे, तर कृती करायला भाग पाडत असतात. विचारांचा व

माझा काहीच संबंध नव्हता याची जाणीव होऊन आत्मा सुखी होतो, शांत होतो.

**अशांतस्य कुता सुखम् !**

अशांत आत्म्याला सुख कोठले, याची त्याला साक्ष पटते कारण तो सुखी व शांत झालेला असतो. या अनुभवाने तो उल्हसित होतो व जास्तीत जास्त वेळ उल्हसित राहण्याचा प्रयत्न करतो. येथे त्याला त्याच्या खोल खोल श्वासाची खूप मदत होते. हळूहळू त्याला समाधी लागू लागते. या समाधीला सविकल्प समाधी म्हणतात.

सविकल्प समाधी अवस्था प्राप्त होण्यापूर्वीच साधकाच्या लक्षात एक गोष्ट येते, की जसजसे मन निर्विचार होत आहे, तसतसे ते अधिक शक्तिमान होत आहे. मनात एखादी कल्पना निर्माण होताच ती थोड्याच वेळात पूर्ण होत आहे. म्हणजे 'जिलेबी खावीशी वाटली' असा विचार मनात आला असे समजून मन निर्विचार केले. जिलेबीचा विषय पूर्णपणे मनातून काढून टाकला-जिलेबीला विसरलो...

थोड्या वेळाने कोणीतरी भेटायला येतो. त्याच्या हातात एक मिठाईचा बॉक्स असतो. तो म्हणतो, 'आमच्या गावातील हलवाई उत्तम जिलेबी बनवतो म्हणून तीच जिलेबी तुमच्यासाठी घेऊन आलो आहे !'

साधकाला खूप मोठे आश्चर्य वाटते; परंतु हा योगायोग

नसतो. त्याने केलेला जिलेबीचा संकल्प सिद्ध झालेला असतो. अशा प्रकारे इच्छापूर्तीचा अनुभव दररोज येऊ लागतो. येथे साधक फसण्याची दाट शक्यता असते; किंबहुना बरेच साधक येथे फसतात.

जागृत साधकाच्या लक्षात येते, की कल्पनाशक्ती आपला प्रत्येक संकल्प सिद्ध करीत आहे. येथे मला श्री ज्ञानेश्वरांची एक सुंदर ओवी आठवते. ती सांगाविशी वाटते.

श्री ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात-

**हे कर्म मी करीन । अथवा आदरिले सिद्धी नेईन ।।**
**येणे संकल्पे तयाचे मन । विटाळेना ।। ज्ञा. ।।**

मन निर्विकल्प कसे करावे याचा मार्ग श्री ज्ञानेश्वरांनी या ओवीत सांगितला आहे.

संकल्पपूर्तीचा अनुभव येऊ लागल्याबरोबर साधकाने मन निर्विकल्प करण्याचा प्रयत्न करावा. कुठलीही इच्छा मनात करू नये. कसलीही अपेक्षा करू नये. मनात कुठलीही कल्पना निर्माण होणार नाही, याची दक्षता घ्यावी. हळूहळू निर्विकल्प समाधी लागते. या समाधीचा वेळ वाढवत जावा. येथेपर्यंत पोचल्यावर कुंडलिनी व षड्चक्रे पूर्णपणे मावळतात; कारण, सूक्ष्मदेह व कारणदेह नष्ट झालेले असतात.

### १२२. दुर्गा : ध्यानामध्ये येणारे अनुभव देव लोकातून

**येत आहेत की, पिशाच्च लोकातून येत आहेत हे कसे समजावे ?**

**श्रीदत्त :** पिशाच्च लोकातून येणारे अनुभव हे मनामध्ये भ्रम निर्माण करतात, तर देव लोकातून येणारे अनुभव हे ज्ञान प्राप्त करून देतात. ज्ञानाने सद्‌गुण निर्माण होतात, तर भ्रमाने माणसाच्या मनात दुर्गुण व अहंकार निर्माण होतात.

**१२३. दुर्गा : आध्यात्माचे सार जर अगदी थोडक्यात सांगायचे ठरविले तर कसे सांगाल ?**

**श्रीदत्त :** शंकराचार्यांच्या शब्दात; पण थोडे विवरण करून अगदी थोडक्यात सांगतो.

**श्लोकार्धेन प्रवक्ष्यामि । यदुक्तं ग्रंथ कोटिभिः ।।**
**ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या :। जीवो ब्रह्मैव नापरा: ।।**

शंकराचार्य म्हणतात, कोटी कोटी ग्रंथांमध्ये जे सांगितले आहे ते मी अर्ध्या श्लोकात सांगतो, 'ब्रह्म सत्य आहे, या जगामध्ये परब्रह्माशिवाय काहीही नाही. जग मिथ्या आहे, म्हणजे भासमय आहे.'

श्वासाचे अस्तित्व जोपर्यंत आहे तोपर्यंत प्रत्येक माणूस, पशू, पक्षी, वनस्पती सर्व काही जिवंत असते व हा श्वास म्हणजेच ब्रह्म होय ! म्हणून शंकराचार्यांनी जगात सर्वत्र ब्रह्मच भरले आहे, असे म्हटले आहे.

**१२४. दुर्गा : भविष्यकाळात एखादे आश्चर्यजनक संशोधन निर्माण होणार आहे काय ?**

**श्रीदत्त :** येत्या पन्नास वर्षांमध्ये अनेक आश्चर्यजनक अशी संशोधने होणार आहेत. मानवाला अनेक प्रकारचे नवीन शोध लागतील. गाड्या पेट्रोल शिवाय चालतील हे मी तुम्हाला वीस वर्षांपूर्वीच सांगितले आहे. भावीकाळामध्ये इलेक्ट्रीसिटीसाठी पॉवर हाऊसची गरज राहणार नाही व सर्वात मोठे चमत्कारिक संशोधन म्हणजे ज्याप्रकारे आज तुम्ही जगातील कुठलेही एखादे घर अथवा ठिकाण गुगल साईटवर जाऊन शोधू शकता त्याप्रमाणे जगातील कुठलीही व्यक्ती कुठे बसली आहे व ती काय करत आहे तेही तुम्हाला इंटरनेटवर दिसू शकेल. हे सर्वात मोठे आश्चर्यकारक संशोधन असेल. या संशोधनामुळे जगात गुन्हेगारी राहणार नाही, जगात खोटेपणा राहणार नाही कारण गुन्हा करणारा मनुष्य कोठेही लपू शकणार नाही. तसेच लपून राहिलेल्या गुन्हेगाराने किती दिवसापूर्वी कुठला गुन्हा केला व तो कसा केला हे इंटरनेटवर पाहता येईल. त्यामुळे इच्छा असो अथवा नसो माणसाला सदाचारी बनणे भाग पडेल.

**१२५. दुर्गा : तुम्ही पूजा, आरती करून घेत नाहीत. समाजात फारसे येत नाहीत, एकांतवासातच राहतात, हिमालय व गिरनार ही स्थाने तुम्हाला अतिशय आवडतात या सर्वांची कारणे काय ?**

**श्रीदत्त :** मी समाजात येत नाही, पूजा, आरती करून घेत नाही, कारण मला हे आवडत नाही. एवढ्या मोठ्या योग्यतेचा मी झालो आहे, असे मला वाटत नाही.

पहिल्या इयत्तेपासून नववी इयत्ता पास झाल्यानंतर विद्यार्थी जेव्हा दहावीत जातो तेव्हा त्याला खूप टेंशन येते. तो रोज १५-१५ तास अभ्यास करतो, तेव्हा कोठे तो दहावी पास होतो. यापुढे ग्रॅज्युएशन व पोस्ट ग्रॅज्युएशन करण्यासाठी खूप कष्ट करावे लागतात. समाजातील प्रत्येकाला हे आता चांगले माहीत झाले आहे.

सिद्धावस्था प्राप्त होणे, ईश्वराशी एकरूपता प्राप्त होणे या सर्व गोष्टी वर वर्णन केलेल्या अभ्यासापेक्षा कितीतरी कठीण गोष्टी आहेत. संपूर्ण आयुष्य द्यावे लागते. २०-२० तास साधना कराव्या लागतात. साधना करताना प्राप्त होणाऱ्या क्षूद्रसिद्धी, उपसिद्धी, सिद्धी, महासिद्धी, विद्या, महाविद्या, देवतासिद्धी इत्यादी सर्व गोष्टींकडे पूर्णपणे दुर्लक्ष करून अतिशय नि:स्पृहतेने जगावे लागते. तेव्हा कोठे मायेच्या पलिकडे जाण्याचा मार्ग मिळतो. तेथेही ईश्वरकृपा किंवा परमसद्‌गुरुची कृपा लागतेच. म्हणून एकांतवास, हिमालय, गिरनार अशा जागा आवडतात, कारण या स्थानांमध्ये आजही उच्च कोटीचे साधू, उच्चकोटीचे सिद्धपुरुष भेटतात व ते पुढचे मार्ग समजावून देतात.

**१२६. दुर्गा : क्रममुक्ती म्हणजे काय? ती कशी प्राप्त होते ?**

**श्रीदत्त : क्रममुक्ती चारप्रकारे प्राप्त होते.**

**१) सलोकता २) समिपता ३) सरूपता ४) सायुज्यता**

या क्रममुक्तीच्या पायऱ्या आहेत.

## सलोकता

आपले आराध्य दैवत ज्या लोकामध्ये वास्तव्य करून असते त्या लोकांत रहायला मिळणे याला 'सलोकता मुक्ती' असे म्हणतात. जसे शिवभक्त शिवलोकांत रहातात. तर विष्णुभक्त विष्णुलोकांत रहातात. ज्याप्रमाणे भारतात रहाणाऱ्या सर्व लोकांना 'भारतीय' असे म्हटले जाते; परंतु पंतप्रधानांची भेट सर्वच भारतीयांना मिळत नाही. अशी शंभरकोटी माणसे आहेत, की ज्यांनी आपल्या देशाच्या पंतप्रधानांना पाहिलेले नाही. अगदी त्याचप्रमाणे विष्णूभक्त विष्णूलोकांत रहातात. परंतु त्यांना भगवान विष्णूचे दर्शन प्राप्त होत नाही. ते विष्णूलोकांत राहून विष्णूभक्ती करत रहातात. हळूहळू त्यांची प्रगती होत रहाते व त्यांना समिपता ही मुक्तीची दुसरी अवस्था प्राप्त होते.

## समिपता

समिपता मुक्ती प्राप्त झाल्यानंतर भक्ताला देवाच्याजवळ

जाण्याचा अधिकार प्राप्त होतो. त्याच्याशी बोलण्याचे भाग्य त्याला प्राप्त होते. भक्ताने स्मरण करताच त्याची आराध्य देवता त्याच्या समोर प्रकट होते व त्याला मार्गदर्शन करते. क्रममुक्तीचा दुसरा टप्पा येथे संपतो व सरूपता या तिसऱ्या अवस्थेकडे साधकाचा प्रवास सुरू होतो.

## सरूपता

सरूपता मुक्ती प्राप्त होण्यापूर्वी साधकाला उत्तम प्रतीचे ध्यान लागण्यास सुरुवात होते. साधक जर विष्णूभक्त असेल तर तो विष्णूरूपाचे ध्यान करतो. हळूहळू त्याला स्वतःच्या सूक्ष्म देहामध्ये विष्णूचे रूप दिसू लागते. मीच विष्णू आहे, असा भाव त्याच्यामध्ये प्रकट होऊ लागतो. हळूहळू त्याला पूर्णपणे विष्णूचे रूप प्राप्त होते. शनैः शनैः ही शक्ती वाढत जाते व साधक विष्णूच्या रूपात कोणालाही दर्शन देऊ शकतो.

पृथ्वीतलावर असे असंख्य साधक आहेत, की त्यांना त्यांच्या आराध्य दैवताचे दर्शन झालेले आहे. या दर्शनामागील रहस्य हे आहे, की सरूपता मुक्ती प्राप्त केलेले आत्मे अशा भक्तांसमोर त्यांच्या देवतेच्या रूपांत प्रकट होतात व त्यांना आशीर्वाद देतात, वरदान देतात. परंतु या सर्व गोष्टींना एक विशिष्ट मर्यादा असते. सरूपता मुक्ती प्राप्त केलेल्या आत्म्यांना मूळ देवतेचे फक्त रूप प्राप्त होते, सामर्थ्य व अधिकार प्राप्त होत नाहीत.

परदेशामधील अनेक साधक क्रुसावरील येशूख्रिस्ताचे ध्यान करतात व त्यातच ते एकरूप होतात. हळूहळू त्यांच्या देहाला जखमा होतात व त्यातून रक्त वाहू लागते. 'मी क्रुसावरील येशूखिस्त आहे.' या भावसमाधीत ते रहातात. देहासहीत प्राप्त केलेली ही सरूपता मुक्ती आहे असेच म्हणावे लागेल.

**सायुज्यता**

सायुज्यता मुक्ती म्हणजे आराध्यदेवतेमध्ये आत्मा विलीन होणे. आत्म्याचा परमात्मा होणे.

**१२७. दुर्गा : सविकल्प समाधी व निर्विकल्प समाधी या दोन समाधींविषयी अनेक पुस्तकांमध्ये लिहिले आहे. यापुढे आणखी काही आहे कां?**

**श्रीदत्त** : आत्तापर्यंत जी काही पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यामध्ये सविकल्प समाधी व निर्विकल्प समाधी या दोन समाधींचीच माहिती आहे; यापुढे ज्या अवस्था आहेत. त्या अवस्थांना 'समाधी' असे न म्हणतां 'प्रान्त' असे म्हटले जाते. 'निर्विकल्प समाधी' हा शून्याचा प्रान्त आहे. येथे अक्षरब्रह्माचे ज्ञान होते. शून्याचा भेद झाल्यानंतर महाशून्यामध्ये प्रवेश प्राप्त होतो. महाशून्याच्या प्रान्तामध्ये निरक्षर ब्रह्माचे ज्ञान प्राप्त होते. महाशून्याचा भेद केल्यानंतर

परमशून्यामध्ये प्रवेश होतो. या परमशून्याच्या प्रान्ताला 'कारणकल्प' असेही म्हणतात. येथे योग्याला 'विराटदेह' प्राप्त होतो. आपल्या देहामध्येच पृथ्वी फिरत आहे, गुरू, मंगळ इ. ग्रह फिरत आहेत, असा अनुभव त्याला येतो. या पुढील प्रान्ताला 'निवृत्तीकल्प' असे म्हणतात. 'हिरण्यगर्भाचा प्रान्त' असेही या प्रान्ताला म्हटले जाते. सहस्रकोटी सूर्यांचे तेज असलेल्या आदित्याचा येथे साक्षात्कार होतो. स्थूल, सूक्ष्म, कारण, महाकारण असे सारे देह येथे जळून जातात. योगी चैतन्य स्वरूप होतो.

या पुढील प्रान्ताला 'सत्यकल्प' असे म्हणतात. येथे कोणत्याही प्रकारच्या सृष्टीचे अस्तित्व नाही. हजारो कोटी सूर्यांचे तेज असणाऱ्या आदित्याच्याही अब्जावधी प्रकाशवर्षे मैल पुढे योग्याने प्रवास केलेला असतो. येथे योग्याला 'चिन्मय देह' प्राप्त होतो. या योग्याचा देह अणुहूनही हजारो पटीने सूक्ष्म होतो. ज्ञानेश्वरांनी 'ज्ञानेश्वरी'मध्ये याचे अत्यंत बहारदार वर्णन केलेले आहे.

**आईके शक्तीचे तेज जेव्हां लोपे । तेव्हा देहाचे रूप हारपे ।**
**मग तो डोळ्यांमाजी लपे । जगतिया ।।**
**।। ज्ञानेश्वरी ।। अध्याय ६ ।।**

श्री ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, योगी चिन्मय होतो. शक्तीस्वरूप होतो. अणुपेक्षाही हजारो पटीने सूक्ष्म होतो. आकाशापेक्षाही कोटी पटीने विशाल होतो. तो सर्वांच्या हृदयात

रहातो. सर्वांच्या डोळ्याने तोच पहातो. हे विश्व तोच होतो. चराचर तोच होतो.

**हे विश्वचि माझे घर । ऐसी मती जयाचि स्थिर ।**
**किंबहुना चराचर । आपणचि जाहला ।।**
**।। ज्ञानेश्वरी ।। अध्याय १२ ।।**

ज्याप्रमाणे समुद्रात मीठ पडल्यानंतर ते समुद्रात विरघळून जाते. समुद्राशी एकरूप होते. त्याप्रमाणे योगी परमात्म्यात विलीन होतो.

**जैसे समुद्री लवण न पडे । तव वेगळे अल्प आवडे ।**
**मग होय सिंधूचि एव्हडे । मिळे जेव्हां ।।**
**।। ज्ञानेश्वरी ।। अध्याय ५ ।।**

जोपर्यंत मीठ समुद्रात पडत नाही तोपर्यंत त्याला फारशी कोणी किंमत देत नाही किंवा त्याला अतिशय थोडेसे महत्त्व देतात, अगदी चवीपुरतेच महत्त्व देतात. तेच मीठ जेव्हा समुद्रात पडते तेव्हा त्याला समुद्राएवढा आकार प्राप्त होतो व ते पृथ्वीला व्यापून टाकते. त्याचप्रमाणे आत्मा जेव्हा परमात्म्यात विलीन होतो तेव्हा तो परमात्माच होतो. विश्वव्यापी होतो.

श्री ज्ञानेश्वर महाराज म्हणतात...

**तैसे संकल्पोनि काढिले । जयाचे मनचि चैतन्य जाहले ।**
**तेणे एक देशिये परि व्यापिले । लोकत्रय ।।**
**।। ज्ञानेश्वरी ।। अध्याय ५ ।।**

ज्या योग्याने आपले मन चैतन्यच केले आहे. म्हणजे ज्या योग्याचा आत्मा परमात्मा झाला आहे. तो देह धारी असला तरी त्रिलोकाला व्यापून रहातो.

अशा प्रकारे निर्विकल्प समाधीच्यापुढे बरेच काही आहे. खरा विहंगम मार्ग निर्विकल्प समाधी नंतरच सुरू होतो.

**ॐ शांती ! शांती ! शांती !**

**समाप्त**

परोपकारार्थं इदं शरीरम् ।

ईश चिंतनार्थं इदं मनः ।

विवेकार्थं इदं बुद्धिः ।

ब्रह्मज्ञानार्थ जीवनम् ॥

शरीर परोपकार करण्यासाठी आहे.

मन ईश्वर चिंतनासाठी आहे.

बुद्धी, चांगले - वाईट (विवेक)

यांचा विचार करण्यासाठी आहे.

जीवन हे ब्रह्मज्ञानाच्या प्राप्तीसाठी आहे.

॥ श्रीस्वामी दत्तावधूत ॥

**प्रभु आपण शंकर ।**
**मी पूजितो पामर ।**
**मम बोल अरण्यपत्र ।**
**बेल म्हणोनि स्विकारावे ।।**

।। श्रीस्वामी दत्तावधूत ।।

## श्रीस्वामी दत्तावधूत यांचे प्रासादिक ओवीबद्ध ग्रंथ

- **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र :**
  श्रीगुरुचरित्राइतकेच प्रासादिक व स्त्रीयांनाही वाचता येईल असा ग्रंथ.
  **श्री दत्तलीलामृत :**
  श्रीदत्तांच्या अनेक अवतारांच्या कथा.
  **श्रीसिद्धलीलामृत :**
  हिमालयातील सिद्धयोग्यांच्या कथा
- **श्री दुर्गा सप्तशती :**
  मूळ संस्कृत ग्रंथाचे प्राकृत ओवीबद्ध रूपांतर.
- **श्री स्वामी समर्थ सप्तशती :**
  (श्रीस्वामींच्या जीवनावर आधारित ओवीबद्ध ग्रंथ)
- **श्रीदत्त गीता**
- **श्री दुर्गा त्रिशती**
  **(देवीसूक्त, नारायणीस्तुती व श्री दुर्गास्तुतीसह)**

**वनिता बुक्स**

**बी २१३, सात आसरा सहकारी गृहनिर्माण संस्था (पानवाला चाळ),**

**डॉ. एस. एस. राव मार्ग, लालबाग,**

**मुंबई – ४०० ०१२.**

**दूरध्वनी – ०२२–२४१८७३३९.**

## जीवनाची दिशा बदलणारे श्रीस्वामी दत्तावधूत यांचे अमूल्य ग्रंथ

- **अगम्य वाणी (जागतिक भविष्य)** : सन १९९८ ते ३०००
- **आत्मसिद्धी**
- **भारतीय गूढविद्या :**
  गूढविद्येविषयी दुर्मिळ माहिती देणारा संग्राह्य ग्रंथ. या ग्रंथात अनेक साधना कशा कराव्यात याची माहिती दिलेली आहे. याशिवाय योगातील रहस्यमय भाग प्रथमच प्रकाशित करण्यात आला आहे.
- **मानवी जीवनातील गूढ रहस्ये (भाग १ ते ७) :**
  हे ग्रंथ वाचल्यानंतर मानवी जीवन हे गूढ श्नतींनी कसे भरलेले व भारलेले आहे याचे ज्ञान होते. अदृश्य सृष्टीची माहिती देणारे मराठीतील पहिलेच पुस्तक.
- **अमरत्वाकडे वाटचाल :**
  जीवनाची दिशा बदलणारी एका योग्याची ३० प्रवचने.
- **जीवन मुक्तीचा मार्ग :**
  ज्यांना खरोखर आध्यात्माची आवड आहे, ज्यांचे प्रारब्ध शुद्ध आहे, ज्यांचे मन स्वच्छ आहे, अशा लोकांना आध्यात्मात प्रगती करून देण्यास हे पुस्तक बरीच मदत करेल.
- **श्री दत्त - दुर्गा संवाद :**
  साधकांच्या मनातील शंभरहून अधिक प्रश्नांची उत्तरे देणारा ग्रंथ.
- **ईश्वरभक्तीचे अनुभव :**
  श्रीस्वामी दत्तावधूतांच्या पोथ्या व पुस्तके वाचून लोकांना आलेले अनुभव.
- **विहंगम मार्ग**
  ईश्वर मानव कसा झाला व मानवाने पुनश्च ईश्वर होण्यासाठी काय करावे हे सांगणारा अनमोल ग्रंथ.
- **श्रीस्वामी दत्तावधूत या सिद्ध योग्याच्या सहवासात :**
  भाग १ व २.